
कल्लाकार
भूपेश कुंभार

# कल्लाकार

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# कल्लाकार

भूपेश कुंभार

ई साहित्य प्रतिष्ठान

# कल्लाकार(अनुभव)

भूपेश कुंभार

mob.no – 7030919910, 8668436022

bhupesh.kumbhar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन  : १० एप्रिल २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .



# भूपेश कुंभार

भूपेश कुंभार यांची ओळख सोपी नाही. आमच्या दृष्टीने त्यांची सर्वात महत्त्वाची ओळख म्हणजे ई साहित्य प्रतिष्ठानच्या पायाचे ते एक दगड. ते नसते तर ई साहित्य प्रतिष्ठान झालेच नसते. एक हरहुन्नरी, पन्नास देश फ़िरलेला कलंदर आणि सर्व प्रकारच्या माणसांचा भुकेला हा माणूस लेखक आणि कवी आहे हे ओघाने आलेच. मराठी कवी आणि लेखकांच्या नव्या पिढीला एकत्र आणण्याच्या कामाची सुरूवात त्यांनी (स्वतःच्या खिशाला कार लावून) केली ज्यातून पुढे ई साहित्य प्रतिष्ठान उदयाला आले.

तसे भूपेश कुंभार हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात गेली पंधरा वर्ष कार्यरत आहे. ते मुळचे मेकॅनिकल इंजिनियर ,पण पिंड साहित्यिकाचा .लहानपणापासून विविध वाचनाची त्यांना मनापासून आवड आहे. त्याचबरोबर निरनिराळे संगीत प्रकार, फोटोग्राफी आणि प्रवासामध्ये त्यांना विशेष रुची आहे.लं.पु ., कुसुमाग्रज, व.पु., जी.ए., ग्रेस हे त्यांचे मराठीतले विशेष आवडते लेखक कवीसुरुवातीला . माहितीपर निबंध, काही फुटकळ लेख ह्यापासून सुरुवात करून त्यांनी कविता लिहायला सुरुवात केली नोकरी निमित्त पन्नास .एक देशामध्ये जगभ्रमंतीचा योग आल्यानं निरनिराळया प्रदेशांच्या चालीरीती, परंपरा, माणसं, भावभावना ह्यांचा त्यांना जवळून परिचय झालाम्हणून की काय त्यांच्या बऱ्याच लिखाणामध्ये ह्या . मराठी लिहित असताना काही .अनुभवांचे पडसाद उमटतातदर्जेदार शायरी त्यांच्या हाती पडली व त्यांना उर्दू साहित्याची गोडी लागलीउर्दू शायरीची " . "ओळख, "मस्त कलंदर "त्यांच्या लेखमाला खूप लोकप्रिय झाल्या.

त्यांची ओळख या पुस्तक मालिकेतून होईलच.

# मनोगत

"लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा" तुकाराम महाराजांची ही ओवी आजही तितकीच सयुक्तिक आहे. लहानपणचे काही अतरंगी प्रसंग जे आजही लख्ख आठवतात - ते जसे आठवले तसे फेसबुकवर लिहित गेलो - आणि नकळत एक लांबलचक स्मृती-साखळी आकार घेऊ लागली - कापूस कोंड्याच्या गोष्टीसारखी - काही हितचिंतक स्नेही मंडळींनी प्रोत्साहन दिलं अन त्यातून लेखमाला तयार झाली - दर्यावर्दी नावाची. पुढे जाऊन ह्याच मंडळींनी ते पुस्तक रुपात आणण्याचा आग्रह धरला त्याचा परिपाक म्हणजे हे लिखाण जे पुस्तक-रुपात तुमच्या समोर येत आहे.

मला वाटतं - लहान मुलांना आपण फार गृहीत धरतो. त्याचं पालन-पोषण केलं त्यांना हवं नको ते पाहिलं - त्यांना शिक्षण पुरवलं अन फार तर त्यांचे लाड पुरवले की आपण पालकत्वाची जबाबदारी निभावली असा  बऱ्याच मंडळींचा ग्रह आहे.  त्याच्या चिमुकल्या विश्वात असं काय विशेष घडणार आहे अथवा अजून लहान आहे त्याला काय कळतंय?  अशी बोळवण करीत त्यांच्या भाव-विश्वाला सर्रास दुर्लक्षित केलं जातं. हा गैरसमज दूर करण्याचा हा छोटासा प्रयत्न हा. मानस शास्त्रज्ञांच्या मते माणसामधील स्वभाव विशेषांची त्यांच्यातील विकृती अथवा सवयींची पाळंमूळं ही त्यांच्या लहानपणामध्येच सापडतात. त्या संस्कारक्षम वयात मनावर उमटलेले चांगले वाईट ठसे हे आयुष्यभर टिकतात. काही ठसे तर पुसता पुसले जात नाहीत. तुमची जडण-घडणीची दिशा त्यावर ठरते. लहान मुलाचं निरीक्षण खूप खोलवर असतं, त्यांना नाना प्रश्न पडतात - बरेचदा मोठ्यांकडे त्याची उत्तर नसतात - त्याची उत्तरं शोधण्यापेक्षा ती टाळण्याकडेच बहुदा आपला कल असतो. त्यातूनच मग ही चौकस बुद्धी हळू हळू कमी होत जाऊन साच्यातला माणूस तयार व्हायला सुरुवात होते. ही जिज्ञासा वृत्ती जोपासण्याची गरज आहे

त्याचबरोबर तिला खत-पाणी घालण्याची देखील. तरच पुढे जाऊन ही मंडळी प्रतिभावान नाव-लौकिक मिळवतील.

ह्या पुस्तकमालिकेच्या 'दिवटा' नावाच्या पहिल्या पुस्तकाला वाचकांनी भर-भरून प्रतिसाद दिला. त्याबद्दल सर्व वाचकांचे मनःपूर्वक आभार - त्याचं बरोबर ते पुस्तक सर्व रसिक वाचकांना उपलब्ध करून दिल्याबद्दल - ई-साहित्य प्रतिष्ठानला आदरपूर्वक धन्यवाद. काही काही वाचकांच्या प्रतिक्रिया खूपच बोलक्या होत्या कित्येकांना ह्या अनुभव-विश्वात त्याचं बालपण सापडलं, तर कित्येकांनी हे पुस्तक एक बैठकीत वाचून संपवलं - बरेच जणांनी आवर्जून फोन करून प्रत्यक्ष प्रतिक्रिया कळविल्या - त्यांच्या बोलण्यातून एक आत्मीयता अन बालपणाविषयीचा जिव्हाळा जाणवत होता. सगळयाच प्रतिक्रियांमध्ये पुढची वाटचाल जाणून घेण्याची उत्सुकता अन पुढंच प्रकरण प्रकाशित होण्याची वाट पाहण्याची आतुरता प्रकर्षानं जाणवली. मला वाटतं त्यातच ह्या लेखनाचा हेतू साध्य झाल्याचं गमक सामावलं आहे.

लोभ आहेच तो वाढावा ही सदिच्छा...

भूपेश कुंभार

## काही बोलक्या प्रतिक्रिया.




तुमचे 'दिवटा' पुस्तक आवडले. लहान मुलांच्या भावविश्वात कायकाय असू शकतं त्याची जाणीव झाली.

-आपटे सुलभा

तुमची भाषा तसेच लिखाणाची शैली मला फार आवडली. शेवटपर्यंत तुम्ही स्वतः प्रत्यक्षात जणू आत्मकथन करता आहात असंच वाटत होतं.

पुस्तक वाचायला घेतल्यानंतर संपतपर्यंत थांबूच नये असं वाटत होतं. मात्र शेवटल्या पानावर अपूर्ण शेवटाने प्रकर्षाने मनाला चुटपूट लावली.

- संगीता वंजारी

कालच दिवटा हे अनुभव कथन मेलवर आले,रात्रि एक वाजता झोप येइना म्हणून मेल उघडुन वाचत बसले आणि अडीच वाजेपर्यत वाचुनच संपविले, खुप आवडले, आपली लेखनशैली रसदार आहे, एखादि कथाच ऐकतो असे वाटत होते, भुपेशचा पुढचा प्रवास वाचायची अत्यंत ईच्छा आहे, पाठवाल का?

- विजयलक्ष्मी

सुंदर लिहिले आहे, गुंतवून ठेवणारे,भावनिक व्हायला भाग पाडणारे,कधी हसू आणणारे अप्रतिम लेखन, पुढचा भाग वाचाण्यासाठी उत्सुक

- स्वाती महाजन

आपलं दिवटा हे पुस्तक वाचले.खुपच सुंदर, ओघवत्या भाषेत लिहिलं आहे.वाचत असतांना माझेच जीवन वाचत असल्याचा भास बऱ्याच प्रसंगी आला.पुस्तक संपु नये असेच वाटले. शेतातील प्रसंग,गाईगुरातील प्रसंग, शाळेतील प्रसंग, घरातील आईसोबतचे शिक्षेचे प्रसंग,खु प छान वाटले. पहिल्या दोन कथा अन नंतरचा भाग मात्र दोन वेगवेगळ्या कुटुंबातील वाटला. पहिल्या दोन कथा ह्या नंतरच्या आहेत .त्या आगोदर घेतल्याने थोडी सलगता तुटल्यासारखं वाटतं. मांजरी येथील राहणं अन् संचिती ब्रीज जवळचं राहणं यामधल्या काळातील एखादी कथा आली असती तर सलगता येऊन छान वाटलं असतं. अर्थात हे माझं वैयक्तिक मत आहे.ते संयुक्तिक असेल असे नाही. छान लिहिता लिहीत रहा.

- कैलास दिनकर

दिवटा (बालपणीच्या आठवणी) : भूपेश कुंभार

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/divataa_bhupesh_kumbhar.pdf

मातीच्या गोळ्यावर
योग्यवेळी योग्यप्रकारे हात फ़िरवणाऱ्या

संभादादा आणि मोठ्या बाईंना

हे पुस्तक समर्पित.

---भूपेश कुंभार

या आत्मवृत्ताचा पहिला भाग वाचण्यासाठी या लिंकला भेट द्या.

दिवटा (बालपणीच्या आठवणी) :  भूपेश कुंभार

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/divataa_bhupesh_kumbhar.pdf

ज्यांनी पहिला भाग आधीच वाचला आहे त्यांच्यासाठी त्यातील शेवटचा भावबंध पुढे दिला आहे. तो सलगता येण्यासाठी.



आता मला सारं रान मोकळं होतं. मला रोज वेळेत घेऊन येण्याची टांगती तलवार आईच्या डोक्यावरून दूर झाल्याने तिने देखील सुटकेचा निश्वास टाकला. मी आता आणखी अर्धा-पाऊण तास उशिरा आलो तरी फरक पडत नव्हता. बरेचदा तिच्या ते लक्षातही येत नव्हतं. आईचा ससेमिरा मागे नसल्यामुळे मलाही मोकळा श्वास घेता येत होता. शाळा सुटली की मी थेट संभादादाचं शिवार गाठत होतो. पाटातील नितळ पाण्यात हातपाय चेहरा धुवून लगेच संभदादाच्या मागे मागे करायला सुरुवात करी.

त्याला बरीच कामं असत त्यामुळे तो सारखा शेताच्या ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरत असे. बरेचदा त्याला माझ्याशी बोलायची देखील फुरसत नसे.

मी रिकामटेकडा बिनओझ्याच्या बैलासारखा इथून तिथे त्याच्यामागे फिरे. बैल मेला ओझ्यानं अन शिंगरू मेलं हेलपाट्यानं अशी एकंदर गत होती. मी सारखा सारखा मध्ये मध्ये करत असल्यामुळे त्याला त्याचं काम धड करता येत नसे. शेवटी वैतागून तो मला एका जाग्यावर बसायला सांगे. “बस इथं गुमान अन शाळेत दिलेला अभ्यास पुरा कर.. मग आपण जाऊ बैलगाडीतून फ़िरायला” असं दटावून सांगायचा. त्या प्रलोभनापायी मी गपगुमान तिथल्याच एकाद्या आडोश्याला बसून शाळेत दिलेला सगळा गृहपाठ पुरा करी. संभादादा कधी रिकामा होतोय ह्याची वाट पाहत.

संभादादाच्या शेतात बऱ्याच बायका रोजंदारीवर काम करत. त्याच्यावर लक्ष ठेवण्याचं आणि त्यांच्याकडून काम करून घ्यायचा जिम्मा त्याच्याकडेच होता. त्यामुळे तो बरेचदा ह्या बायकांना सूचना करीत असे. कुणी जर कामात कुचराई केली तर त्यांची खरडपट्टीदेखील काढत असे. दुपारी बायका भाकर-तुकडा खायला विसाव्याला बसल्या की पुन्हा लवकर काम सुरु करायला अळंम-टळंम करीत. संभादादाच्या ते निदर्शनाला आलं रे आलं की तो जागेवरूनच ओरडे, “ओ कमलाबाई, काय वावरात घुसायचा इचार हाय आज का तिथंच बसून रवंथ करायचा इरादा हाय, बिदागी कापली की माझ्यामागं नका येऊ गाऱ्हाणं घेऊन”.. “हे काय मालक, निघालोच की हात धून” म्हणत बायका लगेच पटापट उठून शेतात पुन्हा कामाला लागत. त्याचं बघून मीही कुणी कामात ढिलाई बरतली की, “अहो हौसाबाई, चालवा की हात झटा, झटा.. हाताला काय मेंदी लावली का? “ असे उपदेश करू लागलो. त्यावर बायका हसून म्हणत.. “आता गं बाया ! पहिला का हा तोरा. व्हय व्हय धाकलं मालक, हे काय भिडतोच लगोलग. “ त्यांना माझ्या ऐटीचं कोण कौतुक वाटे.

ह्या भल्यामोठ्या रानाला पावसाचं आणि ओढ्याचं मुबलक पाणी देखील कमी पडे. त्यामुळे त्याच्या शेतात एक-दोन विहिरी देखील होत्या. एक पाणी पिण्याची आणि दुसरी शेतात पाणी देण्यासाठी. दोन्ही विहिरींवर लाकडी रहाट बसवलेला होता. बायका रहाटाची लाकडी चकरी फिरवून त्यातून बादलीने पाणी उपसत असत. कधी कधी मी त्याला लटकत असे. संभादादा मला पाणी पिण्याच्या विहिरीजवळ फारसा फिरकू देत नसे. दुसऱ्याचं पोरं म्हणजे विकतचं दुखणं असं तो नेहमी म्हणायचा. पण पाटात पाणी सोडणाऱ्या विहिरीवर असा काही अटकाव नव्हता ती चांगली बांधून घेतली होती. त्यातून रहाटाला बैलजोडी जुंपून मोटेच्या साहाय्याने पाटामध्ये पाणी सोडलं जाई. मोटेचे बैल सारखे पुढे मागे करत. ते पुढे आले की मोटेतून पाणी दगडी चॅनेल मधून पाटात सोडलं जाई. मोट चालवताना संभादादा भलताच खुशीत असे. आपल्या भसाड्या आवाजात, “जीव शिवाची बैलजोड, लावली आपली पैजला पुढं” किंवा मग “कुन्न्या गावाची, कुन्न्या राजाची तू ग राणी.. आली लचकत मान मुरडत हिरव्या राणी.. “ वैगेरे गाणी गात असे. कुणी आजूबाजूच्या बायकांनी हे ऐकून चमकून त्याच्याकडे पाहिलं तर भलताच लाजत असे.

पाखरांनी कणसातले दाणे खाऊ नयेत म्हणून शेतात बरीच बुजगावणी होती. बरेचदा मी त्याच्यासमोर ऐटीत उभा राहून त्यांच्याशी गप्पा मारे. शेतावर येणारी पाखरं हाकलण्यासाठी संभादादा मला मचाणावर घेऊन जाई. तिथून आजूबाजूचं शिवार फारच मनोहर दिसे. अगदी भिंतीवरील निसर्गचित्रासारखं. डोईवर निळभोर आकाश. खाली सर्वदूर पसरलेली हिरवाई. सगळीकडे पाटातून पाणी वाहत असल्याने हवेत पसरलेला आल्हाददायक गारवा आणि गर्द वनराईशी सलगी करत वाहणारा मंद परंतु अल्लड उनाड वारा. मन प्रसन्न व्हायला अजून काय हवं? गिलोरीने पक्षांना हाकलताना त्यांचा उडालेला थवा आणि किलबिलाट मन मोहून ना घेईल तरच नवल. तो अपूर्व रंगसोहळा डोळयात साठवत मी छातीमध्ये मनसोक्त मोकळा श्वास भरून घेई. भरल्या हृदयाने अन विस्तारलेल्या

मनाने, मी त्या आनंदलाटांच्या तरंग लहरींवर अलगद विहार करीत घरी परतत असे. आजदेखील त्या संस्मरणीय जिवंत निसर्गचित्राचे जीवघेणे नाजूक रंग किंचितही फिके पडलेले नाहीत.

## भाग २ :



आम्ही दोघे तासंतास त्या मचाणावर निळया आभाळाकडे डोळे करून उताणे पडून राहत असू. मला भलते भलते प्रश्न पडत. संभादादा त्याची उत्तर देता देता मेटाकुटीला येई. हा वारा कुठून येतो? हे पक्षी कुठे राहतात? त्यांना रात्रीचं दिसत का? ते किती लांब पर्यंत जाऊ शकतात? वैगेरे वैगेरे. थोड्या वेळाने त्याचं पैलवानी डोकं गरगरू लागे. “जरा घडीभर गुमान बस की.. सारखं वटवट करून त्वांड न्हाई का दुखत? सारखं आपलं हे काय अन ते काय? आर एव्हडं सगळं येत असतं तर साळमधी नाव नसतं घातलं का म्या? चल तुझी निघायची येळ झाली. “ असं बडबत मला मचाणावरून खाली उतरवी. कधी खळयात कधी मळयात हा लटका राग आणि लुटुपुटीची लडाई कायम सुरु असे.. आजूबाजूच्या गड्यांना म्हणायचा.. “आताच एवढं फेफरं आणतंय. शिकल्यावर तर काय व्हणारे कुनाला ठाव? ह्याला शिकीविणाऱ्या बाईची तर दया याया लागली मला. “ ते खोटं नव्हतं..

बाईंनी तर आत्तापर्यंत माझा नादच सोडून दिला होता.. पण हा शनी मात्र तिचा पिच्छा असा सहजासहजी सोडणार नव्हता..

खूपदा संभादादा मला बैलगाडीतून आठवडे बाजाराला भाजीपाला विकायला घेऊन जाई. तिथे कपड्यापासून, धन-धान्य, भांडी-कुंडी ते बैलजोडी विकणारे निरनिराळे तंबू पाहून माझं मन हरकून जाई. बैलगाडी चालवताना तो बरेचदा बैलांचा कासरा माझ्या हातात देऊन मला बैलगाडी हाकायला देई. त्यावेळी स्वारी भलतीच खुश व्हायची. तोच प्रकार ट्रॅक्टर चालवताना किंवा बुलेट चालवताना होई. तो मला त्याच्या पुढे बसवत माझ्या हातात स्टिअरिंग किंवा बुलेटचं हॅण्डल देई. मला वाटे मीच गाडी चालवतोय. विशेषतः ट्रॅक्टरने शेत नांगरताना आणि कुळवणी करताना विशेष मज्जा येई. वावरातली ढेकळं त्या नागराखाली येऊन दुसऱ्या बाजूने बाहेर पडत. सपाट असलेलं शेत एकदम कुणीतरी भातामध्ये चमचा फिरवून तो विस्कळीत केल्यासारखं विस्कटून जाई. जमीन मोकळा श्वास घेऊ लागे. वाफे पडल्यानंतर तर ती काळीभोर जमीन अजूनच आकर्षक दिसत असे.

आम्ही नियमितपणे अधूनमधून त्याच्या घरी जात असू. त्याच भलं-थोरलं घर पाहून जीव दडपत असे. चौसोपी वाडा. मध्ये भलंमोठं अंगण. एका पडवीमध्ये धान्याच्या राशी रचलेल्या. तर दुसऱ्या ओडोश्याला गाई-गुरांसाठी वैरण साठवलेली. तसा खोल्यामध्ये अंधार असे. स्वयंपाक घरातून नेहमी चुलीचा धूर बाहेर येत असे. काकू मला नेहमी काही ना काही खायला देत. पोरगं शाळेत शिकतंय हे ऐकून तिला माझं खूप कौतुक वाटे. “माइंदाळ शिक. लई मोट्टा हू. आमच्या पोरांची डोस्की चालत न्हाईत म्हून पैलवानकी करत्यात पर तू लई मोट्टा सायेब हुनार बग. वळक इसरू नगसं” असा तोंड भरून आशीर्वाद देई.

बरेचदा चुलीसमोर भाकरी थापता थापता मला विचारी “येवडा शाळंला जातूस.. बाईंनी शिकिवलं त्यातलं कायतरी म्हणून नाय तर करून दाखिव की ह्या अडाणीला”. मग मी तिला कधी शाळेत रोज सकाळी म्हणाली जाणारी, “खरा तो

एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे, जगी जे हीन अतिपतित, जगी जे दीन पददलित, तया जाऊन उठवावे, जगाला प्रेम अर्पावे" ही सानेगुरुजींची प्रार्थना म्हणवून दाखवी. नाही तर केंव्हा "सदैव सैनिका, पुढेच जायचे न मागुती तुवा कधी फिरायचे" ही कविता बॅण्डच्या तालावर कदमताल करत साभिनय करून दाखवी.

ती तोंडात पदर घालत.. "बाय माझे.. किती गुणाचं पोर ते.. कसं चटा चटा बोलतंय. द्रिष्ट काढाया पाहिजे" म्हणत माझ्या चेहेऱ्यावरून हात फिरवून माझा मुका घेत असे. व लगेच मला शेव, रेवडी, गजक किंवा मग बत्ताश्याचा फराळ फडताळातून कडून देत असे. संभादादा त्याला गमतीनं "इंडियन चॉकलेट" असं म्हणायचा. खूपवेळा मी त्यांच्याकडे जेवायला असे.. ओला कांदा, लसणाची चटणी, बाजरीची भाकरी आणि काटे वांग्याचा भरून केलेला रस्सा असा काहीसा फर्मास बेत असायचा. मी रेमटून दामटत असे.. अगदी ठसका लागेपर्यंत.. काकू म्हणायची "लेकरा जरा जपून.. जेवाण काय कुटं पळून जात न्ह्याय" माझं ओरपणं सुरूच असायचं. घरी गेल्यावर भूक नसल्याचा बेमालूम बहाणा करी. रगेल होता होता आता मी बनेलही बनत चाललो होतो.

एक दिवस असंच संभादादाच्या घरी तो मला झोपायची वळकटी आवळताना दिसला.. कुठेतरी बाहेर जाण्याच्या तयारीत होता.. शेजारीच त्याचं नाव गाव पत्ता लिहिलेली ट्रंक कपडे भरून तयार होती.. मी विचारलं "कुटं निघाला".. त्याने मला काहीच उत्तर न देता माझी नजर चुकवत आत निघून गेला. मी पिच्छा सोडला नाही. काकूंना विचारलं, "संभादादा कुटं निघालाय? मला काही कस बोलला नाही. " त्या माउलीला मला काय उत्तर द्यावं समजत नव्हतं. पण धीर करून म्हणाली, "तुला सांगितलं न्ह्याय व्हयं.. आर तो निघाला कोल्हापूरला आज राच्च्या गाडीनं.. पैलवानकी शिकाया.. " माझा विश्वासच बसेना.. "परत कवा येणार? " मी न राहवून प्रश्न विचारला.. काकू म्हणाली.. "काय की.. त्यालाच

इचार.. आता एव्हडी पैलवानकी शिकायची तवा दोन चार महिनं इकडं तिकडं हुयाचच की.. समद्या महाराष्ट्रात नाव गाजिवणार हाय जणू. “ माझ्या पायाखालची जमीन सरकली.

संभादादानं मला काहीच कसं सांगितलं नाही.. मला असं का अंधारात ठेवलं ह्याच मला राहून राहून वैषम्य वाटत होतं. मी तिथंच एका लाकडी खांबाला पकडून फुरंगटून बसलो. काही वेळानं संभादादा बाहेर आला. माझी समजूत कशी काढावी हेच त्याला समजत नव्हतं. शेवटी धीर करून तो माझ्याकडे आला आणि दोन्ही पायावर बसत मला जवळ घेऊन म्हणाला, “जाया लागतंय.. तू कसा साळा शिकून मोट्टा सायेब हुनार. . तसं मला बी मोट्टा पैलवान हुयाच हाय. मग नगं का जायला तूच सांग म्हंजी झालं”, मला त्याचा खूप राग आला होता.. डोळेपण भरून आले होते..

त्याला मागे ढकलत मी म्हणालो.. “तू माझा मैतर न्हाईस.. असशील तर मला घेऊन चल.. मी एकटा नाय जाऊ द्यायचा तुला “. एवढा गड्यासारखा गडी पण त्यादिवशी भांबावला होता. थोड्या वेळाने सावरून म्हणाला.. “आर येडा का खुळा तू. . असं करून कसं चालंल, मग शाळा कोण शिकनार.. मला हिसाब कोण शिकीविणार? अन मी थोडाच कायमचा चाललोय? येतोच कि हे धा बारा महिन्यात” मला त्याच्या बोलण्यावर विश्वास नव्हता.. . मी म्हणालो.. “सगळे असच म्हणत्यात अन मला फसवत्यात.. तू पण तसलाच.. “ आता मात्र त्याला राहवलं नाही.. त्याने मला छातीशी धरलं अन पुटपुटला, “कोण कुणाचं पोरं.. पर असा जीव लावलाय कि घरातून पाय निघना झालाय. च्यायला ह्यात पडायलाच नको व्हतं. “ त्याने माझी घट्ट मिठी मोठ्या मुश्किलीने सोडवली. पायात भरभर वहाणा घालत, कुणालाही आपला रडवेला चेहेरा न दाखवता, तो थेट घराच्या बाहेर पडला. बहुदा कसलेल्या पहिलवानाच्या डोळयातलं पाणी त्याला कुणाला दाखवायचं नसावं. त्याच्या मर्दानगीला ते शोभणारं नव्हतं.



शाळेला भलं मोठं मैदान होतं. प्रार्थमिक शिक्षण सुरु असल्यानं शाळेत वर्गातील धड्यांबरोबर बाहेरील शारीरिक शिक्षणाचे धडे देखील महत्वाचे होते.. आम्ही तिथे निरनिराळे खेळ खेळत असू. आट्या-पाट्या, खो-खो, लिंबू-चमचा, तीन पायाची लंगडी, पायात पोते घालून पाळण्याची स्पर्धा, गोल गोल रिंगण, मामाचं पत्र हरवलं असे कितीतरी शारीरिक व्यायाम नकळत घडवणारे खेळ शिकवले जात. खेळात विशेष प्राविण्य असलेल्या विद्यार्थ्यांना मलखांब किंवा मग कब्बडी शिकवली जाई. लेझीम हा सांघिक खेळ तर सर्वांना सक्तीचा होता. शाळेचं एक बॅंडपथक ही होतं. तसंच मुलींसाठी रांगोळी स्पर्धा घेतल्या जात. अभ्यासाला सुट्टी म्हटल्यावर स्वारी खुश असायची मन लावून बऱ्याच खेळात सहभागी व्हायची.

दिवसभर असं खेळून बागडून आलं की रात्री कधी झोप लागे ते कळत नसे. हिवाळयात देखील बरेचदा आम्ही बाहेर अंगणात झोपत असू. बाजूला शेतातील वाळलेली चिपाडं आणून मस्तपैकी शेकोटी पेटवली जायची आणि त्याच्या

प्रकाशात अगोदर जेवणं होत आणि मग अंगावर चादर किंवा शाल घेत कधी कधी पत्त्यांचा डाव रंगे. मला पाच तीन दोन शिवाय बाकीचे पत्त्यातले इतर प्रकार येत नसत. हा विशेष उपक्रम बहुदा रेडिओवरील लोकप्रिय कार्यक्रम ऐकण्यासाठी हाती घेतला जाई. त्यावेळी सिलोन स्टेशनवर बिनाका गीतमाला प्रसारित केलं जाई. अमीन सयानींची लोकप्रियता त्याकाळी आकाशाला भिडली होती. “भाइयों और बहनो.. आपको आपके चहेते अमीन सायानी का नमस्कार” असं म्हटलं की पब्लिक नादखुळी व्हायची. सगळयांकडे रेडिओ नसल्यामुळे ह्या कार्यक्रमाचं सार्वजनिक श्रवण होई. कधी शेकोटीच्या हारावर कोवळं कणीस भाजलं जायचं तर कधी शेतातला हुरडा.. बरेचदा आई कांद्याची गरमागरम खेकडा भजी देखील बनवून देई. दोन चार कुटुंब मिळून ही इवलीशी पार्टी दिवसाआड चाले.

रेडिओ सिलोन शॉर्ट वेव्हवर लागत असल्याने रेडिओ फार काळजीपूर्वक ट्यून करावा लागे. तरी देखील खरखर जात नसे आणि सगळयाच रेडिओवर तो ट्यून होईल ह्याची खात्री नसे. त्यामुळे एका ठिकाणी जरी तो व्यवस्थित ऐकू येत असला तर बाकीची सारी मंडळी त्याच्या भोवती कोंडाळं करू कानात प्राण आणून अमीन सायानीचा आवाज मनात साठवत असत. एवढी काय जादू होती त्याच्या आवाजात कुणास ठाऊक? पण साऱ्यांना त्याने वेड लावलं होतं हे निश्चित. दर सोमवारी पुणे आकाशवाणी केंद्रावर येणारी श्रुतिका नाही तर नाटिका हा एक अजून आकर्षणाचा मुद्दा असे. एकदा हे कार्यक्रम ऐकून जागे राहिलोच तर मग रात्री अकराचा 'बेला के फुल' ऐकल्याशिवाय रेडिओची सांगता होत नसे.

मग तोवर झोप उडालेली असे. शेजारी ओढा असल्याने थंडगार बोचरा वारा अंगाला झोंबे. त्यामुळे अंगाला पांघरून गुरफटून घ्यावं लागे. आसमंतात एक निरव शांतता भरून राहिलेली असायची. मग रातकिड्यांची किरकिर, ओढ्याच्या पाण्याचा आवाज, मधूनच महामार्गावरून जोरात निघून जाणारा एखादा ट्रक हे सारे आवाज स्पष्टपणे ऐकू येत.. पौर्णिमेच्या आसपास चंद्राचं ओढ्याच्या पाण्यात

पडणारं प्रतिबिंब मनाचा ठाव घेत असे. प्रदूषण कमी असल्यामुळे आकाश निरभ्र असायचं. जशी जशी अमावस्या जवळ येई तस तसा चंद्र कमी होत जाऊन आकाशात चांदण्यांची रेलचेल सुस्पष्ट दिसे. आजूबाजूच्या शेतात शेकडोंनी काजवे चमकत. अमावास्येच्या रात्री तर गडद अंधार असल्याने हे जमिनीवरील चांदणं अजूनच मनाला मोहून टाकी. मी नकळत त्यांच्याकडे खेचला जाई. मग ही अजब रोषणाई मी शेताच्या बांधावर उभा राहून विस्मयतेने पाहत असे. एकदा असाच मी अमावास्येच्या रात्री शेतात काजवे पाहता पाहता झोपी गेलो. शेतात बांधाला लागून एक म्हसोबाचं ठाणं होतं त्याठिकाणी.

झालं ! दुसऱ्या दिवशी चाळीमध्ये बोभाटा झाला. मला कुणीतरी झपाटलं म्हणून. बायकांमध्ये कुजबुज सुरु झाली. “मी तुला म्हणत नव्हते? तरीच पोरगं अमावास्येच्या रात्री बाराला आपसूकच उठतंय अन शेताकडे चालायला लागतंय. मी दोनचारदा स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलंय. चेटूक म्हणायचं नाही तर काय? तरीच सारखं हड्याहड्या करतंय. कठीणच आहे राजुच्या आईचं”. माझ्यावर चेटूक केलं होतं खरं पण ते निसर्गानं. आता हे भूत आयुष्यभर मानगुटीवरून उतरणार नव्हतं.



निसर्ग शिक्षणासोबतच शाळेची गोडी लागल्यामुळे शाळेतला वेळ कसा फुर्रकन उडून जाई ते माझ्या लक्षातच येत नसे. अजूनही बाईंचं मला बखोटीला धरून “देखिये तो आपका लाडला कैसी कैसी कहानियाँ बना रहा हैं, जरा मॅडम को पढके तो सुनाव” ह्या थाटामध्ये मोठ्या बाईंकडे नेणं सुरूच होतं. मोठ्या बाईंचं देखील “व्हेरी गुड स्टोरी सन” म्हणत मला शाबासकी देणंही चुकत नव्हतं. वर्गातल्या बाईंचं मात्र या सर्वांमध्ये मधल्या मध्ये मरण ओढवत असे. नाईलाजास्तव त्या तशाच बखोटीला धरून मग मला वर्गात नेऊन बसवत. “ह्याचे माकड चाळे कधी संपणार आहेत कोण जाणे? “ ह्या अभिर्भावात.

शाळेच्या वाटेवर कृषी विद्यापीठाचं एक भाजीपाला आणि फळविक्री केंद्र होतं. तिथे सगळे कृषी उत्पाद सवलतीच्या दरात मिळत. ते सकाळी आणि संध्याकाळी फक्त दोन तासापुरतं उघडण्यात येई. आईला केंद्राची ही अवघड वेळ सांभाळणं जमत नसे. त्यामुळे ती बरेचदा मला एक यादी देऊन माझ्याकरवी भाजी आणि फळं मागवत असे. केंद्राचं काउंटर फारच उंचावर होत. साधारण सात एक फूट तरी असावं कारण खालचा गाळा अतिरिक्त भाज्या आणि फळं ठेवण्यासाठी वापरण्यात येई. चांगल्या उंच काठीच्या माणसालाही हात वर करूनच वस्तू घ्याव्या लागत. मी तर इन मिन तीन साडेतीन फूट असेन. भाजी विकणाऱ्या आजी रिकामी टोपली खाली सोडत. मी त्यात पैसे आणि यादी टाकल्यानंतर त्या वर खेचून घेत. मला तर भाजीपाला आणि फळं पाहायला देखील मिळत नसत. काही वेळाने त्या यादीतल्या भाजी आणि फळं, उरलेल्या सुट्ट्या पैश्यासकट टोपलीतून खाली सोडत. मी ते सारं साहित्य कापडी पिशवीत भरून पैसे वरच्या खिशात टाकून घरी रवाना होई.

हे नेहमीचंच झालं असल्याने आजी मला चांगल्या ओळखू लागल्या होत्या. त्या वरतीच बसून सामान देत असल्याने माझी त्यांच्याशी फारशी घसट नव्हती. पण इवलासा जीव भाजी खरेदीला एकटा येतोय म्हणून तिला कौतुक वाटे. अधून मधून एखादं फळ ती असंच टोपलीत टाके. मला म्हणे.. "तुझ्यासाठी दिलंय. वाटनं जाता जाता खाय.. कुनाला देऊ नगस. " मी खुश व्हायचा. पुढे पुढे मी मला आवडणारं फळ मागू लागलो आणि ती माझ्या टोपलीत टाकू लागली. मध्येच "आज शाळत काय शिकलास? " असं विचारायची मग मी तिला एकादी नुकतीच शिकलेली कविता नाहीतर गोष्ट सांगायचो. केंद्रात गर्दी वाढली की मग मला मध्येच थांबवत, "चल जाय घरला" असं म्हणत घरी पिटाळायची.

एकदा माझ्याकडून आईने फळ-भाज्यांसाठी दिलेले दहा रुपये कुठे तरी गहाळ झाले. मी दोन तीनदा सारा रस्ता धुंडाळून पहिला. तीन चार वेळा केंद्रात आत बाहेरही पाहिलं. पण पैसे कुठेच सापडले नाहीत. घरी गेल्यावर आज

आपल्याला नक्की मार बसणार म्हणून मला धडकी भरली. इतरवेळी बाकीच्यांच्या उरात धडकी भरवणारा आज मात्र गलितगात्र झाला होता. पाय थरथर कापत होते. आजीबाई वर बसल्या बसल्या माझी आत बाहेर चाललेली हालचाल पाहत होत्या. मी केंद्रात येऊन एका जागी उभा राहिलो. आजींनी विचारलं, “का रं पोरा, काय झालं? “ मी रडवेल्या चेहेऱ्याने पैसे हरवल्याचं सांगितलं. “असं व्हय.. झालं ते झालं.. आता रडतोस कशापायी? “ असं म्हणत आजी पहिल्यांदा खाली उतरून आल्या.

“आधी त्ये डोळं पूस बघू. असं रडायचं असतंय व्हय रं.. तुझ्यासारख्या धडधाकट पोरानी.. “ असं म्हणत त्यांनी माझे डोळे पुसले. “आई आता मला सोडणार नाही.. मारेल. “ मी अजूनच रडवेला झालो.. “आर अशी कशी मारंल.. तू काय गुन्हा केलास व्हयं.. बरं आन ती यादी हिकडं” असं म्हणत तिने यादीतले सगळे जिन्नस मला माझ्या पिशवीत भरून दिले. आणि म्हणाली “जा आता गुमान घरला. काय बी व्हतं न्हाय. “ मी विचारलं.. “किती पैसे झाले”. ती म्हणाली.. “तसं झाल्यात साडे सात रुपडं.. पर र्हाऊदेत”.

माझी भीती वेगळीच होती. मी तिला म्हणालो.. “उरलेले पैसे नाही आणले तर आई पुन्हा विचारेल त्याचं काय केलं म्हणून.. तिला हिशोब द्यावा लागेल दहा रुपयांचा.. नाहीतर मी पैसे उडवले म्हणून ती मला मारेल”.. माझी निरागस काळजी ऐकून तिला हसू आलं.. म्हणाली.. “बराच शाना हैस की.. भाजी परी भाजी फुकटात द्याची अन वरतून सुटं पैसं पण द्याचे व्हयं र तुला. उलटाच हिशेब म्हणायचा.. चांगल्या चांगल्याला याड लावशील. “ असं म्हणाली खरी पण तिच्या कमरेला खोचलेल्या चंचीतून सुट्टे अडीच रुपये माझ्या वरच्या खिशात टाकत विचारलं.. “आता न्हाई मारणार नव्हं !” मी डोळे पुसत हसऱ्या चेहेऱ्याने नकारार्थी मान हलवली.

मी खोड्या करून वाड्यात पळून आलेलो असताना मला पदराआड दडवणारी माझी आजी आठवली. “काय पण बया पोर.. भलतंच चालू” तिचे हे शब्द ऐकायला मी तिथे थांबलो नव्हतो. गाडी सुसाट घराच्या दिशेने निघाली होती. पुढचे कित्येक दिवस मग ही प्रेमळ आजी.. “माझं सुटं पैसं कवा देणार? “ म्हणून गमतीनं माझी छेड काढत होती.




संभादादाला कोल्हापूरला जाऊन दोन एक महिने उलटून गेले होते. खडूस सुभानराव पुन्हा मला महामार्ग ओलांडायला मदत करू लागला होता. त्यामुळे शाळा सुटल्यावर त्याचं काम संपेपर्यंत दीड-दोन तास शाळेत तिष्ठत थांबणं क्रमप्राप्त होतं. शाळेच्या जवळ घरी जाण्याचा रस्त्यावर एक छोटेखानी गणपती मंदिर होतं. आजूबाजूचा परिसर फारच सुरेख होता. मंदिराच्या लाकडी खांबावर छानपैकी कोरीवकाम केलेलं होतं. मी आता तिथे माझं बस्तान बसवलं. आजूबाजूच्या पोरांबरोबर दुपारच्या वेळेला मंदिरात गर्दी नसताना मी लपंडाव खेळू लागलो. तर कधी गृहपाठ संपवू लागलो. शिपाई आपलं काम उरकलं कि मंदिरात येऊन मला घरी घेऊन जाई.

मंदिरात दर्शनासाठी बरेच लोक येत. मंदिराच्या द्वारापाशी एक चॅपलस्टँड होतं. तिथे एक म्हातारे आजोबा गणपतीची सेवा म्हणून चपला

सांभाळण्याचं काम करीत. वृद्ध असल्याने त्यांच्या कामाचा उरक यथा तथाच होता. मंदिरात गर्दी जास्त असली की भाविकांना चपला देताना किंवा घेताना वाट पाहावी लागे. अशा वेळी मी त्यांना मदत करू लागलो. ते चपला घेण्याचं काम करीत मी त्या देण्याचं काम करीत असे. अशी कामाची विभागणी झाली की मग त्यांना दमायला होत नसे. गर्दी ओसरत आली की मंदिराच्या पायरीवर आम्ही दोघे उसासे टाकत क्षणभर विश्रांती घेत असू. आजोबा “शाबास” म्हणून माझ्या पाठीवर थाप देत माझं कौतुक करीत.

मला म्हणत “अशीच विनम्रपणे गणपतीची मनोभावे सेवा करीत राहिलास.. तर आयुष्यात कितीही मोठी संकट आली तरी तुला काहीच कमी पडणार नाही. माझे अनुभवाचे बोल आहेत. . विघ्नहर्ता दूर करू शकणार नाही असं कुठलंही संकट नाही. “ आजोबा जे काही बोलत ते मनापासून बोलत. सेवा, भक्ती वैगेरे बाबत मी खूपच अजाण होतो. संकट म्हणजे नक्की काय याचाही मला थांगपत्ता नव्हता. त्यामुळे ते काय बोलत त्याचा मला फारसा अर्थ लागत नसे. आजोबांना मदत केल्यानं माझ्या मनाला छान वाटतं इतकंच मला समजत होतं.

आजोबा गणपतीची साग्रसंगीत. पूजा करत. त्यासाठी त्यांना जास्वंदाची फुलं, दुर्वा लागे. आजूबाजूलाच भरपूर जास्वंदाच्या फुलांची झाडं होती. मोठी जास्वंद, डबल जास्वंद, केशरी, लाल, पांढरा, पिवळा, अबोली, नारिंगी असे कितीतरी प्रकारचे जास्वंद आढळत. मी मग बाजूच्या कठड्यावर चढून ती फुले काढीत असे. त्याच परिसरात एक पारिजातकाचं झाड होतं. त्याच्याखाली पारिजातकाचा भला मोठा सडा पडलेला असे. तो मी परडीत अगदी हलक्या हाताने वेचून घेई. मला त्या नाजूक फुलांवर पाय पडण्याची भीती वाटे. म्हणून मग मी केवळ टाचेवर बसून फुलं गोळा करी. बाजूच्या हिरवळीवरचे नाजूक तणाग्र तोडून तेदेखील परडीमध्ये टाकी. क्वचित एखादं केवड्याचं फुलंही आणायला विसरत नसे.


अशी गच्चं फुलांनी भरलेली परडी पहिली की आजोबा जाम खुश होत. मग आम्ही दोघे मिळून त्या हिरवळीच्या तनाग्रापासून दुर्वा छाटत असू. दुर्व्याला तीनच अग्र आहेत की नाही हे ते बारकाईने तपासत. जास्वंदाचा कंठहार करताना मग मी दोरा घेऊन लांब उभा राही. आजोबा एक एक फुल त्यात माळत असत. त्यांना नीट दिसत नसल्यामुळे सुईमध्ये दोरा मलाच ओवून द्यावा लागे. पूजेचं ताट असं तयार झालं की मग त्यांच्या प्रदीर्घ पूजेला आरंभ होत असे. मी त्यांच्या बाजूला बसून त्यांना काय हवं नको ते पाहत असे. म्हणजे गडव्यामध्ये पाणी आणून देणं, ताटातल्या वस्तू त्यांच्या हातात देणं वैगेरे. पूजा करताना ते कसली कसली भारीभरकम स्तोत्रं म्हणत. मला त्यातला ओ का ठो काळात नसे. मात्र गणपती अथर्वशीर्ष म्हणताना ते मला बरोबर म्हणायला सांगत. संस्कृत उच्चार चुकले तर समजावून सांगत. एकदा त्यांनी मला त्या स्तोत्राचा अर्थही सांगितलेला पण तो माझ्या डोक्यावरून गेला. अर्थात एकपाठी असल्याने काही दिवसातच मला ते मुखोद्गत झालं.

एक दिवस मंदिरामध्ये खूपच कमी गर्दी होती. आम्ही दोघे सभामंडपाच्या पायरीवर बसलो होतो. आजोबा आज फारसे बोलत नव्हते. कुठे तरी दूरवर शून्यात नजर लावून बसले होते. मला म्हणाले “थोडा मागे सरक”. मी सरकलो. त्यांनी माझ्या चिमुकल्या मांडीवर डोकं ठेवलं. त्यांचं शरीर तापाने फणफणलं होतं. कपाळावर हात ठेवला तर तापलेल्या निखाऱ्याप्रमाणे हाताला चटका बसत होता. मी दचकून आजोबांना म्हणालो “आजोबा तुमचं अंग गरम लागतंय” ते म्हणाले “असूं दे”.. . तू मला एखादी गोष्ट सांग.. मला अवघडलयासारखं वाटतं होतं तरीसुद्धा मला सुचेल ती गोष्ट मी सांगायला सुरुवात केली. त्यांचं संपूर्ण शरीर थरथरत होतं. काहीवेळाने म्हणाले “आता बास कर.. आणि अथर्वशीर्ष म्हण.. “ मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे “ॐ नमस्ते गणपतये ॥ त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि ॥ त्वमेव केवलं कर्तासि ॥” असं स्तोत्र म्हणायला सुरुवात केली. माझी मांडी घामाने पूर्ण ओली झाली होती. माझा एक हात त्यांच्या मस्तकावर होता.. हळू हळू त्यांचा ताप उतरू

लागला.. मस्तक थंड पडू लागलं. “ओम गण गणपतये नमः” म्हणेपर्यंत ते बर्फासारखं थंड पडलं होतं.

मला वाटलं फरशीवर झोपल्यामुळे त्यांना थंडी भरली आहे. मी पुजारी काकांना आवाज दिला.. “आजोबांना थंडी वाजतीये”. पुजारी काका लगोलग आले त्यांनी त्यांच्या मस्तकाला हात लावला. नाकासमोर हात धरला आणि एक सुस्कारा टाकत आजोबांचे डोळे मिटले. गाभाऱ्यात जाऊन हातावर थोडंसं तीर्थ घेतलं आणि आजोबांच्या तोंडात टाकलं. डोळयांनीच एक भाविकाला खूण केली. त्याने माझी मांडी आजोबांच्या डोक्याखालून हळूच काढून घेतली. मला कडेवर घेत दुसऱ्या कोपऱ्यात नेऊन बसवलं. मला कशाचाच उलगडा होत नव्हता. भरा भरा माणसं गोळा झाली. थोड्याच वेळात ऍम्ब्युलन्स आली आणि आजोबांना त्यात घालून कुठे तरी नेण्यात आलं. सारा जमाव एकही शब्द बोलत नव्हता. एक स्मशान शांतता पसरली होती. इतक्यात शिपाई आपलं काम उरकून मला घ्यायला आला.

मी त्याला जाता जाता विचारलं “आजोबांना त्या गाडीतून कुठे नेलं? “ शिपाई म्हणाला.. “ते गेलं त्यांच्या गावाला”.. मला काही उलगडा होईना.. मी फिरून विचारलं.. “म्हणजे आता ते परत नाही येणार.. “ त्यावर त्याचं उत्तर नाही असं होतं. मी काय समजायचं ते समजलो. बाकीच्यांसारखंच आजोबांनी मला फसवलं होतं. मला न सांगताच ते दूर गावाला निघून गेले होते कधीही परत न येण्यासाठी. ते मोठे असल्याने त्यांच्यावर रागवताही येत नव्हतं. पुढचे दोन दिवस शाळेला सुट्टी होती. तिसऱ्या दिवशी मंदिरात गेलो तर जिथे ते शेवटचे झोपले होते तिथली फरशी बदलण्यात आली होती. त्याच्यावर आजोबांचं नाव कोरण्यात आलं होतं. मला त्या फरशीवर पुन्हा पाय ठेवण्याची हिम्मत झाली नाही. मृत्यूशी झालेली माझी ती पहिली तोंडओळख



मंदिरातल्या गणपतीला निरनिराळ्या नावाने ओळखलं जात असे. ज्याची जशी श्रद्धा आणि प्रचिती त्यानुसार ते गणपतीला संबोधत असत. गणपतीची मूर्ती फारच सुबक आणि मन प्रसन्न करणारी होती. विघ्नहर्त्याचे डोळे फारच बोलके असल्यामुळे बरेचजण त्याला बोलका गणपती असं म्हणत. मी त्याचा शब्दशः अर्थ घेतला. बोलका म्हणजे बोलणारा. मला वाटायचं मंदिरात नेहमी गर्दी असल्यामुळे नक्की कुणाशी बोलावं ह्याचा उलगडा होत नाही म्हणून तो बोलत नाही. मग मी सगळे जाण्याची वाट पाहत असे. कुणी आसपास नसलं की त्याच्याशी एकास एक असा संवाद साधण्याचा प्रयत्न करी. कधी कधी प्रदक्षिणा घालताना भिंतीला कान लावी.

मंदिरात बरेच भाविक दर्शन घेताना संकटनाशन गणपती स्तोत्र म्हणत. कुणी नुसतंच पुटपुटत तर कुणी घंटानाद करीत त्या विघ्नहर्त्याची स्तुती करत. इतके वेळा ऐकून ऐकून मलाही ते पाठ झालं होतं. सभामंडपात "प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्र विनायकम् । भक्तावासं स्मरेन्नित्यायुष्कामार्थसिद्धये" असं ह्या स्तोत्राचं सामूहिक पठण सुरु झालं की त्याच्या स्वरलहरी मंडपात घुमत. मी भिंतीला कान लावले की त्यातून तो आवाज येतो असा मला भास होई. विशेषतः ओंकाराचा प्रदीर्घ मंत्रोच्चार तर आसमंतात भरून राही. "ॐ" असं उच्चरवाने घंटानादासह उच्चारताच गाभाऱ्याची भिंत कंपन पावत असे.

एकदा असंच मी श्रीं च्या मूर्तीकडे एकटक पाहत बसलो होतो. आजूबाजूला कुणीच नव्हतं. पुजारी देखील थोडीशी वामकुक्षी काढत होता. अचानक मला तो गालातल्या गालात हसल्याचा भास झाला.. मी गाभाऱ्यात गेलो. बाप्पाला विचारलं, "तू आत्ता हसलास ना? " आता बाप्पाची चर्या अजूनच मिश्किल दिसू लागली. मी म्हणालो, "हो ! तू हसतोयेस, माझ्याशी बोल.. मी कुण्णा कुण्णाला सांगणार नाही. " आणि काय आश्चर्य ! बाप्पा माझ्याशी बोलायला लागला..

आता मला कुणा सवंगड्याची गरज नव्हती. बाप्पाशी माझी गट्टी झाली होती. तो माझ्याबरोबर आता फिरायला यायला लागला. आम्ही गप्पा मारत मारत त्या नागमोडी रस्त्यावरून बागडू लागलो. बांधाबांधाने धावू लागलो. आमचं हे गुपित आता आम्ही कुणाला सांगणार नव्हतो. मला एकट्यालाच हातवारे करताना पाहून रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांचे विचीत्र हावभाव आणि फिदी फिदी हसणं मला जाणवत असलं तरी आम्ही ते फारसं मनावर घेत नसू. तो मला दुर्लक्ष करण्याचा इशारा करी त्यामुळे मला अजूनच स्फुरण चढे. तो माझ्याबरोबर सदैव असला तरी माझीच अखंड अव्याहत बडबड सुरु असे मला काय काय वाटत माझ्याशी कोण कसं वागतं. . मला कुणा कुणाचा राग येतो.. अगदी सगळं सगळं..

आम्हा दोघांमध्ये कुठलाही आडपडदा नव्हता. इतरांना जसे मी प्रश्न विचारून भंडावून सोडत असे. त्याला मात्र मी एकही प्रश्न कधी विचारल्याचं आठवत नाही.

बरेचदा त्याच्याशी गप्पा मारताना माझं पायाखालच्या रस्त्याकडे फारसं लक्ष नसे. खूप ठिकाणी मोठमोठया झाडांची मुळं जमिनीवर आलेली होती. त्यात पाय अडकून तर कधी रस्त्यातून वर आलेल्या दगडाला ठेचकाळून मी चित्र-विचित्रपणे जमिनीवर आपटत असे. त्यावर बाप्पा त्याचं आधीच मोठं असलेलं पोट गदागदा हलवीत बेभानपणे हसत सुटत असे. मग मला लाजल्यासारखं होई. पाटातून जाताना तो त्याच्या सोंडेने माझ्या तोंडावर पाणी उडवी. मग मी देखील पाटामध्ये उतरून दोन्ही हातांना जोरजोरात त्याच्या अंगावर पाणी उडवत असे. पाणी उडवून दमलो कि मग तिथेच पांदीला श्रमपरिहारासाठी बसत असू. तो माझ्याकडे तिरक्या नजरेने पाही.

एकदा असंच पाण्याच्या कॅनॉलच्या बाजूने पायी चालताना आमच्या गुजगोष्टी सुरु होत्या. मी एका काठाने अन तो दुसऱ्या काठाने असे समांतर चाललो होतो. मध्येच त्याने हात पसरले अन म्हणाला “मार उडी”. मी कुठलाही मागचा पुढचा विचार न करता स्वतःला कॅनाल मध्ये झोकून दिलं माझी उडी पलीकडे जाईल ह्या उद्द्येशानं.. कॅनॉल मध्ये पडताना मी त्याला हाताची घडी घालताना पाहिलं. दुसऱ्याच क्षणी मी तळ गाठला होता. दोन गटांगळया खाऊन मी वरती आलो. कॅनॉलच्या भित्तीपर्यंत उडी गेल्याने उजवा हात जरा लांबवला तर हाताला लोखंडासारखं काहीतरी लागलं. ते घट्ट धरून ठेवलं. कॅनॉलची पाण्याची पातळी मोजण्याचा रॉड होता तो. बाजूलाच एक लोखंडी शिडी होती. त्यावरून कसाबसा वरती आलो. नाकातोंडात पाणी गेलं होतं. घसा पार बसला होता. छाती धपापल्यासारखी वर खाली होत होती. हातपाय मातीने बरबटलेले होते. बाप्पाचा कुठेही मागमूस नव्हता.



बाप्पाने असं तोंडघशी पाडल्यामुळे त्यादिवशी मी त्याच्यावर प्रचंड रागावलो होतो. कुणावर रागावलं की त्याच्याशी मौन पाळायचं हे माझं धोरण असे. त्यादिवशी मात्र ह्या धोरणाला मी हरताळ फासला होता. तश्याच ओल्या आणि चिखलाने बरबटलेल्या अंगाने मी वर्गात पोहोचलो. माझ्यातला कली पुन्हा जागृत झाला होता. मी कुणालाही जवळ येऊ देत नव्हतो. सगळा वर्ग चिखलाने अस्वच्छ झाला होता. हातात जे येईल ते मी समोरच्याला फेकून मारत होतो. वर्गातली चिली-पिल्ली भेदरली. बाईंना देखील माझा हा रुद्रावतार पाहून काय करावं सुचेना. त्यांनी नेहमीप्रमाणे मोठ्या बाईंचा आधार घेतला. नेहमी त्या मला त्यांच्या कडे घेऊन जात. आज मात्र त्यांनी मोठ्या बाईंना वर्गात पाचारण केलं.

इकडे माझं तांडव नृत्य सुरूच होतं. मोठ्या बाई भिंती भिंतीने माझ्या पर्यंत पोहोचल्या. वर्गाच्या मधोमध मी ओला चिखल आणि वस्तूंचा चुराडा करून ठेवला होता इतका मी बेभान झालो होतो. पण बाई जवळ येताच त्यांनी माझ्या कुलुपाची किल्ली काढून घेतल्यासारखं झालं. त्यांच्या शारीरिक हालचालींमध्ये एक प्रकारचा ठेहराव होता. त्या कधीच घाईत दिसत नसत. डोळयात प्रेमळ भाव असले तरी त्यांना गृहीत धरता येत नसे. शाळेत त्यांचा एक आदरयुक्त दरारा होता. पोरं सोरं सोडा. . मोठ्यांनाही त्यांची ही डोळयांची मर्यादा ओलांडता येत नसे. त्यांनी माझा हात हातात घेतला आणि म्हणाल्या.. “काय झालं? मला सांगतोस? “.

मला आज कुणाला भीक घालायची नव्हती. मी म्हणालो “मी नाही सांगणार”. बाई संयम राखत म्हणाल्या. . “बरं नको सांगूस.. मग तर झालं.. आपण फिरायला जाऊयात? “. माझं उत्तर पुन्हा नकारार्थी होतं. शेवटी म्हणाल्या “बरं असुदे.. . माझ्या खोलीत तर येशील? मला तुझं चित्र समजावून सांग”.. माझा विरोध आता हळू हळू मावळत होता. मी काही न बोलता त्यांच्या बरोबर चालू लागलो.

शाळेच्या व्हरांड्यातून बाईंच्या खोलीत जाताना शाळेतली सगळी पोरं-पोरी माझ्याकडे बावचळल्या नजरेने पाहत होती. चालता चालता मोठ्या बाई म्हणाल्या.. “तुझे कपडे बघ चिखलाने कसे माखलेत? असा येणार आहेस तू माझ्या खोलीत? “. मी नकारार्थी मान हलवली. त्या म्हणाल्या, “चल, आधी आपण कपडे स्वच्छ करूयात आणि मग जाऊयात? चालेल? “ मी हो म्हटलं. मध्येच शिपायाला बोलावून त्यांनी माझ्या आईला बोलावणं पाठवलं. त्या मला शाळेच्या बाहेर घेऊन रस्त्यावर आल्या आणि पुन्हा मला विचारलं.. “हं ! सांग आता मला काय झालं? “ आता पर्यंत मी माणसात आलो होतो. मी हळू हळू बाप्पाची गोष्ट सांगायला सुरुवात केली. तो माझ्याशी कसं बोलतो हेही सांगितलं. त्या म्हणाल्या, “मला

घेऊन जातोस बाप्पाकडे. " मी म्हणालो, "मंदिरात नको. तिथे गर्दी असते.. बाप्पा माझ्याशी बोलत नाही त्या ठिकाणी. " मग मी त्यांना बाप्पा भेटायचा त्या जागा एक एक करून दाखवू लागलो. त्याही साडीमध्ये माझ्या मागे पांदीचा चिखल तुडवत कधी पाटाच्या पाण्यातून तर कधी बांधावरून माझ्यामागे येत राहिल्या. माझी एक एक हरकत मन लावून ऐकत होत्या. शेवटी आम्ही कॅनॉलवर पोहोचलो तिथे मी त्यांना आज काय घडलं ते सांगितलं. आणि बाप्पाने कसं फसवलं आणि कसा गायब झाला हे देखील तिखट मीठ लावून सांगितलं. त्याच्याशी मी आता कध्धी कध्धी बोलणार नाही. असं ठणकावून सांगितलं.. बाई म्हणाल्या.. "अरे वेड्या बाप्पावर असं कुणी कधी रागावतं का? त्याला कुणीतरी अचानक बोलावलं असेल मंदिरामध्ये.. त्यालाही काम आहेतच की? की तुझ्याबरोबरच फिरणार आहे. "

मला हा युक्तिवाद पटला. शेवटी म्हणाल्या.. "आज घरी जाताना बाप्पाला भेटून जा.. . आता घरी चल तिथे कपडे बदलूयात ".. मी हो म्हणालो. मला आता बाप्पाशी मांडवली करावी लागणार होती. मोठ्या बाईंचा शब्द खाली पडू द्यायचा नव्हता. तरीसुद्धा त्याच्याशी बट्टी करण्याअगोदर मला एकदा तरी त्याच्याशी समोरा समोर भांडायचं होतं. त्याने मला सॉरी म्हणायचं होतं आणि मी त्याला मोठ्या मनानं माफ करायचं होतं. आशीर्वाद देताना तो हात वर करतो अगदी तस्स !!



मोठ्या बाईचं घर टुमदार बंगलेवजा होतं. मोकळया जागेत वाफे करून त्यात झेंडू, शेवंती, मोगरा अशी बरीच फुलझाडं लावली होती. प्रवेशद्वारासमोर मोठा पोर्च होता. त्याला लागूनच एक पडवीवजा तीन बाजूनी मोकळी जागा होती. त्याच्या छताला एक झोपाळा लटकवलेला होता. एका वेळी कमीत कमी तीन ते चार माणसं बसू शकली असती. इतका तो मोठा असावा. मोठ्या बाई मला घराबाहेर असलेल्या न्हाणीघरात घेऊन गेल्या. तिथे मला येथेच्छ अभ्यंग स्नान घातलं आणि टॉवेल मध्ये गुंडाळून घरामध्ये घेऊन गेल्या. त्यांच्या मुलाचे कपडे मला थोडे मोठे होत असले तरी चालण्यासारखे होते. मी ते घालून कोचावर बसलो.

बाई काही कामानिमित्त आत गेल्या. मी इकडे तिकडे पाहू लागलो. तर कोपऱ्यात एक मनीमाऊ दूध पीत बसली होती. मी तिच्याजवळ जाऊन तिच्यात रमलो. तितक्यात शिपाई आईला घेऊन परतला. “आता पोराने काय नवीन उद्योग करून ठेवला? “ असे काहीसे अविर्भाव तिच्या चेहेऱ्यावर झळकत होते. शिपायानी तिला झोपाळ्यावर बसायला सांगितलं.

तेवढ्यात मोठ्या बाई स्वयंपाक घरातून बाहेर आल्या. त्यांच्या हातात चहा आणि मारी बिस्किटाचा ट्रे होता. समोरच्या टेबलवर ठेवत त्या आई शेजारी बसल्या. आता काय अघटित ऐकायला मिळणार म्हणून आईच्या चेहेऱ्यावर काळजी स्पष्ट दिसत होती. इकडे विषय कसा सुरु करावा हा विचार मोठ्या बाईंच्या मनात सुरु होता. त्यांनी आईला चहा-बिस्किटं घ्यायला सांगत वातावरणातला ताण कमी केला. आणि मग फारसं तपशिलात न जाता आईला शाळेत झालेला इतिवृत्तांत कथन केला. घाबरून जाण्याचं कारण नसल्याचंही विशेषत्वानं नमूद केलं. मोठ्या बाई म्हणाल्या.. “ह्या मुलाचं कल्पनाविश्व अतिशय समृद्ध आहे.. तर भावविश्व तरल.. फारच मनस्वी, हळवं आणि संवेदनशील व्यक्तिमत्व लाभलंय त्याला. तुम्हाला जरा जपून हाताळावं लागेल. ह्या शाळेत ह्याच्या मानसिक गरजा पूर्ण होतील असं वाटत नाही. तुम्ही त्याला एखाद्या शहरी शाळेत का टाकत नाही? “

आईला हे मनोविश्लेषण कितपत समजलं हे ठाऊक नाही. ती म्हणाली “ह्याच्या उचापतींवरून तरी तसं वाटत नाही. रोज काहीतरी नवीन लचांड घेऊन येतो. माझ्याशी फारसं बोलतही नाही. मला कसं कळावं? “ आपला मुद्दा पुढे रेटत म्हणाली, “हळवा म्हणावं तर जसा निगरगट्ट वायफट वागतो त्यावरून ह्याला काळीज आहे की नाही याची शंका येते. याला कुणाचीच पर्वा नसते. मी तर ह्याच्यापुढे हात टेकलेत. आता तुम्हीच मार्ग सुचवा. “ आईने आपली कैफियत मांडली. बाई म्हणाल्या “मी काय मार्ग काढणार? मार्ग तुम्हालाच काढावा लागेल?

पण त्याच्या बाह्य वर्तनावर जाऊ नका. त्याचं अंतरंग जाणण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला मार्ग आपोआप सापडेल “.

आई आणि बाई दोघी बराच वेळ अश्या गप्पा मारत राहिल्या.. बाई माझं मानसिक पृथःकरण करत होत्या. तर आई भौतिक पृथःकरण.. आई रोगाची लक्षणं सांगत होती तर बाई रोगाचं निदान करत त्यावर इलाज शोधत होत्या.. त्यामुळे एका अर्थानं त्या दोघी परस्पर विरोधी ग्रहांवर विहरत होत्या.. मी मात्र छानपैकी या पृथ्वीतलावर मनीमाऊ बरोबर गुजगोष्टी करण्याचा अवर्णनीय आनंद घेत होतो. कधी तिचं दुधाचं भांडं पुढे ओढ कधी मागेच ढकल असलं काहीतरी. त्यामुळे ती वैतागली होती. मधूनच ती “म्याव” करायची. आमची ही जुगलबंदी अशी बराच वेळ सुरु होती. शेवटी “ह्याच्या नादीच लागायला नको” अशा अविर्भावात जिभल्या चाटत आणि आपल्या मिशा कुरवाळत ती तिथून पसार झाली.

बाई पुढे म्हणाल्या “मुलगा संवादोत्सुक आहे. फक्त त्याच्या कलाने घ्यायला हवं.. त्याला त्याच्या परिघामध्ये अतिक्रमण चालत नाही. मग तो बिथरतो. तिथे हळुवारच शिरकाव करावा लागतो. जमेल तुम्हाला हळू हळू”.. बाईंचा हा उपदेश आई एखाद्या सद्गुरू प्रवचनाप्रमाणे मंत्रमुग्ध होऊन ऐकत होती. तिच्यावर त्यांच्या वाणीचा प्रभाव पडला असला तरी ते अवजड मराठी आणि गहन विश्लेषण कितपत गळी उतरलं हे समजायला मार्ग नव्हता. पण हा इतका बोलघेवडा आहे आणि ह्याचा मनात इतकं काही सुरु असतं ह्याची तिला पहिल्यांदाच जाणीव होत होती. आजवर रगेल धोंडा आणि बनेल कार्ट एवढाच माझा नावलौकिक होता. मी प्रयत्न करून पहाते असं आश्वासन देत आईने बाईंचा निरोप घेतला. बाई मात्र माझ्याकडून दुसऱ्या दिवशी बाप्पाला न चुकता भेटण्याचं वचन घ्यायला विसरल्या नाहीत.



रस्त्यातून चालताना आईचं कुठेच लक्ष नव्हतं. मला एका हाताला धरून ती आपल्याच विचारात पुढे चालली होती. तिचं विचारचक्र तिला भलतीकडेच घेऊन जात होतं. मी बाईंकडे मनातलं इतका घडाघडा बोलतो. कितीही झाल्यातरी त्या परक्याच. मग ह्याला माझ्यासोबतच बोलायला काय होतं? मी काय खाणार आहे का ह्याला? मी आधीच तिला “राजुच्या आई” असं संबोधून तिच्या माझ्यात एक अंतर ठेवलं होतं.

आपण आपल्याच पोराच्या मनात आईचं प्रेमळ स्थान निर्माण करू शकत नसल्याचं तिला राहून राहून वैषम्य वाटत असे. तिनं कितीही जवळ येण्याचा प्रयत्न केला तरी मी ती संशयास्पद हालचाल समजून हाणून पाडीत असे. इतर कौटूंबिक कलह, घरातल्या अडीअडचणी, कुणाच्याही मदतीशिवाय घराला काडी काडी जोडून ती आधीच मेटाकुटीला आली होती. त्यात पोराने तिला असं दूर लोटणं म्हणजे तिच्या भळभळत्या जखमांवर मीठ मिरची लावण्यासारखं होतं. आपलंच रक्त आपल्याला आपलंस करता येत नसल्याचा तिला प्रचंड विषाद वाटे.

त्यादिवशी देखील हेच घडलं.. ती मला घरी घेऊन आली आणि एका कोपऱ्यात सुन्न होऊन बसली. तिला माझ्या वागण्यावर तोडगा सापडत नव्हता. डोक्यात विचारांचाही प्रचंड गुंता झाला असावा. आपल्या आईला आपल्या मनातली गोष्ट सांगण्याऐवजी ती दुसऱ्या कुठल्यातरी तिऱ्हाईताला सांगण्यात येते. ही बाब तिला स्वस्थ बसू देत नव्हती. ह्या सगळयाचं नकळत एका अनामिक क्रोधामध्ये रूपांतरण होत होतं. काही वेळाने तिला ते सहन होईना.

तिने नेहमीप्रमाणे मोठ्यांदा बडबडीला सुरुवात केली. “लोकधार्जिणं आहे मेलं.. घरात आल्यावरच ह्याची दातखीळ बसते. नाही तर साऱ्या जगाला मस्तकीची रेघ न रेघ सांगतो. आई म्हटलं कि ह्याची वाचा जाते. बापही तसलाच. . बाहेरच्यांवर शेकडो रुपये उधळेल, पण घरात काही करायचं म्हटलं की त्याला काटकसर आठवते. “ त्यावेळी उधळण शेकडो मध्येच गणली जायची. पगार अजून हजारांमध्ये गेला नव्हता. तिची ही बडबड अशीच बराच वेळ सुरु होती. मी आता हा महापूर दुर्लक्षित करण्यात पटाईत झालो होतो. त्यामुळे माझ्या कानावर पडून देखील मला फारसं काही ऐकू येत नव्हतं.

मला वेध लागले होते ते बाप्पाला भेटण्याचे. तोही मला भेटण्यासाठी तितकाच आतुर झाला असणार अशी मला आशाच नव्हे तर दोनशे टक्के खात्री होती. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी शाळेला जाण्याअगोदर मी मंदिरात गेलो. मंदिरात कुणीच नव्हतं. अगदी पुजारी सुद्धा. त्याच्याकडे रोखून पाहत “आज खुश तो बहुत

होगे तुम.. " ह्या थाटात मी गाभाऱ्यात प्रवेश केला. मी जस जसं त्याच्या जवळ जात होतो तस तसं माझ्यातील तामस भाव गळून पडत होता. सकाळी सकाळी त्याचं रुपडं अजूनच मोहक वाटत होतं. डोळयात तेच मिश्किल भाव अन चेहेऱ्याची निर्मळ अभिव्यक्ती मला बाहेरून शांत करत होती. मला काही केल्या त्याच्यावर रागावता येईना.

पहिल्यांदा माझे मनातील विचार आणि देहबोली ह्यांचा मेळ बसत नव्हता. त्यामुळे मी मनातून चडफडत होतो. माझ्या आवेगाला कुणीतरी साखळदंडाला बांधून आवरू पाहत होतं. गाभाऱ्याच्या जाळीदार खिडकीमधून त्याच्यावर पडणारी कोवळी सूर्यकिरणं त्याच्यामागे प्रभा पसरवत होती. माझी पुरती नजरबंदी झाली होती. मी खुळयासारखा एका जागी थिजल्यासारखा झालो होतो. माझं आजूबाजूचं भान पूर्णतः विरलं होतं. दुसऱ्याच क्षणी माझ्या डोळयातून घळाघळा अश्रू वाहू लागले.

त्यावर माझं अजिबात नियंत्रण नव्हतं. समोरची श्रींची मूर्ती डोळयासमोरून धूसर-पुसट होत गेली. सूर्यकिरणांच्या त्या प्रकाशझोतामध्ये डोळयांमधले जलबिंदू पहाटेच्या दवबिंदू प्रमाणे चमकत होते. मला शरीराची जाणीव अशी उरली नव्हती. मनाची मात्र ससेहोलपट होत होती. माझी छाती दडपून गेली. जीव कासावीस होत होता. हे माझ्यासाठी भयंकर आणि त्या वयाला न झेपणारं होतं. त्या भारलेल्या अवस्थेत मी किती काळ होतो ते ठाऊक नाही पण भानावर येताच पुढचा मागचा विचार न करता मी सरळ तिथून पळ काढला. त्यानंतर कित्येकदा मी त्या मंदिराला भेट दिली पण सभामंडपातूनच नमस्कार करून मी आल्यापावली परतत असे. पुन्हा त्या गूढ गाभाऱ्यामध्ये पाऊल ठेवण्याची माझी हिम्मत झाली नाही.



आठवडाभर पहिलीच्या बाई शाळेत येत नव्हत्या. इतर शिक्षक त्यांची उणीव कसेबसे भरून काढत होते. एका अर्थाने आम्हा लोकांना सुट्टीच होती. मला फारसा फरक पडत नव्हता. कारण तसाही माझं अभ्यास सोडून इतर बाबीत जास्त लक्ष असे. पण इतर पोरांचं अभ्यासाचं नुकसान होत होतं. पुढच्या सोमवारी मोठ्या बाई एका अनोळखी बाईंना वर्गात घेऊन आल्या. सगळी मुलं उठून उभी राहिली. प्रथेप्रमाणे “एक साथ नमस्ते” चा जयघोष झाला. मोठ्या बाईंनी खाली बसण्याची खूण करत नव्या बाईंची ओळख करून दिली. “ह्या तुमच्या नवीन बाई.. सुलभा चांदेकर. आजपासून ह्या तुम्हाला शिकवतील. “ नवीन बाईंनी मोठ्या बाईंचे आभार मानले. दोघी आपापसात काहीतरी कुजबुजलया. नवीन बाईंनी माझ्याकडे एक कुतुहूल मिश्रित कटाक्ष टाकला. मोठ्या बाईंनी माझ्याबद्दलच काहीतरी कानमंत्र ह्या नव्या कोऱ्या बाईंना दिला असावा असा मी कयास बांधला. “आपल्याला काय?“ अशा अविर्भावात मी त्याकडे दुर्लक्ष केलं.

नवीन बाई खूपच टापटीप आणि नावाप्रमाणे सुलभ होत्या. आधीच्या बाईंपेक्षा कितीतरी तरुण आणि तरतरीत. पहिल्या बाई म्हणजे फारच गुळमुळीत आणि चिरक्या आवाजाच्या होत्या. त्यांना मुलं फारसा भाव देत नसत. माझ्या आणि त्यांचा तर छत्तीसचा आकडा होता. त्यामुळे त्यांनी मोठ्या बाईंकडे माझं नियमित खातंच उघडलं होतं. ह्याउलट नवीन बाई म्हणजे टवटवीत फुल म्हणायला हव्या. नुकत्याच अध्यापक विद्यालयातून नोकरीवर रुजू झाल्याने त्यांनी अजूनही दोन वेण्या ठेवल्या होत्या. एकंदर बाईंचं व्यक्तिमत्व प्रसन्न, आल्हाददायक आणि कुणालाही आपलंस करेल असं लोभस जाणवत होतं. त्यादिवशी बाई थोडा वेळ आमच्यात मिसळल्या. काही जणांची ओळख करून घेतली. माझी कीर्ती त्यांच्यापर्यंत बहुदा अगोदरच पोहोचली असावी. माझ्या जवळ येत म्हणाल्या.. "तुझ्याबद्दल बरंच ऐकलं आहे.. तुझी ओळख करून घेण्याची गरज नाही. " माझ्या चेहे़ऱ्यावर.. "बरं तर मग राहिलं ! " असले काहीतरी भाव उमटले होते. त्या दिवशी त्यांना नोकरीवर रुजू होण्याचे आणखी काही सोपस्कार पुरे करायचे असावेत म्हणून त्यांनी आमची लगेचच रजा घेतली.

दुस़ऱ्या दिवसापासून बाई आम्हाला नियमित शिकवू लागल्या. आल्या आल्याच त्यांनी शिकवण्याच्या पद्धतीत काही आमूलाग्र बदल घडवून आणत अगोदरचे बरेचसे शिरस्ते मोडीत काढले. जुन्या बाई सगळयांना रांगेत बसवून फळयावर लिहून शिकवत. नव्या बाईंनी पहिल्यादा रांगेचा नियम धाब्यावर बसवला आणि आम्हाला वर्गात रिंगण करून गोल बसायला सांगितलं. आणि त्या मध्यभागी फतकल मांडून बसल्या. त्यांनी फळयावर कधीही लिहिलं नाही. एका हातात पुस्तक आणि दुस़ऱ्या हातात पट्टी घेऊन त्या त्यांच्या सुरेल आवाजात आम्हाला धड्यातल्या गोष्टी आणि कविता शिकवत. कविता आणि गाण्यांना त्या स्वतः चाली लावत. मग आम्ही त्या सुरात म्हणत असू. कित्यकवेळा त्या बाहेर झाडाखाली आमचा वर्ग भरवीत असत. त्यांना तसाही फळा लागत नसल्याने मध्ये एक खुर्ची बसायला टाकली की त्यांचं काम भागे. कधी कधी त्या आम्हाला

आजूबाजूच्या परिसराचं निरीक्षण करण्यास भाग पाडत. आणि मग फळं, फुलं, पक्षी, प्राणी, पिकं, झालंच तर वेळी आणि झाडी ह्याची माहिती आमच्याकडून काढून घेत. शिकवण्याची एक वेगळीच पद्धत त्यांनी अवलंबली होती.

दुसऱ्या हातात लाकडी पट्टी असली तरी त्यांनी कुणालाही कधी बडवलं नाही. उलट कधी कुणाकडून अक्षम्य चूक झाली तर त्या पट्टी त्याच्याकडे देत आणि स्वतःचा हात पुढे करून म्हणत. “हं ! कर मला शिक्षा.. तुला शिकवता येत नाही ना मला? “ मुलगा आपोआप ओशाळत असे. माझ्यावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केलं. पूर्वीच्या बाई मला जितकं टाळता येईल तितकं टाळायच्या पण त्यांना ते शक्य होत नसे. ह्यांनी मला केंद्रस्थानी आणून बसवलं. त्या माझ्याकरवी छोटी छोटी काम करवून घेता घेता मला गुंतवून ठेवू लागल्या. त्याचा परिणाम असा झाला की मला दुर्लक्षित जागेवरून माझे इतर उद्योग करायला वेळच मिळेनासा झाला आणि आपण नकळत जखडले गेलो आहोत हेही जाणवेनासं झालं. हळू हळू मी बाईंचा लाडका आणि त्या माझ्या लाडक्या बाई होऊ पाहत होत्या.

एक दिवस शाळेचा दिवस असला तरी बाबांना सुट्टी होती. आई घरकामात व्यस्त होती. कुठलातरी समारंभ असल्याने तिने बाबांना मला शाळेतून लवकर घरी आणण्यासाठी पिटाळलं. बाबा मला घ्यायला आले. बाई वर्गात शिकवत होत्या. त्यांनी बाहेर येत काय हवं याची विचारणा केली. बाबा त्यांच्याकडे पाहून हसले आणि मुलाला घ्यायला आलो असल्याचं कारण सांगितलं. बाईंनी मला लगेच आतून बोलावून घेतला. मी बाबांच्या बाजूला उभा राहिलो. मग बाबांनी बाईकडे माझ्या अभ्यासाची कधी नव्हे ते चौकशी केली. बाई देखील माझ्याबद्दल भरभरून बोलल्या. त्यांचा हा सुसंवाद बराच वेळ सुरु होता. अधून मधून ते एकमेकांना हसून दाद देत होते. इकडे मी बाबांना घरी जाण्यासाठी ओढत होतो. कारण मला बाबांविषयी थोडीशी असूया वाटत होती. आमच्या बाई आणि मी ह्यांच्यामध्ये मला आणखी कुणी येऊ द्यायचं नव्हतं. त्यांचं बोलणं विस्कळीत

होत असल्याने बाबा मला एका जागेवर स्थिर राहण्याविषयी दटावत होते. शेवटी दोघांचं संभाषण एकदाचं संपलं. मी सुटकेचा निश्वास सोडला.

महामार्ग ओलांडून देत बाबांनी मला घरी जाण्यास सांगून काहीतरी चीजवस्तू आणायला निघून गेले. मी घरी पोहोचलो तेंव्हा आई काम उरकून इतर बायकांचा अड्डा जमवून गप्पा मारत बसली होती. मी आल्या आल्या दप्तर आणि बूट एका बाजूला ठेवत आईला फर्मावलं.. “ओ राजुच्या आई. तुमच्या नवऱ्याला पुन्हा माझ्या शाळेत पाठवू नका” आईने अचंब्याने चौकशी केली.. “का रे बाबा? “ मी गुश्यात म्हणालो.. “ते आमच्या बाईंकडे बघून गालातल्या गालात हसतात. उद्या बाईंना घरी घेऊन आले तर मला सांगू नका. “ आईने तोंडात बोट घातलं तिला काय बोलावं हे सुचेना. इकडे बायकांची हसून हसून मुरकुंडी वळली होती. पुढचे कित्येक दिवस चाळीतल्या बायका आईला.. “बघा बरं राजुच्या आई. जरा सांभाळून, नाहीतर घरात सवत यायची. पोरानी आधीच इशारा देऊन ठेवलाय” असं येता जाता चिडवत होत्या.



दर दोन चार महिन्याला निरनिराळी कारागीर मंडळी चाळीतून फिरायची. जवळच ओढा आणि एक दोन पडकी बेवारस घरं असल्याने तिथे आडोसा घेत कमीत कमी तीन चार दिवस तरी ही मंडळी मुक्काम ठोकून असायची. हे आजूबाजूच्या वस्तीवाल्यांना देखील माहित असल्याने केवळ चाळीतीलच नाही तर आजूबाजूच्या दोन-तीन मैलावरील पब्लिकदेखील आपआपली काम येता जात करवून घेत.

ह्या कारंगिरांमध्ये निरनिराळया कौशल्यांचा समावेश असे. म्हणजे बोहारिन, वडार समाज, फण्या सुई विकणाऱ्या बायका इत्यादी इत्यादी.. चाकू, सुऱ्या, कात्रींना धार लावण्यासाठी एक माणूस सायकलला एक भलं मोठं धार लावण्याचं चाक लावून नेहमी फिरत असे. सायकल मधल्या स्टँडला लावून मागच्या सीटवर बसत तो पेडल चालवायचा आणि धार बोथट झालेली वस्तू काही सेकंदात पुन्हा धार धार होत चकाकू लागे. धार लावताना चाक आणि वस्तूच्या घर्षणामुळे उडणाऱ्या ठिणग्या हा कुतूहलाचा विषय होता. तो पुढच्या हॅण्डल ला रद्दीच्या पेपराचा एक गठ्ठा घेऊन फिरे. कात्रीने कागद कापून तिला व्यवस्थित धार झाली आहे हे दर्शवण्यासाठी. दुसऱ्या बाजूला कधी कधी कापडाचा ढीगही दिसायचा. आम्ही ती गम्मत पाहत तासंतास तिथे उभे राहत असू.

बोहारीन हा तर आमच्या जिव्हाळयाचा विषय. कारण जुन्या कपड्याच्या बदल्यात नवीन अलुमिनियमची भांडी मिळत. कशाच्या बदल्यात किती मोठं किंवा किती भांडी मिळतायेत ह्याची आम्हाला फार चौकशी. बायका तिच्याशी तावातावाने भांडत. बोहारीणही सगळयांना पुरून उरे. हे कापड कसं जीर्ण झालंय किंवा हा शर्ट कसा कुणी दोन रुपड्यालाही विकत घेणार नाही अशी आपली बाजू मांडे. शेवटी कसाबसा त्यांच्यात सौदा ठरत असे. बाजारात घासाघीस करण्याचा तो एक उत्तम नमुना होता.

डोक्यावर भला मोठा झाप घेऊन कंगवा फणी विकणाऱ्या बायकांचंही तसंच. त्यात शक्यतो अविवाहित तरुण मुलींचा भरणा असे. “कंगवा घ्या, फणी घ्या, बिबं घ्या, घोट्याला चमेलीचं तेल घ्या.. सुई घ्या, पोत घ्या.. गळयातलं मणी ववून घ्या.. “ असा पुकारा करत त्या दिवसभर फिरत असतं. त्यांच्या पैकी बऱ्याच जणींचं औंदालाच लगीन असायचं त्यामुळे पुन्हा येणार नाही असं सांगत पुढच्या वर्षी पुन्हा दिसायच्या. तरी सुद्धा ही शेवटचीच भेट असल्याने आणि लग्न ठरल्यामुळे त्याला हातभार म्हणून काहीतरी घ्याच अशी सरळ सरळ गळ

घालायच्या. बऱ्याच बायका ह्या भावनिक आव्हानाला बळी पडायच्या. कोण कुणाची पोर.. आपली असती तर केलंच असतं की म्हणून निदान सुई दोरा तरी नक्की घ्यायच्या. दोऱ्यामध्ये छोटे मोठे काळे मणी ओवताना त्यांना कमालीचा उरक असे. केवळ पाच दहा मिनिटामध्ये एखादी लांब मोठी पोत ओवून चटदिशी हातावेगळया करत. आजूबाजूला इतकं तोळाभर सोनं पाहून देखील त्यांचं मन त्याच्यावर गेल्याचं कधी पाहण्यात आलं नाही. तशी फार प्रामाणिक जमात.

बरेचदा वडार समाजातील बायका पाट्या वरवंट्याला नाहीतर दगडी खलबत्याला टाके मारण्यासाठी आवाज देत अंगणात दोन पायावर उपड्या बसत. त्यांना पैशाची अपेक्षा नसे. एका वेळचं जेवण आणि पोराबाळांना एखादं जिन्नस बांधून दिलं तरी त्यांचं समाधान होत असे. टाके मारताना त्या तोंडावर पदर बांधत. बरेचदा त्याच्या अंगावर चोळी नसे. त्यामुळे टवके डोळयात जाण्याच्या भीतीने आणि त्यांच्या विचित्र पोषाखामुळे आई आम्हा लोकांना घरात पिटाळीत असे.

त्यांची नवरे मंडळी आजूबाजूच्या परिसरात डुक्कर आणि तत्सम एखादं जनावर पाहिलं का? ह्याची चौकशी करीत. कुणी तशी खबर दिलीच तर मग त्या मुक्या जित्राबाला पकडण्यासाठी जीव घेऊन मागे लागत. निरनिराळे सापळे आणि क्लुप्त्या लावत त्याला जेरबंद करत. जनावर एकदा सापळयात अडकलं की मग जिवाच्या आकांताने ओरडे. बहुतेक वेळा त्याला एखादी गंभीर दुखापत किंवा मग त्याचा एखादा अवयव निकामी झालेला असल्यामुळे सर्रास तो आपला जीव गमावे. एखाद्या झाडाच्या फांदीला त्याच्या चारी पाय बांधून त्याला उलट पकडत त्याची चाळीतून वरात काढली जाई. डुकराने फारच उच्छाद मांडून जिणं हराम केलेलं असेल तर काही महाभाग त्या टोळीच्या हातात दोन चार रुपये टाकत. पोटापाण्याच्या सोई बरोबरच अशी त्यांची वरकमाई होत असे.

त्यावेळी चादरी, रजई अन सतरंजी ह्यांचा जमाना अजून यायचा होता. फार फार तर चटई अन सोलापुरी चादरी ह्या नुकत्याच लोकप्रिय होऊ घातल्या

होत्या. आपण जुने कपडे, साड्या, सुई दोरा पुरवला तर आपल्या अंगणातच ही जमात आपल्याला हवी तशी गोधडी, उश्या अन दुपटी शिवून देत असे. ह्या कौशल्यात अतिशय पारंगत असल्याने बोटांना सुई टोचू नये म्हणून एक चिंधी बांधत दोन ते तीन दिवसात दिलेलं सगळं काम त्या संपवत असत. द्याल तेवढे पैसे आणि रोज सकाळ दुपारचं जेवण असा त्यांचा सर्वसाधारण मोबदला असे.

वयाने बऱ्याच अनुभवी असल्याने त्यांच्याकडे हमखास बऱ्याच गोष्टी आणि किस्स्यांचा साठा असे. काम हे काम वाटू नये म्हणून त्या बरेचदा सुरेल आवाजात पारंपरिक लोकगीतं गात असत. बरीच मंडळी त्यांच्या सभोवती कोंडाळं करून बसत ह्या फुकट संगीत मैफिलीचा आनंद घेत असत. लहान सहान पोरांना सुई टोचेल म्हणून त्या गोधडीवर फिरकू देत नसत. बच्चेकंपनीला खुश ठेवण्यासाठी मग त्या गुदगुल्या करीत विनोदी किस्से सांगत. बरेचदा आजीबाईंच्या पोतडीतले किस्से हे श्रवणीय असत. त्यात खूपदा पौराणिक कथांची भरपूर पेरणी असे. आजच्या काळात एखादी कथा कशी लागू पडते हे पटवण्यात त्यांचा हातखंडा होता.

थंड बोचऱ्या थंडीमध्ये रात्री व पहाटे पहाटे ह्या उबदार गोधड्यांची खरी किंमत कळायची. मग एखाद्या आजीबाईने सांगितलेला विनोदी किस्सा किंवा विचारात पडणारी एखादी विस्मयकारक पौराणिक कथा आठवत त्या आजीच्या मायेच्या उबदार गोधडीत केंव्हा झोप येई त्याचा पत्ताच लागत नसे. निव्वळ माणुसकी जपणारी, एकमेकांना जगवणारी, एकमेकांची सुखदुःख वाटून घेणारी, इतक्या उत्कृष्ट परस्परावलंबित्वाची ह्यावरून दुसरी चांगली उदाहरणं निदान माझ्यातरी पाहण्यात नाही.



दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी चाळीत येणारा साडीवाला म्हणजे बायकांचं विशेष आकर्षण होता. दहा तारखेपर्यंत बहुतेक बायकांच्या नवऱ्याचे पगार झाले असल्याने. त्यांच्या हातात थोडे का होईना पण पैसे खुळखुळत असत. बरेचदा इतके तिकडे फडताळात लपवलेलं गुप्तधन देखील अश्यावेळी उघड होत असे. त्यामुळे चातकाप्रमाणे त्या ह्या लक्ष्मण भाऊंची वाट पाहत असत. लक्ष्मण भाऊ म्हणजे एक पात्रच होतं. बायकांच्या आवडी-निवडी हाताळण्याची कला त्याच्या अंगी उपजतच होती. सगळया बायकांचा तो लाडका लक्ष्मणभाऊ होता.

इतर दिवशी कुठल्या तरी फॅक्टरीत कामाला जाऊन शनिवार रविवारी तो हा जोडधंदा करीत असे. मुंबईवरून बाबुभाई भवानजी सारख्या नावाजलेल्या

दुकानांतून तो उच्च प्रतीचा माल स्वतः एक एक पीस चेक करून खरेदी करतो असं तो अभिमानाने सांगायचा. खरं खोटं त्यालाच माहीत. मला परत परत इथेच यायचं असल्याने मी तुम्हाला फसवीनच कसा? असा बिनतोड सवाल तो बायकांना करीत असे. बायका त्याच्या ह्या आश्वासिकतेला भुलत असतं. मग दर्जाबाबत त्याच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवलाच म्हणून समजा. क्वचित एखादी साडी बदलून देखील देई.

लक्ष्मणभाऊ गाय छापची जाहिरात असणाऱ्या ताडपत्री पिशव्या भरून साड्या आणायचा. सायकलीच्या हॅण्डलच्या दोन्ही बाजूला पिशव्या पुन्हा मागे कॅरेजला एक भलं मोठं गाठोडं बांधलेलं आणि मधोमध सीटवर पेडल मारणारी लक्ष्मणभाऊंची ठुसकी ठेंगणी मूर्ती चाळीत अवतरताना पहिली की बायका हरकून जात. हातोहात खबर साऱ्या चाळीत पोहोचवली जाई. दहा बारा बायका त्याच्यासमोर कोंडाळं करून त्याच्या कानात ओरडून आपापल्या फर्माईशी सांगत. कृष्णमुरारी नंतर इतक्या बायकांना एकावेळी लीलया कोणी हाताळू शकत असेल तर हाच. ह्याला इतक्या फर्माइशींच इतक्या पटकन कसं अचूक निदान करता येत हे मला एक कोडंच होतं. मग तो शांतपणे ज्याला त्याला हव्या असणाऱ्या साड्या गठ्ठयातून सोडवून पटापटा समोर फेकत असे. बायकांना आपल्या हातातली साडी सोडून बाजूचींच्याच हातातल्या साडीत स्वारस्य. “भला उसकी साडी मेरी साडीसे सफ़ेद कैसे? “ ह्या प्रश्नांकित चेहेऱ्याने.

तो ते पक्क ताडायचा आणि म्हणायचा.. “ताई तुम्हाला तीच शोभून दिसेल. रंग अगदी फ्रेश आहे.. कलर तर विचारूच नका.. उठून दिसेल. “ ती खुश व्हायची. समोरचीला सुद्धा हिच्या हातातली साडी आवडल्याने मग साड्यांची अदलाबदल होई. लक्ष्मणभाऊ बरेचदा आपल्या अंगावर साडी टाकून दाखवत. अगदी बायकी हावभाव करत. ह्या नवीन साडीमध्ये तुम्ही कश्या गौराई दिसाल.. हिचं सूत कसं उच्च प्रतीचं आहे. ही कशी अगदी लेटेस्ट फॅशनची आहे.. तीनशे रुपयाची साडी तुमच्यासाठी म्हणून सव्वाशे दीडशे ला कशी पडेल. असे वेगवेगळे

दाखले देऊन बायकांना भरीस पाडत असे. कित्येक नवऱ्यांना ह्या खुस्कीच्या खरेदीचा पत्ता नसे. मग नवऱ्याला ह्या साडीखरेदीचा सुगावा न लागू देण्याच्या अटीवर काही साड्या खरेदी केल्या जात. त्यामुळे चाळीतल्या बायकांचा लक्ष्मणभाऊ हा भलताच हमराज होता.

दिवाळी दसरा आला की ओढ्याच्या बाजूला एक कल्हईवाला हमखास डेरा टाकायचा. भांड्या कुंड्यांची साफसफाई हा सणासुदीपूर्वी फार मोठा सोहळा असल्याने त्याच्याकडे तांब्या-पितळयेंच्या भांड्यांना कल्हई लावून घेण्यासाठी कच्चून गर्दी होत असे. आपल्या घोट्याश्या भट्टीचा हॅण्डल जोरजोरात फिरवत तो कोळसा फुलावयाचा. त्यावेळी आजूबाजूला विस्तवाच्या ठिणग्या उडत. एकदा कोळसा लालेलाल झाला की त्यावर तो कल्हईचं भांडी उपडी ठेवायचा. ती एकदा योग्य प्रमाणात गरम झाली की भांड्यात किंचितसा कल्हईचा धातू टाकत फडक्याने ते भांडं पटकन पुसून घ्यायचा. काळवंडलेलं भांडं दुसऱ्याचं क्षणी चांदीप्रमाणे लखलखू लागे. मला तर तो भांड्याला झालेला परिस-स्पर्शच वाटायचा. हा प्रकार मला भलताच आवडे. कधी कधी मी त्याला हॅण्डल फिरवायला मदत करी. त्यामुळे ही सारी प्रक्रिया मला जवळून पाहता येत असे.

एक दिवस संध्याकाळी आईने लवकर स्वयंपाक उरकला. तिला बाबांबरोबर कुणाकडे तरी घरगुती कार्यक्रमाला जायचं होतं. त्यामुळे परतेपर्यंत पोरांना भूक लागली तर खायला काही असावं असा त्यामागचा विचार होता. भूक लागली तर केलेलं खा असं बजावून ती आणि बाबा समारंभाला निघून गेले. मला काही चैन पडेना. मला तो कल्हईवाला खुणावत होता. मी मोरीवर चढून सगळी तांब्या पितळेची भांडी खाली काढली. ज्या भांड्यामध्ये स्वयंपाक करून ठेवला होता त्याचं काय करायचं म्हणून मला प्रश्न पडला. मला नेहमीप्रमाणे क्लुप्ती सुचली. समोरच भाकरी थापण्याची काठवट (परात) होती. मी सगळया भाकरी, भाजी, भात, वरण अगदी सगळं सगळं त्यात उपडं करून भांडी रिकामी केली. परातीमध्ये सगळं अन्न एकत्र झालं. भाकरी, भाजी, वरण, भात सगळं एकत्र म्हणजे

एकदम गोपालकालाच. कशाचा कशाला मेळ नव्हता. सगळाच चिखल काही विचारू नका..

हा सगळा रिकाम्या भांड्यांचा लवाजमा एक एक करत मी कल्हईवाल्यापुढे आणून टाकला. त्याला वाटलं आई-बाबांनी पोराकरवी भांडी कल्हईला पाठवून दिली असतील. एवढी सारी भांडी पाहून त्याचा जीव हरकला.. त्याला भलताच आनंद झाला. परंतु दुर्दैवाने त्याच्याकडे तितका पुरेसा कल्हईचा धातू नसल्याने त्याने भांडी ठेवून घेतली आणि दुसऱ्या दिवशी यायला सांगितलं. मीं हिरमुसलो. आणि घरी निघून आलो. संध्याकाळी उशिरा आई-बाबा समारंभावरून परतले. बघतात तो काय घरातली जवळपास सगळी भांडी गायब. सगळं स्वयंपाक परातीमध्ये एकत्र केलेला. दोघांना काही उमजेना. काही वेळाने शॉक मधून बाहेर येत त्यांनी माझ्याकडे मोर्चा वळवला. मी केलेला कारनामा झटकन सांगून टाकला.

आईने आता स्वतःच्याच थोबाडीत मारून घेतली. आणि म्हणाली “अरे कार्ट्या ! मागच्याच महिन्यात करून घेतली ना कल्हई.. आता पुन्हा कशाला उपद्वाप केलास? बरं केला ते केला स्वयंपाकाची भांडी देखील रिकामी करून दिलीस? आता हा काला कोण खाणार आहे? “ त्याच्यावर माझं उत्तर मोठं मार्मिक होतं.. “अहो ! राजुच्या आई.. ते जेवण पोटात गेल्यावर एकत्रच होतं ना. मग आपण आधीच एकत्र केलं तर चांगलंच आहे की.. पोटाला त्रास नको मिक्स करण्याचा.. “ हे ऐकून आईची तर वाचाच बसली. बाबा तिकडे कोपऱ्यात उभे राहून गालातल्या गालात हसत होते. आमच्या बाईंकडे पाहून हसले तसे. दुसऱ्या दिवशी आमचा रुपेरी महाल कल्हई केलेल्या भांड्यांनी चमचम करत होता. सगळं घर कसं उजळून निघालं होतं. त्यापायी मी बाबांच्या खिशाला मोठं भगदाड पाडलं हा भाग अलाहिदा..



इतके सारे प्रयत्न करून सुद्धा पोरगं काही आगत नाही. त्याचे चित्र-विचित्र चाळे सुरूच आहेत हे ऐकून एकाने अजूनच एक टूम काढली. ती म्हणजे कुलदैवताला कैक वर्ष अव्हेरल्याची. दरवर्षी त्याला भेट देण्याची प्रथा असताना कित्येक वर्ष आम्ही त्याच्याकडे पाठ फिरवली असल्यामुळे त्याची अवकृपा माझ्या रूपात सर्वांना छळत आहे अश्या धार्मिक अन दार्शनिक निष्कर्षापर्यंत ही मंडळी आली होती.

घर तेथे घराणे, घराणे तेथे कुळ, कुल तेथे कुळधर्म कुलाचार हा पाळलाच पाहिजे हा हिंदू संस्कृतीचा रिवाज आहे. कुलस्वामी श्रीखंडेरायाच्या कुलाचारांमध्ये 'जागरण' प्रमुख भाग आहे, जसा देवीच्या कुलाचारातील गोंधळ हा प्रमुख भाग आहे तितकेच महत्व जागरणाला आहे. असा पारंपरिक सिद्धांत माझ्या

चिंताक्रांत पालकांच्या मनावर ठसवण्याचा आला. त्यामुळे आता त्याच्या पायाशी माझं डोकं आपटण्यामध्ये काही अडचणी असल्यामुळे आमच्या कुलदैवतालाच जागरण गोंधळाच्या अनुषंगाने घरी पाचारण करण्याचा घाट रचण्यात आला. हे बाकी सोयीस्कर असतं. देवाला आगाऊ आमंत्रण दिलं की तो सगळी हातातली काम सोडून त्या रात्री तुमच्या दावणीला बांधला जातो. मग त्याच्याकडून हवं ते काढून घ्या.

घरात आता धार्मिक कार्याची लगबग सुरु झाली. बाबांना तातडीने रातोरात राजगुरूनगर जवळच्या लिंबगावच्या खंडोबाला धाडण्यात आलं. तिथे कायम वास्तव्य करणाऱ्या अस्सल गोंधळी मंडळीना रीतसर सौदा ठरवून घरी येण्याचं आग्रहाचं आमंत्रण देण्यात आलं. इतकंच काय अगदी खंडोबाच्या कानातही सांगण्यात आलं. परत येताना बाबा कान्हेसरच्या देवीला साकडं घालायला विसरले नाहीत. साऱ्या चाळीला सांगावा पाठवण्यात आला. मग ठरलेल्या दिवशी हे देवदूत आमच्या घरी अवतरले. त्यांच्या साऱ्या लावाजम्यासहित.. संबळ, कवड्यांच्या माळा, हळद, बुधली असं बरंच काही. आणि हो सोबतीला दोन मुरळी देखील आणल्या होत्या खंडोबापुढे नाचण्यासाठी. त्या रात्रीचं ते विशेष आकर्षण होतं. त्यासाठी प्रीमियम चार्ज आकारण्यात आला होता.

येण्यापूर्वीच बाबांच्याकडे कार्यक्रमाला लागणाऱ्या जिन्नसांची एक भली मोठी यादी सोपवण्यात आली होती. त्यांच्या म्होरक्याने मग यादीनुसार एक एक चीजवस्तू तपासून घ्यायला सुरुवात केली. मलाही नवीन कपडे घालून सजवण्यात आलं. अंगण चांगलं सारवून तिथे हा सारा डोलारा उभारण्यात आला. पाटावर स्वच्छ पीत वस्त्रावर धान्याचे अष्टदल काढून अथवा धान्याची रास करून त्यावर श्रीफळासहित कलश मांडला गेला. ज्वारीच्या पाच ताटांचा मांडव तयार करून त्यावर पुष्पमाला अडकवण्यात आली. विड्याच्या पानावर सुपारी ठेवून या चौकावर खंडोबाचा टाक मांडण्यात आला. अंधार पडेस्तोवर बरीच मंडळी जमा झाली. बऱ्याच मंडळींनी येताना आपआपली पांघरूनं सोबत आणली होती. पूजेची

पूर्वतयारी झाल्यानंतर थोडंसं खाऊन देवांच्या अधिकृत मंडळींनी पूजेला सुरुवात केली. आधी पोटोबा मग खंडोबा हे काही खोटं नाही. सर्वात आधी खंडोबाची छोटीशी मिरवणूक काढण्यात आली. चाळीला एक फेरफटका मारून ओढ्याजवळ एका बऱ्यापैकी मोकळया जागेवर येऊन सारी मंडळी थांबली.

ह्या शोभायात्रे दरम्यान माझ्याकडे एक पेटवलेली मशाल देण्यात आली होती. अधून मधून ती संबळाच्या तालावर नाचवण्याचा स्पष्ट संकेत देण्यात आला. मला ती सारी भारी गम्मतच होती. आता माकडाच्या हाती कोलीत म्हटल्यावर अजून काय अपेक्षा करणार? परंतु केवळ खंडोबाच्या कृपेने माझ्याकडून त्या दिवशी काही अघटित घडलं नाही. पूजेच्या आधीच माझ्यावर कुलदैवताची कृपा बरसू लागल्याची कुणकुण मला गर्दीतून ऐकू येत होती. ओढ्याशेजारील मोकळी जागा पाणी शिंपडून शेणाने सारवण्यात आली. तिथे पिठाच्या कणकेचा दिवा, अगरबत्ती लावून भाकरी भाजीचा नैवद्य दाखवण्यात आला. तिथले सगळे सोपस्कार आटोपून मग आल्या वाटेनेच मिरवणूक घरी परतली.

मला बाबांच्या शेजारी बसवण्यात आलं. पुन्हा माकडाच्या हातात कोलीत देण्यात आलं. कुणालातरी त्याच्यात अहोरात्र तेल घालण्याची ताकीद देण्यात आली. माझा उदबत्ती प्रताप सर्वश्रुत असल्याने माझ्याकडे काटेकोर लक्ष ठेवण्यासाठी एका विशेष व्यक्तीची नेमणूक करण्यात आली. सर्वात प्रथम इथून तिथून झाडून साऱ्या देव देवतांना गोंधळाला येण्याचं आमंत्रण देण्यात आलं. अर्थात त्यांच्या मध्ये कुलदेवी आणि कुलदैवत ह्यांना अग्रक्रम देण्यात आला हे वेगळं सांगायला नको.

“जेजुरीच्या खंडेराया जागराला या.. .. या.. . पालीच्या तुम्ही गणराया जागराला या.. .. या.. . अशा रितीने आवाहन झाल्यानंतर गण म्हंटला गेला. त्यानंतर भाविक भक्तांनी मांडलेल्या जागरण विधीमध्ये वाघ्या मुरुळी भक्तांच्यावतीने मल्हारी मार्तंडाला विनवणी सुरु केली.. .. “देवा तूची खंडोबा तुझा

त्रिभुवनी झेंडा रूप आगळे दिसे पिवळे नाव तुझे प्रचंडा हातामध्ये सोन्याचा खंडा हात जोडितो पदर पसरतो देवा येऊ नका रागा झोपले असतील भक्तांचे देवा व्हावे आता जागा.. " असा देवाला जागे करण्यासाठी पुकारा सूर झाला. खंडोबाचा येळकोट आणि देवीचा उदो उदो करत गोंधळी काकांनी डफ आणि संबळावर ताल धरला. हातात घंटी धरून मुरळ्या मुरकू लागल्या.

जसं जशी रात्र पुढे सरकू लागली तशी मंडळी पेंगू लागली. आई-बाबा यजमान असल्याने त्यांना ही सवलत नव्हती. माझ्या लक्ष ठेवून असणाऱ्या खबऱ्याने बाबांना हलवत मी पेंगत असल्याची वार्ता दिली. डोळ्यावर झोप आल्याने माझ्या हातातील पलिता केंव्हाही धाराशायी होण्याच्या मार्गावर होता. खबरदारीचा उपाय म्हणून तो माझ्या हातातून काढून घेण्यात आला. आणि गोंधळयांपैकीच एकाकडे देण्यात आला. मी बाबांच्या मांडीवर डोकं ठेवून झोपी गेलो. दोन चार अर्धवट झोपेत असणारी मंडळी आणि गोंधळी ह्यांच्या समोर मग मल्हार कथा ऐकवली गेली. संपूर्ण जागरण हे तीन ते चार तास सुरूच होतं.

सरतेशेवटी आरतीला पुन्हा सगळयांना उठवण्यात आलं. मी उत्सवमूर्ती असल्यानं माझ्या हातात आरतीचं ताट देत खंडेराया आणि देवीची आरती करण्यात आली. आता लंगर तोड साठी तयारी सुरु होती. गोंधळी मंडळींनी येतानाच आपल्या बरोबर एक लंगर तयार करून आणला होता. अंगणामध्येच एका बाजूला एक लोखंडी गज रोवण्यात येऊन त्याला हा लंगर अडकवण्यात आला. आधी त्यांच्यातील म्होरक्याने लंगर एका झटक्यात कसा तोडायचा ह्याचं प्रात्यक्षिक करून दाखवलं.

मग बाबांच्या मदतीने लंगर माझ्या हाती देण्यात आला. बाबांनी एकच हिसका दिला आणि लंगर तुटून बाजूला पडला. सगळीकडे एकाच जल्लोष झाला आणि सदानंदाचा जयजयकार आसमंतात घुमला. माझ्या मते मी माझ्या ह्या चिमुकल्या हाताने तो एवढा मोठा मजबूत लंगर तोडला होता.

पुढचे दोन दिवस मी छाती पुढे काढत आणि हाताचे दंड फुगवत सगळीकडे फिरत होतो. खंडेराया आणि यमाईची माझ्यावर कृपा झाली की अवकृपा हे थोड्याच दिवसात समजणार होतं. माझा पहिलीच निकाल जाहीर होणार होता. आता माझा जाहीर निकाल लागणार की परीक्षेला मी निकालात काढणार हे त्यावेळी तरी फक्त त्या खंडेरायालाच माहित होतं



चाळीमध्ये कधी भिकारी पाहिल्याचं स्मरणात नाही. पण भिक्षा मागायला इतर बरीच मंडळी यायची. ह्यातली बरीचशी निरनिराळ्या देवांच्या नावाखाली भिक्षा मागत. भिक्षा ही शक्यतो कुठला तरी शिधा नाही तर अन्नाच्या रूपातच दिली जायची. पैसे क्वचितच झोळीत पडायचे, मला जितकं कळत होतं त्यानुसार त्याची अपेक्षा देखील नसावी. कधी जोगतीण तिची परडी डोक्यावर घेऊन जोगवा मागत पिठासाठी फिरत असे तर कुणी तेल गोळा करण्यासाठी फेरफटका मारत असे. ह्या सर्वांची वेशभूषा बाकी पाहण्यासारखी असे. प्रत्येकाला एक विशिष्ट ओळख असायची. प्रत्येकाची भिक्षा पात्र देखील निरनिराळी.. कुणाची झोळी, कुणाची नारळाची करवंटी, तर कुणाचं अलुमिनियमच भिक्षा पात्र असे विविध प्रकार पाहायला मिळत.

दिवसाची सुरुवात अगदी पहाटे साडेपाचला येणाऱ्या वासुदेवाच्या "वासुदेव आला हो वासुदेव आला" ह्या पुकाऱ्याने होत असे. विशेषतः कडाक्याच्या थंडीच्या दिवसात ह्या माणसाला इतक्या लवकर कशी जाग येते? ह्याला कोण उठवतं? ह्याच्या कडे गजराचं चावीचं घड्याळ असेल का? त्याच्या आवाजाने आजूबाजूचे उठून त्यांची झोपमोड केली म्हणून त्याच्यावर रागावत असतील का? असे एक ना अनेक बालिश प्रश्न मला पडत. सणासुदीचे दिवस असल्याने त्यावेळी बायका अंगणात सर्रास शेणाचा सडा शिंपताना आढळत. एकदा का वासुदेवाच्या स्वारीने चाळीत प्रवेश केला की मग आमच्या मंडळींची झोप कुठल्या कुठे पळून जात असे. आम्ही चिल्ली पिल्ली त्याच्याभोवती रिंगण करून त्याला घेरत असू.

तो आम्हाला स्वतः भोवती गोल गोल गिरक्या घेत पारंपरिक रचना ऐकवत असे. एका हाताने चिपळी आणि दुसऱ्या हातात टाळ वाजवत आपल्या रसाळ ओघवत्या वाणीने वासुदेवाने ऐकवलेली कवनं आणि भजनं ही आजही त्या प्रसन्न सकाळची आठवण करून देतात. बरेचदा तो आम्हाला प्रसाद देखील वाटत असे. चाळीतले लोक त्याला यथाशक्ती एखादी शिधावस्तू स्वखुशीने देत असत. तोही आपली झोळी विनम्रतेने पुढे करत अगदी प्रसन्न मुद्रेने दिलं ते पावन करून घेत असे. त्याला शिध्यासाठी कधी कुणाशी वाद घालताना मी तरी पहिला नाही. त्याची मोरपिसांची टोकदार त्रिकोणी टोपी म्हणजे आमच्या विशेष आकर्षणाचा विषय होता. बरेचदा तो आम्हाला त्याच्या टोपीतलं एखादं मोरपीस वहीत किंवा पुस्तकात ठेवण्यासाठी आपणहून काढून देत असे.

जोगतिणीचं लग्न देवाबरोबर लावलेलं असत. किंवा लांब केसाचा जोगत्या हा देवाला वाहिलेला असतो. हा प्रकार त्यावेळी माझ्या कधीही डोक्यात बसला नाही. प्रश्न विचारून भंडावून सोडून देखील मला कुणाकडूनच समाधानकारक उत्तर मिळालं नाही. जोगत्याचे लांब केस तेलाने कायम माखलेले असल्याने त्याचा चेहरा देखील तेलकट दिसायचा. बरेचदा चाळीतली मंडळी

आपल्या पोरांना त्याला हवाली करण्याची धमकी देत. त्यामुळे तो आल्यावर लहान लहान पोरं घरात खाटेखाली दडून बसत.

दारात येणारे हिजडे म्हणजे पुरुष असून देखील बायकांचे कपडे का घालतात हा देखील त्या बालवयातला अनुत्तरित प्रश्न होता. त्याचं उत्तर टाळण्याकडेच सगळयांचा कल असायचा. पुरुष आणि बायका त्यांच्यापासून कासराभर दूर उभे राहत असले तरी आम्हा पोरांची डोकी त्यांच्यापुढे करण्यात यायची. आमच्या डोक्यातून त्यांनी हात फिरवल्यावरच त्यांना त्यांची दक्षिणा मिळत असे. पैशाच्या स्वरूपात भिक्षा घेणारी ही एकमेव जमात. त्यांचे खरखरीत हात आणि त्यांचे अंगावर येणारे हावभाव पहिले की आम्ही लोक त्यांचे हात झटकून टाकत असू.

चाळीत येणारी अजून एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा म्हणजे पोतराज. तो आला म्हणजे छातीत धडकीच भरायची. दुरवरूनच त्याने स्वतःच्या अंगावर ओढलेला आसुडाचा आवाज आमच्या कानावर येत असे. कितीही भीती वाटली तरी त्याला पाहण्याची उत्सुकता देखील असे. त्याच्यापासून चार हात लांबच राहून आम्ही त्याचा हा जीवघेणा खेळ पाहत असू. बायका त्याच्यासाठीचा शिधा पोरकरवी त्याच्यापर्यंत पोहोचवत असत. मुळात भावुक आणि हळव्या असल्याने त्यांना असं कुणी स्वतःच आत्मपीडन केलेलं पाहवत नसे. आम्ही देखील त्याच्या आसुडाच्या परिघाबाहेरच तो शिधा ठेवत असू. न जाणो चुकून एखादा फटका आपल्या अंगावर पडला तर अशी भीती वाटत राही. त्याच्या पाठीवरील पडलेले वळ आणि त्यातून बाहेर येणार रक्त पाहून देव इतका निष्ठुर कसा? आपल्या भक्ताकडून हे असलं कसलं दान मागून घेतो ह्याचाही उलगडा मला कधी कुणी करून दिला नाही.


चाळीत येणारे फकीर हे बहुतेक वेळा साईबाबांच्या नावाने भीक मागत. ते मात्र फार आक्रमक होते. भिक्षा दिल्याशिवाय हटण्याचं नाव घेत नसत. मनासारखी भिक्षा मिळाली नाही तर अकांड तांडव करून दिलेली भिक्षा परत

देण्याची धमकी देत. बरेचदा भिक्षा देणाऱ्याची औकात काढत आणि मध्ये मध्ये बाबा सब देख रहा है.. क्या लाया था क्या लेके जायेगा. दान देगा तो पुण्य कमायेगा.. स्वर्ग का दरवाजा तेरे लिए खुलं जायेगा असं काही तरी बरळत. शेवटी समोरचा हटला नाही की मग गुमान पदरात पडेल ते गोड मानून पसार होत.

जवळच्याच दर्ग्यातील दरवेशी फकीर एका हातात धूप आणि दुसऱ्या हातात मोरपिसांचा झाडू घेऊन येणा जाणाऱ्याच्या डोक्यावरून फिरवत असत. आणि “दे दाता के नाम तुझको अल्ला रक्खे मौलाके नामपर दे दे. . दर पर फकीर आया है” असा पुकारा करत. कधी कधी कबीर पंथी एका हातात चिमटा आणि दुसऱ्या हातात कटोरा घेऊन कबीराचे दोहे गात चाळीतून फिरत. बहुतेक वेळा ते आपल्यामध्ये मग्न असत. त्यांनी कधी थांबून भिक्षा मागितल्याचं आठवत नाही. लोकच त्यांच्या मागे मागे फिरून त्यांच्या कटोऱ्यामध्ये शिधा टाकत इतकी त्यांची ब्रम्हानंदी टाळी लागलेली असे. कबीराचे दोहे गेय असल्या कारणाने खूपच श्रवणीय असत. फकीराच्या आवाजातला चढ उतार देखील दोह्यातील भावार्थाला साजेसा होता. त्यांच्या आवाजात एक प्रकारची मधुरता आणि कोमलता जाणवत असे..

नवनाथ पंथाचे भिक्षुक याउलट दमदार आवाजाचे. “अलख निरंजन” असा बाहेरून धमाकेदार आवाज दिला की आतला माणूस शिध्यासहित बाहेर आलाच म्हणून समजा. ही जमात भविष्यवाणी करण्यात माहीर होती. माझ्या डोळ्यात बघून एकदा एक अवलिया आईला म्हणाला. . “माई इसकी आखोंमे मुझे समंदर दिखता है ! उसी की तरह मचलेगा.. कभी किनारे की मरियादा नही लांघी तो भी एक जगह टिक नही पायेगा.. इसके अंदरकी हलचल को झाँकना.. सैलाब लाया तो फिर कोई रोक नहीं पायेगा.. संभालना इसको. “ आईलाही ह्याचा गर्भितार्थ कितपत समजला हे कळायला मार्ग नाही. मी तर त्यावेळी समुद्र ही पहिला नव्हता अन सैलाब ही. . माझी हिंदी देखील “तेरेकु मेरेकु” च्या आसपासच घुटमळत होती.. . त्यामुळे मला अन्वयार्थ तर सोडाच शब्दार्थही लागणं कठीण होतं. माझ्या तोंडातून नकळत जोरात बाहेर पडलं. “अल्लख निरंजन !” माझ्या

डोळयात रोखून पाहताना डोक्यावर हात ठेवत त्याने प्रतिसाद दिला.. “अल्लख निरंजन !! अल्लख निरंजन !!!” तो निघून गेला तरी बराच वेळ मी नजरबंदी झाल्यासारखा जागेवरच थिजला होतो. “कार्ट्या घरात ये” अशी आईने अनेकदा मारलेली हाक मला एकदाही ऐकू आली नाही ह्यात फारसं नवल नव्हतं.



अधून मधून काही बटुक ब्राम्हण मंडळी माधुकरी मागण्यासाठी चाळीत येत आणि नेमून पाच घरं माधुकरी मागत. पुण्यासारख्या मोठ्या शहरात शिक्षणासाठी आलेल्या गरीब महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा चारिथार्थ देखील ह्याच माधुकरीच्या व्यवस्थेतून चालत असे. त्यासाठी फक्त ब्राम्हण असायला हवा अशी काही अट नव्हती. ह्याच मधुकरीच्या माध्यमातून पुण्यात शिक्षण घेत कित्येक गरीब विद्यार्थी आज उच्च पदाला पोहोचलेले मी स्वतः पहिले आहेत.

एकंदरीत पाहता दुसऱ्या कुठल्याही दानापेक्षा अन्नदान हे कसं एखाद्याचं आयुष्य आत-बाहेरून बदलून टाकू शकतं. माधुकरी देणाऱ्याला आणि घेणाऱ्याला

किती विनम्र बनवतं हा पाठ फार लहानपणी मनावर कोरला गेला तो कायमचाच. माधुकरी मागणाऱ्यांना इतर सर्वांच्या आधीचा प्राधान्यक्रम असे. एकवेळ घरात अर्धी भाकरी कमी खाल्ली तरी चालत असे परंतु जर त्या कुटुंबाचा माधुकरी देण्याचा नंबर असेल त्या घरून माधुकरी मागणारा कधीच विन्मुख परत जात नसे. घासातला घास वाटून खाण्याचा हा असा अजब भावबंधन सोहळा होता.

बरेचदा ही बुद्धिमान विद्यार्थी मंडळी अंगणातच बसून माधुकरी खात आणि आम्हा पोरांना कसले कसले संस्कृत श्लोक शिकवत. सकाळी उठताना तळहात एकमेकांवर घासून "कराग्रे वसते लक्ष्मी करमध्ये सरस्वती । करमूले तू गोविन्दः प्रभाते करदर्शनम ॥" म्हणत प्रभाती करदर्शन करायचं मी त्यांच्याकडूनच शिकलो. अथवा भोजनाला सुरुवात करण्या अगोदर "वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे | सहज हवन होते नाम घेता फुकाचे| जीवन करि जीवित्व अन्न हे पूर्ण ब्रम्ह | उदारभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म ||" अशी प्रार्थना असो किंवा मग "समुद्रेवसने देवी पर्वतस्तनमण्डले । विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्श क्षमस्व मे " असं भूमिवन्दन असो. हे सारे संस्कार मला काही दिवसातच आत्मसात झाले. अश्या तर्हेने अगदीच वाल्याचा वाल्मिकी होत नसला तरी दगडाचं मऊ विटेत रूपांतरण नक्कीच होत होतं.

दर बारा एक वर्षांनी मैलोगणती दूर बर्फील्या हिमालयातून एखादा बालयोगी चाळीत येतो अशी वंदता होती. असाच एक बालयोगी मला पाहण्याचा योग आला. कानात कुंडलं. गळयात आणि मनगटात रुद्राक्षाच्या माळा, अंगात भगवी वस्त्र असा पेहेराव, चेहेऱ्यावर कमालीची ज्ञानप्रभा अशी ती बालमूर्ती एकदा बोलू लागली की ऐकतच राहावंसं वाटे. शेकडोंचा समुदाय त्या बालयोग्याला मंत्रमुग्ध होऊन ऐकत त्याचा वाणीतून बाहेर पाडणारं ज्ञानामृत प्राशन करीत असत. वेद उपनिषदांचे निरनिराळे दाखले देत संस्कृत श्लोक सुस्पष्ट उच्चारत प्रत्येक श्लोकाच्या शेवटी "अर्थात" असं पालुपद लावत रसाळ हिंदीमध्ये निरूपण करीत

असे. गल्ली बोळातून तो चालत निघाला की लोक पटापट त्याच्या पायावर लोटांगण नाही तर साष्टांग दंडवत घालत. तो सगळयांना आदराने "उठिये महोदय ! हम इस योग्यता के लायक नही हैं, आप हमे शरमिंदा ना करे" असं म्हणत उठवत असे. मग सगळे मिळून त्या बालयोग्याचा जयजयकार करीत.

ओढ्याच्या शेजारी एक मोठं आंब्याचं झाडं होतं. दर आठ दहा महिन्यांनी एक मौनी बाबा आपली तीर्थयात्रा आटोपून त्या झाडाखाली मुक्काम ठोकत असे. त्यांचा एक बुटकासा सहायक नेहमी त्याच्या बरोबर असायचा आणि त्यांची मनोभावे सेवा करायचा. त्याचा चेहेरा मोहरा हावभाव म्हणजे डिट्टो विनय बोन्डे. मौनी बाबा म्हणजे स्वयंशिस्त आणि स्वावलंबनाचा पुतळा होते. आपली सगळी कामं स्वतः करत. त्यांना स्वच्छता भारी आवडे. ओढ्यामध्ये स्वतःचे कपडे साफ करणे, पाणी भरणे, आपली भांडी आपण स्वतः विसळणे वैगेरे वैगेरे. त्यांचा शिष्य मध्ये मध्ये करी परंतु त्याला ते हात लावू देत नसत. बहुतेक वेळा त्याला ते बाहेरच्या कामाला पाठवत आणि स्वतः ध्यान लावून बसत. इतकी वर्ष मौन पाळलं असल्याने शरीरयष्टी कृश असली तरी त्यांच्या चेहेऱ्यावर एक तेज आणि लकाकी होती. मौनाने साठवलेलं सामर्थ्य त्यांच्या ठायी जाणवत असे.

चाळीमध्ये बाबांना भलताच मान होता. ते वार लावून चाळकऱ्यांच्या घरी दुपारचं जेवण घेत असत. त्यांना घरी जेवायला बोलावण्यासाठी बायकांमध्ये अहमिका चाले. कारण बाबा दुपारची वामकुक्षी झाली की त्यांच्या प्रापंचिक समस्या सोडवत असत. त्यांचा शिष्य एक पाटी आणि पेन्सिल बाळगत असे. भाविक त्याच्यावर आपला प्रश्न लिहून देत आणि बाबा मग एका शब्दात त्यांच उत्तर देत असतं. म्हणजे असं की एखादा भाविक प्रश्न विचारे.. "आमच्या सुमीचं लग्न होत नाहीये तर केंव्हा होईल? " बाबा त्यावर लग्नाचा योग असेल तर ते वर्ष लिहीत. त्यांची उत्तर फार त्रोटक असत त्यामुळे त्याचा बरोबर अर्थ लावावा लागे. खूपदा त्यांचा भक्त ते कोडं सोडवण्यात मदत करी. तो जर योग्य उकल करू लागला तर बाबा मान डोलावून एक स्मित हास्य करीत. ह्या प्रश्नोत्तराच्या तासाला बरीच

गर्दी होत असे. लोक बाबा उठले का ते पाहण्यासाठी दोन ते चार च्या दरम्यान ते असलेल्या घरात सारखे डोकावून पाहत.

बाबा एकच वेळ जेवण घेत असत. त्यामुळे सुरुवातीला एकदा जितकं वाढलं तितकंच बिना तक्रार संपवत त्यांनी कधीही अधिकच्या जेवणाचा आग्रह केला नाही. त्यांची ही सवय माहित असल्याने बायका त्यांना अगदी ओसंडेपर्यंत ताट भरून जेवायला देत. ते मात्र एक स्मित हास्य करीत मोकळं ताट मागून घेत आणि त्यात हे अधिकचं अन्न त्यात काढून ठेवत. मग ते कुटुंब ते अन्न प्रसाद म्हणून भक्षण करीत असे. जेवण झाल्यावर बाबा तिथेच चटईवर दोन तासाची वामकुक्षी घेत. दुपारी चार वाजता त्या घरी लोक आपल्या समस्या घेऊन जमा होत. मग प्रश्नोत्तराचा तास सुरु होई. आधी सांगितल्याप्रमाणे बाबा एका शब्दात त्या प्रश्नाचं त्रोटक उत्तर देत. जो तो आपल्या परीने त्याचा अर्थ लावे. काहीही असलं तरी बऱ्याच जणांना बाबांच्या मार्गदर्शनाचा फायदा होऊन त्यांच्या समस्येवर उत्तर सापडलं असा त्यांचा दावा होता. त्यामुळे दिवसें दिवस त्यांच्या प्रशंसकांमध्ये वाढ होत होती. तासभर झाला की बाबा कुणाची परवानगी न घेता तडक आंब्याच्या झाडाकडे चालू लागत.

एक दिवस असाच मौनी बाबांनी आमच्या घरी डेरा टाकला असताना माझ्या बाबांनी त्यांना पाटीवर माझ्याबद्दलचा प्रश्न लिहून विचारला. प्रश्न होता.. “मुलगा खूप त्रास देतो.. त्यावर काही उपाय? आणि त्याचं भविष्य कसं असेल? “ मौनी बाबांनी प्रश्न वाचला आणि पाटी कोरी केली. दोन एक मिनिट शांत बसून राहिले आणि स्मित हास्य करत कोरीच पाटी सहाय्यकाकडे दिली. आता तोही गडबडला त्याला काही अर्थ लागेना. असं पहिल्यांदाच घडलं होतं. त्याने अर्थ उलगडून सांगायला असमर्थता दर्शवली. जमलेली मंडळी सुद्धा अचंब्यात पडली. त्यांची वेळ झाल्याने मौनी बाबा आपल्या आसनावरून तडक उठले आणि झाडाकडे चालते झाले. सहायकही पडत्या फळाची आज्ञा घेत त्यांच्यामागे पसार झाला. “काय खरं दिसत नाय पोराचं. बाबांना पण उत्तर सुचना म्हंजे काय? एकंदर

भविष्यात अंधारच दिसतोय म्हणायचा” असं म्हणत तोंडाने सुस्कारा टाकत बाबांना दिलासा देत आजूबाजूची मंडळी परागंदा झाली. झालं ! आईबाप माझ्या भविष्याच्या अनिश्चिततेने पुन्हा चिंताक्रांत झाले.

शेवटी न राहवून एक दिवस आईने मोठ्या बाईंना विश्वासात घेऊन ही घटना साग्रसंगीत कथन केली आणि आपली चिंता व्यक्त केली. मोठ्या बाई थोड्या विचारात पडल्या आणि काही वेळाने म्हणाल्या.. “अहो राजुच्या आई ! चिंता करू नका.. कोऱ्या पाटीचा अर्थ असा की त्याचं भविष्य तो स्वतःच्या हातानी लिहिणार आहे. उलट त्याचं भविष्य फार उज्ज्वल आहे. म्हणून बाबांनी पाटीवर काही लिहिलं नाही. त्याला सगळं जग आणि साऱ्या वाटा खुल्या आहेत. तुम्ही निश्चिन्त रहा. “ बाईंनी असा आश्वासक दिलासा दिल्यानंतरच आईचा जीव भांड्यात पडला. मोठ्या बाईंनी आईचं समुपदेशन केलं होतं की त्यांना मौनी बाबांच्या संकेताचा खरोखर अर्थ लागला होता हे आजवर गुलदस्त्यातच आहे. ते तसंच राहिलेलं चांगलं नाही का?



आता माझा पुरता गोंधळ उडाला होता. माझी इतक्या देव देवतांचे उपासक आणि भक्तांची ओळख झाली होती की माझ्या चिमुकल्या बोटांवरील गिनती संपुष्टात आली. माझा अक्षरशः पीके झाला होता. पाहावी त्याची तऱ्हा निराळी. वेशभूषा, गंध, टिळे, उच्चारण, लकबी, औजारं, हत्यार, वार, सोपस्कार कशा कशात म्हणून साम्य नाही. आपलं वेगळेपण सिद्ध करण्यासाठी हेरेकाने परस्पर विरोधी प्रतीकं अंगिकारली होती. निरनिराळे रंग आपापसात वाटून घेतले होते. एकाला जे शुभ, पूजनीय ते दुसऱ्याला अभुभ अन निषिद्ध होतं. कुणासाठी सकाळची पूजा तर कुणाला रात्रीची पूजा लाभत होती. देवाचा विषय असल्याने प्रतिप्रश्न करणं म्हणजे त्याला आव्हान दिल्यासारखं होतं.

त्यात मला कळलं की आपल्यात तेहतीस कोटी देव आहेत. अजून मी कोटी कोटीची उड्डाण घेतली नसल्याने मला कोटी ह्या संख्येचा आवाका ठाऊक नव्हता. तरीसुद्धा ही फार मोठी संख्या आहे इतकं आकलन होतं. मला आधीच माहित असलेले देव-देवता मी शिकलेल्या गिणतीच्या बाहेर होते ते ह्या तेहतीस कोटींमध्ये सामील आहेत की ते सोडून? माझ्या पोटात गोळा आला. हे सारं एकाच धर्मातलं होतं. बाकी धर्माची तर अजून तोंडओळखही झालेली नव्हती. माझ्यासारख्या नवशिक्याला हे सारं समजायला फारच क्लिष्ट आणि अगम्य होतं. कोण खरं आणि कोण खोटं ह्याची शहानिशा होत नव्हती. माझी अवस्था “ए भगवान है कहां रे तू “ अशी काहीशी विचित्र झाली होती. त्यातल्या त्यात बाप्पा मला जवळचा वाटत होता. मी त्याच्यासोबत बागडलो होतो. तो कसा खोटा असेल?

चाळीत एक कुडमुड्या ज्योतिषी भविष्य सांगायला यायचा. आपल्या पोपटाला बरोबर घेऊन. स्वतःच्या घरी अठरा विश्वे दारिद्र्य असताना आणि आपल्या भविष्यात काय वाढून ठेवलंय हे माहित नसताना हा इतरांचं भविष्य कसं काय सांगू शकतो हा प्रश्न मला बालवयातच काय पण आजही भेडसावतो. “अचूक भविष्य सांगणार.. जोतिष सांगणार.. अडीअडचणींवर उपाय सांगणार.. पोपटाचा गुण येणार. “ अशी आरोळी देत साऱ्या चाळीत फेरफटका मारायचा. दुपारी बायकांना काही काम नसायची त्यांना मग आयताच टाईमपास सापडायचा. त्या त्याला जवळ बोलावून घेत. मग हा अंगणात उपडा बसून भविष्यवाणी सांगण्या अगोदर च्या नांदीला सुरुवात करी. त्याच्यावर ती बाई भविष्य पाहणार की नाही हे अवलंबून असे. आम्ही पोरं पटापट पोपटाच्या पिंजऱ्याभोवती जमा होत त्याच्या हालचाली बारकाईने टिपत असू.

ह्याच आपलं सुरु होई.. “आई तुझं माहेर फार थोर.. सासरला आल्यापासून तुझी दुर्दशा झाली. तू इतक्या खस्ता खातेस.. कुणाला तुझी किंमत नाही.. आजवर खूप सोसलंस, भोगलंस.. पर हवं तसं दान तुझ्या पदरात पडत

नाही. खोटं सांगतो का माई? “ असं म्हणत तिच्या प्रतिसादाची वाट पाही. आता कोण बाई ह्याला नाही म्हणणार आहे? आपला पदर डोळयाला लावत बाई थोडी पुढे सरकून बसत म्हणे. . “खरंय बाबा तुझं, आपलंच नाणं खोटं त्याला कोण काय करणार? मर मर करून दिवस काढायचे दुसरं काय? भविष्यात काय वाढून ठेवलाय तेव्हडं तरी सांग? “ मग ह्याला चेव यायचा आपण बरोबर दिशेने चाललोय ह्याची त्याला खात्रीच होई. त्याचं पुढचे अंदाज बंधन सुरु होई.

“ बाई इतकी संकट आली. पण तू डगमगली नाहीस. सगळं शिरावर घेतलंस.. नवऱ्याची साथ नाही पण पदर खवलास अन पोर बखोटीला मारून चार चौघांना पुरून उरलीस. आज जे काय हाय ते तुझ्यापायी हाय. पर लग्नाकर्व्यात अजुनपण हवा तास मान मरातब मिळत न्हाय.. आतल्या आत जळत असतेस तू बाय माझे.. खोटं सांगतो तर जीभ झडून पडलं. उचल ती व्हान अन हान टकुर्यात. “ बाईची छाती फुलून येई. “तुला कशापायी व्हान हाणू रे. तू जे आहे तेच सांगणार? माझ्या मेलीचं नशीबच फुटकं.. त्याला तू तरी काय करणार? थोडा च्या घेतोस? “ पुन्हा डोळयाला पदर. इथे कुडमुड्याने किल्ला सर केलेला असे.. “बाई पण आता तुझे दिवस पालटणार आहेत. केलेल्या सगळया कष्टाचं चीज हुनार, पोरगा तुझं नाव सातासमुद्रा पार घेऊन जाणार.. मग बघतीस काय भविष्य. एका माणसाचे अडीच रुपय घेणार.. पर अचूक भविष्य सांगणार.. “

ती थोडीशी घासाघिस करे पण शेवटी भविष्य जाणून घेण्याची उत्कट इच्छा असल्याने दीड एक रुपयात सौदा ठरे. मग त्याचा पट्टा पुन्हा सुरु होई.. “बाई सुपाएवढं काळीज तुझं.. सगळी अडी-अडचणी पदरात घेत तू तांदळातले खडे दूर करावेत तसे पाखडतेस. आणि लोक तुला सणा-समारंभाला खड्यासारखं दूर ठेवतात. खोटं बोललो तर जीभ झडून इथंच पडलं.. उभ्या जन्मात पुन्हा भविष्य सांगणार नाही” आता ती वैतागलेली असायची.. “हो रे बाबा ! तू लय मोठा

जोतिषी, हे सगळं मला माहिती आहे.. मागचंच काढून कशाला उगाच जखमेवर मीठ मिरची चोळतोस.. पुढं काय व्हनार ते सांग गुमान.. “ तिला आता भविष्यात डोकावून पाहण्याची उत्सुकता लागलेली असते.

आम्हाला पण पोपट पिंजऱ्यातून केंव्हा बाहेर येतोय याची घाई झालेली असायची. इतक्या लवकर मागे हटेल तो कुडमुड्या जोतिषी कुठला? “सांगतो की.. त्याच्या साठीच तर आलोय” असं म्हणत पुन्हा त्याचं जुनी खोडं घासण्याचं काम सुरु व्हायचं.. शेवटी बाईने “आता सांगतो का जाऊ घरात? “ असा अल्टिमेटम दिला की मग तो चिट्ठ्या पसरवायला सुरुवात करी. पुढे पिंजरा उघडत पाच-सात मिनिटं पोपटाला बाहेर येऊन चिट्टी निवडण्याची विनंती करी.. तो ही महावस्ताद.. एका विनवणींत ऐकत नसे. मग कुडमुड्या अजीजी करी.. “ये माज्या राज्या ! अरं बाई खोळंबलीया.. का वक्ताची खोटी करतो.. “ पोपटाचं एक नाही अन दोन नाही तो दुसरीकडे तोंड फिरवी.

मग तो बाईला गयावया करायचा “थोडं शेंगदानं असतील का घरात.. जरा मूठभर देता का? काही खाल्ल्याबिगर बेणं ऐकायचं नाय. “ बाई तोऱ्यात.. “असा कसा तुझा पोपट.. मालकाचं ऐकत न्हाय. काय खायला घालतोस का नाय” असं म्हणत शेंगदाण्याची वाटी त्याच्यापुढे आपटे. दोन चार शेंगदाणे खाल्ले की मग पोपटाची तब्येत तरतरीत व्हायची. आजूबाजूला तोऱ्यात मान इकडे तिकडे करीत स्वारी ऐटीत बाहेर यायची. अधून मधून एक दोन शीळ घालत सगळया चिठ्यांना प्रदक्षिणा घालून झाल्या की एखाद्या चिट्ठीकडे तिरक्या मानेने पाहत भलतीच चिट्ठी बाहेर ओढत लगोलग पिंजऱ्यात पसार होत असे. इकडे बाकीचे शेंगदाणे हळूच कुडमुड्याच्या झोळीत.

इथून पुढचा भविष्य सांगण्याचा भाग फारसा इंटरेस्टिंग नसायचा. कारण सगळं अंदाज घेत घेत मोघम वाक्य वापरली जायची. बायका माना डोलावयाच्या.. बरेचदा बायकाच आपलं भविष्य आपणच रचयाच्या आणि त्याला

विचारायच्या “असं तर घडणारं नाही.. मी ताडलंच होतं” कुडमुड्या हो ला हो म्हणायचा आणि नाही ला नाही. बायका एकमेकींना लगेच “बघ मी तुला म्हटलं नव्हतं.. असंच असणार म्हणून” म्हणत आपल्या हुशारीचं कौतुक करून घ्यायच्या. आमचा आतापर्यंत हिरमोड झालेला असायचा. इतका वेळ थांबून एकदाच पोपट बाहेर येतो म्हणजे काय? आम्ही हळू हळू तिथून मग कल्टी मारायला सुरुवात करायचो.

आमचा पूर्वेइतिहास इतका सर्वश्रुत असल्याने आई-बाबा कधी कुडमुड्याच्या भरीस पडले नाहीत. इतक्या भल्या भल्या दिग्गजांना ह्याचं भविष्य कळालं नाही तर हे टिनपाट काय माझं भविष्य सांगणार अशी बोळवण करीत त्यांनी कुडमुड्याला आणि त्याच्या पोपटाला निकालात काढला. मला मात्र पोपटाची लाल-चुटुक चोच भयंकर आवडली होती. आपल्या घरी पोपट कसा पाळता येईल ह्या फिराकीत काही कुरापत करता येते का असलं काही तरी भयानक माझ्या सुपीक डोक्यात शिजत होतं.



सुट्टीनंतर शाळेचा पहिला दिवस, पंधरा ऑगस्टचा स्वातंत्र्य दिन किंवा मग सव्वीस जानेवारी चा प्रजासत्ताक दिन म्हणजे आम्हा लहानग्यांची चंगळ असे. तोवर टीव्हीचा इतका बोलबाला नव्हता त्यामुळे प्रजासत्ताक दिनाचं संचलन घरी टीव्हीवर बघत कोचावर आळश्यासारखं लोळत न पडता घराच्या बाहेर पडत. जवळच्या एखाद्या सरकारी कार्यालयात किंवा मग शाळा महाविद्यालयात जातीने हजर राहून त्या तिरंग्याला मानवंदना देत. पंधरा ऑगस्टला इंदिराबाईनं लाल किल्ल्या वरून रेडिओवर केलेलं भाषण म्हणजे सर्व सामान्यांच्या कानाला पर्वणी असे. काय बाईचा रुबाब, काय तिचा प्रभाव, तिचं वक्तृत्व, तिचा बॉबकट.. तिचा

कणखरपणा. बायका, पुरुष सारेच तिचं गुणगान करताना थकत नसत. “काय पण म्हणा बाई लैच कर्तबगार” अश्या प्रशस्तिपत्रकाने तिच्या कौतुकाची सांगता होई.

त्यादिवशी सारं वातावरण कसं देशभक्तीपर होऊन जाई. “मेरे देश की धरती, सोना उगले, उगले हिरे मोती, मेरे देश की धरती”, किंवा “कर चले हम फ़िदा जान-ओ--तन साथियो, अब तुम्हारे हवाले वतन साथियो” झालंच तर मग “जहाँ डाल डाल पर, सोने की चिडिया करती है बसेरा, वो भारत देश हैं मेरा. “ अश्या गाजलेल्या देशभक्तीपर हिंदी गाण्यांचे नाहीतर मग “जयोऽस्तु ते! जयोऽस्तु ते! श्री महन्मंगले शिवास्पदे शुभदे, स्वतंत्रते भगवती त्वामहम् यशोयुतां वंदे! “ किंवा “उठा राष्ट्रवीर हो सज्ज व्हा, उठा चला, सशस्त्र व्हा, उठा चला” अशी जोशपूर्ण मराठी गाण्यांचे सूर गल्लोगल्ली कानावर पडत.

आम्ही शाळेत पांढऱ्या गणवेशाला व्यवस्थित इस्त्री वैगेरे करून झेंडावंदनाला हजर राहत असू. साडेतीन मुहूर्तासारखा हा मुहूर्त वर्षातून कवतिचतच येई. गणवेशाला इस्त्री करणं म्हणजे फार मोठा सोहोळा होता. परिटाकडे जाऊन कोळश्याच्या इस्त्रीने इस्त्री करून घेणं म्हणजे चैन होती. मग पितळेच्या तांब्यात अंघोळीच्या बंबामधले दोन चार निखारे घालून हा कार्यभाग उरकला जाई. कॅनव्हासच्या शूजला रात्रभर पाण्यात भिजवून पांढऱ्या खडूने रंगरंगोटी केली जात असे. असा कडक पेहेराव केला की मान आपोआपच ताठ होत असे. त्यात सगळीकडे देशभक्तीमय वातावरण आणि रक्त सळसळवाऱ्या रचना ऐकल्या की पाय आपोआप कदम तालात पडत.

शाळेत गेलो की पहिल्यांदा आम्हाला फक्कीने मारलेल्या दोन उभ्या रेषेत उभे करत. शाळेचं बॅण्डपथक पूर्ण तयारीत असे. झेंडा वरती गेला रे गेला की लगेच “जण गण मन अधिनायक जय हे, भारत भाग्य विधाता” हे राष्ट्रगीत बॅण्डवर वाजवलं जाई. मग लेझीम पथक आपलं कौशल्य दाखवे. आजूबाजूचं वातावरण

अगदी प्रसन्न आणि आल्हाददायक असायचं. शेवटी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण झालं की ह्या भरगच्च कार्यक्रमाची सांगता शिपायाच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाऊवाटपाने होई. काही पोरं पाकिटं तिथल्या तिथे फोडून फस्त करीत तर आमच्यासारखे काहीजण तो काळजीपूर्वक घरी नेत असत.

ह्याच काळात पुण्यातल्या कॉलेज मधली प्रायोगिक रंगभूमीची पोरं-पोरी सांस्कृतिक मंडळाच्या माध्यमातून आजूबाजूच्या परिसरात समाज प्रबोधनात्मक पथनाट्य सादर करीत. ह्या पथनाट्यांचे विषय निरनिराळे असत. कधी हुंडाबळी, स्त्रीभ्रूण हत्या, अंधश्रद्धा निर्मूलन तरी कधी नशाबंदी, पोलिओ असे सामाजिक समस्येचे निराकरण करणारे विषय असत. पथनाट्याचं सादरीकरण अगदी सहज सोपं आणि ओघवत्या भाषेत केलं जाई जेणेकरून त्यात मांडलेला विषय, त्याची तीव्रता आणि समाधान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावं. कधी ज्ञानेश्वरांच्या पसायदानाचा दाखला देत सर्वधर्म समभावाचा प्रचार तर कधी तुकारामांच्या “वृक्षवल्ली आम्हा सोयरे” चा उल्लेख करत वृक्ष संवर्धनाचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न असे.

ही सारी मंडळी कुठल्यातरी ध्येयानं प्रचंड भारलेली वाटत. समाजात बदल घडून यावा आणि त्यात आपला खारीचा तरी वाटा असावा असं त्यांना मनापासून वाटे. म्हणूनच तर उन्हातान्हात कुठल्याही मानधनाविना ही मंडळी आपलं देहभान हरपून आपली भूमिका वठवत. त्यांचं टीमवर्क वाखाणण्याजोगं होतं. कुठलंही काम त्यांच्या दृष्टीने हलकं भारी नव्हतं. कामातला भेदभाव त्यांना मान्य नव्हता. त्यामुळे पथनाट्याची संभावित जागा साफ करण्यापासून ते अवजड सामान वस्तू इकडे तिकडे हलवण्यापर्यंत पोर-पोरी दोघेही हिरहिरीने भाग घेत.

ऐन तारुण्यातलं अल्लड वय असलं तरी त्याचा संयम आणि एकमेकांबद्दल वाटणारा आदर अविश्वसनीय होता. तिथे मुलं-मुली असा भेद नव्हताच मुळी. त्या अजाणत्या वयात मला नजरेला पडली ती निखळ मैत्री आणि मैत्रीचं. आयुष्यात

काहीतरी करण्याची ध्येयासक्ती, समाज बदलण्याची तळमळ, मैत्रीत एकमेकांवर जीव ओवाळून टाकण्याची तयारी आणि जळत्या निखाऱ्याला तळहातावर बगळण्याची हिम्मत. दुर्दम्य आशावाद अन पराकोटीची कलासक्ती सारं सारं कसं स्वप्नवत..



पंच्याहत्तरला जाहीर झालेली आणीबाणी सत्याहत्तरला संपुष्टात येऊन त्यानंतर आता पाच सहा वर्ष झाली होती. तरी थोरामोठ्यांच्या आणीबाणीच्या आठवणी अजूनही ताज्या होत्या. 'अनुशासन पर्व' म्हणून ह्या काळाचा सर्रास उल्लेख केला जात असे. रात्रीची जेवणं झाली की अंगणात पुरुष मंडळींचा कट्टा जमे. पान सुपारी बडीशेप खात, रवंथ करता करता राजकारणा वरील गप्पांचा फड रंगे. सगळे ह्या गरमागरम चर्चेत हिरहिरीने चढाओढ करत समरसून भाग घेत. वेडंवाकडं का होईना पण प्रत्येकाला एक राजकीय मत होतं. नाही म्हणायला काही

कुंपणावरचे देखील होते. ज्या बाजूला पारडं जड तिकडे आपलं दान टाकीत. दिवसाआड त्यांची राजकीय मतं बदलत असत. जनता सरकार कोसळलं तरी अजूनही समाजवादी चळवळीचा जोर ओसरला नव्हता.

त्यामुळे सामाजिक न्याय, समता आणि राष्ट्रीय संपत्तीची समाजात समतोल विभागणी, भांडवली बाजाराची विषवल्ली असे विषय प्रामुख्याने चर्चिले जात. जे. पी. ची संपूर्ण क्रांती, राम मनोहर लोहिया, मोरारजी देसाई, जॉर्ज फर्नांडिस, बाबू जगजीवन राम, अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी ही मंडळी चर्चेच्या केंद्रस्थानी होती. बाई कशीही असली तरी तिच्या सुगुण आणि दुर्गुणांना अव्हेरून चालत नसे. किंबहुना तिचा उल्लेख केल्याशिवाय चर्चा पुर्णत्वालाच जाऊच शकत नव्हती. लाल बहादूर शास्त्री, पाकिस्तान बरोबरची युद्ध आणि ताशकंद करार ह्यांचाही अधून मधून चर्चेत समावेश केला जाई.

सायबाचा काळ किती शिस्तीचा आणि चांगला म्हणून इंग्रजांचा पुळका असणारे कमी नव्हते. कधी कधी मध्येच कुणाला तरी नेहरू आणि पटेल वादाचा आठव होई. मग नेहरू कसे कनवाळू आणि जमिनीवरचे नेते होते हे पटवून देण्यासाठी एकसष्टच्या पानशेत पुराच्या वेळी नेहरूंनी केलेल्या पुण्याच्या दौऱ्याचं वानगीदाखल उदारहरण दिलं जाई. मग ही रिकामटेकडी मंडळी कसब्यातील पारावर बसली असताना नेहरू कसे उघड्या जीपमधून सुरक्षा रक्षकांना न जुमानता पायाखाली पुराचा गाळ तुडवत त्याच्या जवळ आले. आणि आपुलकीनं त्यांची कशी चौकशी केली. इथपासून ते परतीचा रस्ता कसा विचारला इथपर्यंत किस्से रंगवून सांगत. खरं खोटं ते त्यांना आणि नेहरूंनाच माहित.

शास्त्रींचा “जय जवान, जय किसान” नारा असो किंवा मग बाईचा “गरिबी हटाव” अथवा मोहन धारियांचा उदय असो. प्रत्येकाची इत्यंभूत मीमांसा होई. चाळीत एकदा दुसरा शिक्षक वैगेरे सोडला तर बाकी सारीच कामगार मंडळी

असल्याने कामगार चळवळी, संप, मोर्चे, प्रभावशाली युनियन नेते, काही कामगार नेत्यांची मॅनॅजमेण्ट बरोबर असलेली घसट हा देखील चर्चेचा आणखी एक जिव्हाळयाचा विषय. जॉर्ज फर्नांडिस ने आपला उजवा हात वर करताच मुंबईचे टॅक्सिवाले कसे एका जागी स्तब्ध होत आणि त्यांच्या एका इशाऱ्यावर कसा संप पुकारून यशस्वी करून दाखवत हा सगळयांचाच कौतुकाचा विषय होता. शनिवार वाड्यावरील होण्याऱ्या मोठमोठ्या लोकप्रिय नेत्यांच्या जाहीर सभांचा उल्लेखदेखील मोठ्या दिमाखात होई. सभेला मुंगी शिरायलाही जागा मिळू नये इतकी विराट गर्दी कशी होती. नदी पात्रात एका पायावर उभं राहून आपण आपल्या लाडक्या नेत्याचं भाषण लाऊडस्पिकर वरून कसं श्रवण केलं हे ऐकलं की त्यांची ह्या नेत्यांवरील निस्सीम निष्ठा दिसून येई. यशवंत राव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, एस. एम. जोशी ह्याची नावं प्रामुख्याने पुढे येत.


मोठ्या नावाजलेल्या पुढाऱ्यांची संसदेतील अभ्यासपूर्ण भाषणं हा स्वतंत्र चर्चेचा विषय असे. ह्यात डाव्यांची विशेष आघाडी होती. ए. एम. एस. नम्बुत्रीपाद, बॅरिस्टर नाथ पै, कृष्ण मेनन, एस. एम. जोशी, मधू दंडवते, विनोबा भावे, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया, अटल बिहारी वाजपेयी कसे आपल्या अभ्यासपूर्ण भाषणाने सरकारचे वाभाडे काढत संसद हलवून सोडतात ह्याच ह्या मंडळींना भयंकर कौतुक आणि आदर होता. पूर्वीसारखं पुणं राहिलं नाही किंवा पूर्वीसारखे समाजाची कणव आणि कळकळ असलेले नेते राहिले नाहीत हा आजचा आक्षेप त्या काळीही होता. एकंदर फारच राजकीय उलथा पालथीचा काळ होता. आता कुठे भारतामध्ये लोकशाही खऱ्या अर्थाने रुजू पाहत होती.

आजकालचा संसदेतला सावळा गोंधळ पहिला तर त्या संक्रमण काळातील ह्या दिग्गज संसदपटूच महत्व अधोरेखित होतं. इतके टोकाचे मतभेद असताना देखील केवळ आपल्या अभ्यासपूर्ण आणि तर्कशुद्ध भाषणांनी कुठेही गडबड गोंधळ न माजवता सरकारला निरुत्तर करण्याचं आणि कोंडीत पकडण्याचं

ह्या दिग्गज मंडळींचं सामर्थ्य वादातीत होतं. हा युक्तिवाद इतका सडेतोड असायचा की सरकारपक्ष देखील त्याचं कौतुक करण्यास मजबूर होत असे. सध्याच्या डाव्यांची आडमुठी भूमिका आणि अजब तर्क ऐकले की हसावं की रडावं हेच कळत नाही. ह्यांचे आलिशान बंगले आणि गडगंज संपत्तीचे आकडे कानावर पडले की हे कोणत्या तोंडाने स्वतःला समाजवादी म्हणवून घेतात ह्याचं खरोखर आश्चर्य राहिल्या शिवाय राहत नाही.

जिथे तर्क संपतो तिथे दांडगाई आणि ओंगळ हरकती सुरु होतात. केवळ विरोधासाठी विरोध न करता दुसऱ्याला युक्तिवादाने नामोहरम करायचं म्हणजे विचारधारेचं भक्कम अधिष्ठान असावं लागतं. तरच तो वादळी चर्चेत टिकतो अन्यथा वावटळीत कस्पटासमान उडून जातो. विषयाची अनभिज्ञता, अभ्यासाचा अभाव, जनतेविषयीची अनास्था अन उदासीनता ह्यातून मग बिनबुडाची कृत्रिम वादळं संसदेत घोंघावतात. वैयक्तिक आणि कमरेखालची असंसदीय भाषा वापरली जाते. वरतून हीच मंडळी स्वतःच संसदीय मूल्य पायदळी तुडवत संसदीय परंपरेची मल्लिनाथी कशी होतीये असा आरडा-ओरडा करायला मोकळे ह्यांना कुणीतरी लोकशाही आणि संसदीय परंपरेची पुन्हा नव्याने ओळख करून देण्याची गरज आहे. संसद हा कुस्तीचा आखाडा नसून तिच्यावर बहिष्कार न टाकता अभ्यासपूर्ण तर्क देत साधक बाधक चर्चा घडवून आणणं. त्याच्यावर आधारित योग्य जनमत तयार करणं. ही चर्चा करताना विरोधी मतांचाही तितकाच आदर राखणं ह्यासाठी आहे हे ह्या नाठाळांना जनतेनेच ठणकावून सांगण्याची वेळ आलेली आहे.

त्यावेळी ह्यातलं मला ह्यातलं काही कळत नसलं तरी सामान्य जनतेचा लोक चळवळी मध्ये सहभाग असतो आणि गर्दीला एक प्रभावशाली नेता लागतो ज्याबद्दल सर्वांना कमालीचा आदर असतो इतकं समजू शकत होतं. हे म्हणजे आमच्या वर्गातल्या मॉनिटर सारखं होतं. आम्ही सगळे जनता आणि मॉनिटर म्हणजे जाणता नेता. च्यायला सगळी गम्मतच होती.



दरम्यानच्या काळामध्ये एखाद्या विशिष्ट ध्येयाने पछाडलेली आणखी बरीच मंडळी भेटली. ह्यातली सगळीच सुशिक्षित आणि विद्वान होती अशातला भाग नाही परंतु आपल्या आराध्याला वाहून घेत अवघं आयुष्य वेचण्याची त्यांचीही बांधिलकी तसूभर कमी नव्हती. एखाद्यावर किती निष्ठा असावी ह्याची ती उत्तम उदाहरणं. सगळं घरदार वेशीवर टांगत दारोदारी अनवाणी पायानं फिरणं म्हणजे खरोखर खडतर परीक्षाच होती. पण म्हणतात ना की एकदा ध्येय समोर दिसलं की अगदी निखारे पसरले तरी पायाखालची वाट पुष्करणीतल्या पायवाटेसारखी सुकर वाटते.

रामदास स्वामींनी जेव्हा आपला आवडता शिष्य कल्याण ह्याला आपला वाऱ्यावर उडालेला शेला पकडण्यासाठी सज्जनगडाच्या माचीवरून खाली उडी मारायला सांगितली. तेंव्हा क्षणाचाही विचार न करता त्याने त्या भयाण दरीत उडी घेतली. पुढे त्याच्या गुरूने त्याच्या जीविताची हमी घेतली हे वेगळं सांगायला नको. ही खरी गुरुनिष्ठा. त्यासाठी गुरुही तितकाच तगडा आणि विश्वासार्ह लागतो. गुरुची खरी ओळख होते ती त्यांच्या शिष्यगणांमुळे. नाहीतर आजकाल महागुरू अन सद्गुरू म्हणून मिरवणारे पायलीला पन्नास भेटतात. शिष्यगणांचा आणि भक्तांगणांचा उच्छाद तर विचारता सोय नाही.

गाडगेबाबांना या जगातून जाऊन तीन एक तपं होऊन गेली तरी त्यांची शिकवण, विचारांचा प्रभाव आणि त्याचा सर्वदूर प्रचार करणारे त्यांचे अनुयायी ह्यांच्या संख्येमध्ये तसूभरही फरक पडला नव्हता. उलट दिवसेंदिवस त्यात वृद्धीच होत होती. विर्दभातून अनवाणी पायपीट करीत वाटेत येणाऱ्या गाव खेडी आणि शहरांना गाडगेबाबांचा संदेश पोहोचवत ही मंडळी पुण्यात पोहोचली. त्याकाळीही पुण्याचा आवाका मोठा असल्याने निरनिराळया ठिकाणी ही मंडळी विखुरली गेली. त्यातला एक समूह आमच्या ओढ्याकाठी शिरस्थावर झाला.

ह्या समूहात एकाही महिलेचा समावेश नव्हता. पहाटेपासूनच ही मंडळी हातात खराटा घेऊन स्वच्छतेच्या कामाला लागत. सगळयांचा पेहेराव हुबेहूब गाडगेबाबां सारखा. धडधाकट शरीरयष्टी, चेहेऱ्यावर वैदर्भीय दाढी ठेवत आणि डोक्याला उपरणं गुंढाळून ही मंडळी खराट्याने स्वच्छता करू लागली की एकाच वेळी शेकडो गाडगेबाबा परिसरात अवतरल्याचा भास होई. त्यांच्या बरोबर चाळीतली आणि आजूबाजूची पुरुष स्वयंसेवक मंडळी देखील आपल्या घरातला खराटा घेऊन आजूबाजूच्या परिसराची स्वच्छता करू लागत. सामूहिक श्रमदानाचं ते एक उत्कृष्ठ उदाहरण होतं.

परिसर काचेसारखा लख्ख झाला की ही मंडळी ओढ्यात हातपाय धुवून घरोघरी धनधान्य मागत फिरत. जो तो आपल्या ऐपतीप्रमाणे त्यांच्या गाडग्यात

दीक्षा टाकी. त्यांची प्रमुख मागणी तांदळाची असे. दुपारी मिळेल ते खाऊन घटकाभर विश्रांती घेऊन झाली की उन्हं उतरताच पुन्हा एखादा उकिरडा साफ करायला तयार. त्यांचा भाषेचा वऱ्हाडी बाज आणि एकंदर बोलण्यातील राकट पण तितकाच आपुलकीचा भाव मन मोहून न घेईल तरच नवल. प्रचंड बोलघेवडी जमात.

संध्याकाळी सहा साडेसहा झाले की पुन्हा आपली साफसफाईची उपकरणं बाजूला ठेवत आणि ओढ्यामध्ये हातपाय धुवून दोन-चार पलिते पेटवण्याची लगबग सुरु होई. मध्ये एक शेकोटीवजा जाळ पेटवून त्यावर त्रिकोणी उतरंड चढवत मातीच्याच भांड्यांत मागून आणलेल्या तांदळाचा भात मंद आचेवर शिजवला जाई. आजूबाजू ला घोंगड्या अंथरलेल्या असतं. हळू हळू आजूबाजूची बायका पुरुष मंडळी जमा व्हायला सुरुवात व्हायची.

त्या अंथरलेल्या घोंगड्यावर हा जनसमुदाय स्थानापन्न झाला की मग कृष्णाच्या भजनाने कार्यक्रमाची सुरुवात होई. “गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला.. “ ह्या पालुपदावर संपूर्ण जनसमुदाय माना डोलवत आणि टाळ्या वाजवत त्या लयीवर रममाण होत असे. दुसरीकडे जाळाच्या उष्णतेवर भात रटरटून शिजत असायचा. चाळीतल्या काही बायका मग स्वयंस्फूर्तीने तीन दगडाची चूल मांडत मिळालेल्या संमिश्र पिठातून भाकरी थापायला घेत. सुरुवातीची प्रार्थना संपली की मग एखादं काल्याचं कीर्तन सुरु होई. ते अर्धा तास वैगेरे चाले. एकदा मैफिलीला रंग भरला की मग सर्वांच्या आवडीचा एकनाथी भारुडाचा फड उभारला जाई.

एखादा बाप्या माणूस डोक्यावरून साडीचा पदर घेत भारूडाला सुरुवात करी. “अग्ग ग ग ग ग इंचू चावला, काय मी करू, इंचू चावला, कोणाला सांगू.. इंचू चावला, इंचू चावला, इंचू चावला, हो ! “ अशी भरभक्कम सुरुवात करी आणि जमलेल्या समुदायात स्त्रीसुलभ हालचालींच्या हावभावांनी हशा पिकवत समाज प्रबोधन आणि स्वच्छतेचं महत्व पटवून दिलं जाई. बाहेरच्या साफसफाई बरोबरच

मनाचा मैल काढत त्याला निर्मल ठेवणं कसं आवश्यक आहे हे उदाहरणासहित आणि निरनिराळे दाखले देत मनावर ठसवण्याचा प्रयत्न केला जाई. बायका भाकऱ्या थापत थापत ह्या भारुडांचा तितकाच आनंद घेत अधून मधून प्रतिसादही देत. मध्येच एखाद्याची स्वभाव विशेषावरून छेड काढत आजूबाजूचं वातावरण हलकं केलं जाई. मनोरंजनातून लोक-शिक्षण आणि प्रबोधन ह्या डोह्नी गोष्टी नकळत साधल्या जात.

सगळी मंडळी अश्या सत्संगात रममाण झाली असतानाच तिकडे भात आणि आमटी शिजून तयार झालेली असे. इकडे बायकांनी देखील भाकऱ्या थापून हातावेगळया केलेल्या असतं. मग त्यांच्यातील काही कार्यकर्ते हे सगळं एकत्र कुस्करून त्याचा गोपालकाला करण्याच्या मागे लागत. भारुडाचं शेवटचं चरण संपत आलं की मग पत्रावळीमध्ये ह्या महाप्रसाद वाटपाचं काम सुरु होत असे. ह्या पंक्तीचा लाभ मिळणं म्हणजे अहोभाग्य समजलं जाई. तिथे गोर गरीब, थोर श्रीमंत, उच्चं नीच, गोरा सावळा, हिंदू मुसलमान असा कुठलाही भेद नव्हता.

सगळयांचा सत्कर्म आणि निर्मल मन हाच एक अधिष्ठाता होता. तृप्त मानाने आपापल्या घरी परतताना, हाताने टाळया वाजवत पुन्हा एकदा “गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला.. “ चा गरज करत न जाणारा विरळाच अन्यथा हा नाद प्रत्येकाच्या मनात भरून राहिलेला असे. हा सगळा चमत्कार एका अडाणी आणि गावंढळ व्यक्तीने घडवून आणला होता. सगळ्या विद्वान आणि शिकलेल्या परंतु काळवंडलेल्या मनाच्या शहरी आणि सुशिक्षित मंडळींना मनाच्या आरपार स्वच्छतेचा बिल्लोरी आरसा दाखवत.




जिल्हा परिषदेची शाळा असल्यामुळे शाळेच्या शिक्षकांना बऱ्याच सामाजिक सरकारी उपक्रमात किंवा जनजागृती कार्यक्रमात सक्तीने भाग घ्यावा लागे. उदा. पोलिओ लसीकरण, स्वच्छता निर्मूलन, सरकारी योजना प्रसार आणि प्रचार वैगेरे वैगेरे. ह्यासाठी निरनिराळे हातखंडे वापरले जात. जसे की भित्ती पत्रकं.. शाळेत रक्तदान शिबीर किंवा मग माहिती वर्ग वैगेरे वैगेरे.

जनजागृती करण्यासाठी सकाळी सकाळी प्रभात फेरी काढणं हा एक उत्तम पर्याय होता. कारण मोहिमेच्या यशस्वीतेसाठी पुरुष मंडळी, बायकांना शेतावर, कारखान्यात कामावर जाण्याअगोदर पकडणं क्रमप्राप्त असायचं ह्या प्रभात फेरीने स्वातंत्र्यपूर्व काळात इतिहास बदलण्याचं अजोड काम केलं होतं. कित्येक

थोर मंडळी ह्याच प्रभात फेरीच्या माध्यमातून जनतेसमोर आली होती. स्वराज्याबद्दल जनजागृती करून जनमत तयार करणं.. जनतेशी सुसंवाद साधणं.. त्यांना स्वातंत्र्यलढ्यात सामील होण्यासाठी उद्युक्त करणं. त्याच बरोबर विद्रोही आणि सरकारविरोधी आवाज उठवणारी पत्रकं जनतेत वाटणं ही प्रामुख्याने प्रभात फेरीची ढोबळ उद्दिष्ट असत.

त्याच धर्तीवर शाळेच्या प्रभात फेऱ्या बेतल्या होत्या. वर्गातील मुला-मुलींनाही ह्यात सामील करून घेतलं जाई. प्रभात फेरी काढण्या अगोदर निदान दोन आठवडे तरी त्याची पूर्व तयारी केली जात असे. फलक बनवणे, घोषणा ठरवणे. एखादा लहानसा व्यक्ती अभिनय बसवून घेणे. छोटेखानी भाषणं असा बराच सरंजाम बसवावा लागे. ह्या सर्वांमध्ये बहुत करून तिसरी चौथीच्या विद्यार्थ्यांचा भरणा असे. पहिली दुसरीची मुलं-मुली म्हणजे विद्यार्थी सहभाग जास्त दिसावा म्हणून नुसतीच केलेली खोगीर भरती. ज्या दिवशी प्रभात फेरी असेल त्यादिवशी काही विद्यार्थ्यांची वेशभूषा बदलण्यात येई. ती त्यावेळच्या विषयाला धरून असे. अगदी सकाळी सकाळी म्हणजे पावणे सहा सहाला कुडकुडत्या थंडीत गणवेशात शाळेच्या आवारात सगळयांना जमावं लागे.

प्रत्येकाला आपापल्या जबाबदाऱ्या वाटून दिल्या जात. विशेष करून लहान असल्यामुळे पहिली दुसरीच्या विद्यार्थ्यांची जबाबदारी काही शिक्षकांवर सोपवली जाई. मग प्रभात फेरीसाठी बनवलेले फलक प्रत्येकी पाच ते सात मुलांच्या मध्ये एक असे वाटले जात. त्या ग्रुपला त्या फलकावर काय लिहिलं आहे त्याचा अर्थ समजावून सांगितला जायचा. मग कुठल्या कुठल्या घोषणा द्यायच्या त्याचीही एकदा रंगीत तालीम झाली की मग ही प्रभात फेरी “खरा तो एकाची धर्म.. जगाला प्रेम अर्पावे” ह्या सानेगुरुजींच्या प्रसिद्ध प्रार्थनेने सुरु होई.

प्रभात फेरीचा मार्ग अगोदरच ठरलेला असे. काही शिक्षक पुढे तर काही शिक्षक मागे आणि मध्ये सगळे विद्यार्थी अशी साधारण विभागणी असायची. त्यातही काही मोठ्या मुलांना दहा ते बारा मुलांकडे लक्ष ठेवण्याची जबाबदारी

दिलेली असे. सगळं कसं आखीव रेखीव असायचं. एवढी पोरं असून देखील कुठेही गडबड गोंधळ नसायचा. दृष्ट लागेल अशी शिस्तबद्धता फक्त ह्याच एका कार्यक्रमात पाहायला मिळायची. प्रत्येक ग्रुपचा म्होरक्या मग आळी पाळीने घोषणा देत असे. बाकीची पोरं त्याला दुजोरा देत.

सकाळचं गारठलेलं परंतु धुक्यात न्हालेलं प्रसन्न वातावरण.. सगळयांनी अंगात स्वेटर्स घातलेली. बोलताना तोंडातून बाहेर पडणारी वाफ, हातात लाकडी दांड्याचे पुठ्ठयाचे नाहीतर कापडी फलक त्यावर बाईंच्या सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेला मजकूर असं सगळं सांभाळत आम्ही पुढे पुढे चालत असू.


अधून मधून एखाद्या पाड्या वस्तीवर विसावा घेत एक रिंगण करत जोरदार घोषणाबाजी होई. त्यामुळे आजूबाजूचे जमा होतं.. एकदा जमाव जमला की तिसरी चौथीच्या विद्यार्थ्यांना जोर चढत असे. त्यांचा उत्साह इतका ओसंडून वाहत असे की शिक्षकांना अधून मधून त्याला आवर घालावा लागे. शिक्षक त्या समुदायाला संबोधून त्यादिवशीचा प्रभात फेरीच्या विषयाची ओळख करून देत.

तीच गोष्ट शिक्षिका बायामाणसांचा एक वेगळा समूह करून विषयाची माहिती देत. कित्येकदा त्याठिकाणी विषयाची माहिती देणारी प्रत्रकं सुद्धा वाटली जात. त्यानंतर काही विद्यार्थी समूहाची बसवलेली नाटुकली किंवा मग भाषणं सादर व्हायचं. फारच आनंददायी प्रकार होता तो. कधी कधी सगळे विद्यार्थी मिळून महाराष्ट्रातल्या एकाद्या नावाजलेल्या किंवा महान संतांच्या रचना सादर करत. त्यात प्रामुख्याने तुकडोजी महाराज, संत जनाबाई, कवयत्री बहिणाबाई ह्याच्या रचनांचा समावेश असे. असा हा सारा खेळ दोन तास चालायचा. साधारण सकाळचे साडे सात वाजत आले की मग हा सारा लवाजमा शाळेत परतून खाऊचे पुडे वाटून विसर्जित होई.

कुठल्या तरी सामाजिक कार्यामध्ये भाग घेतल्याचा एक विशिष्ट तरीसुद्धा शब्दात विशद न करता येणारा आनंद घेऊन सगळे इकडे तिकडे पांगत. हे सगळं

मला एका अर्थाने आवडू लागलं होतं.. मी, माझा, माझं घर, माझे मित्र, माझी शाळा ह्याही पलीकडे इतरांचं आपण देणं लागतो हा विचार आता माझ्या मनात पुरता रुजू लागला होता. सूर्याची किरण सरळ डोळयात जाऊन समोरचं थोडं धूसर दिसत असलं तरी तिच प्रकाशवाट आहे ह्याचाही उलगडा हळू हळू होऊ लागला. अजून समोर काय काय वाढून ठेवलं आहे ह्याचा अंदाज येत नसला तरी ह्याच प्रकाश किरणांच्या साह्याने मलाच ते शोधून काढावं लागणार होतं.

045




शेवटी बाप्पाची कृपा म्हणा किंवा मग मौनी बाबांचा आशीर्वाद म्हणा कुणालाही अपेक्षित नसताना अकस्मितपणे पोरानं पाहिलीत पहिला नंबर काढला. त्यामुळे “मी म्हणालो नव्हतो.. “ म्हणणाऱ्यांची जाम पंचाईत झाली. तरीसुद्धा आपले चेहेरे अतिशय आंबट करीत “त्यात काय एव्हडं? जिल्हा परिषदेच्या शाळेत तर पहिला आलाय.. एकदा पुण्यातल्या शाळेत गेल्यावर कळेलच खरी हुशारी.. पहिलीला काय डोंबल शिकवतात.. “ अशी मल्लिनाथी झालीच. घरातही थोडंफार आश्चर्याचंच वातावरण होतं. पण माझ्या ह्या पराक्रमामुळे चाळीतली माझी काही पापं धुतली जाणार होती. आई-बाबांना आता चाळीत थोडं फार मान वर करून वावरता येणार होतं. “हो तो माझाच मुलगा.. “ असं छाती पुढं करून टीकाकारांच्या नाकावर टिच्चून जाहीर करता येणार होतं नाहीतर कार्ट्याने

आजवर मान खालीच घालायला लावली होती. त्यामुळे हा बदल जरासा सुखावह होता. त्याच्यासाठी आणि माझ्यासाठी सुद्धा.

हा पहिला नंबर वैगेरे माझ्यासाठी काही फारसं अप्रूप नव्हतं. मला त्याचं फारसं सुखदुःखही नव्हतं. हे म्हणजे आई-बापांनी आपल्या एक वर्षाच्या लेकराचा दारात मांडव घालून थाटामाटात पहिला वाढदिवस साजरा करण्यासारखं होतं. अशा समारंभात पोराच्या हौसेच्या नावाखाली आईबापच आपली हौसमौस भागवून घेत असतात. त्या बिचाऱ्या अर्भकाला वाढदिवसही कळत नाही आणि थाटामाटही.. जाणत्या वयात आल्यावर “आजवर तुझे किती वाढदिवस थाटामाटात साजरे केले आता लहान आहेस का तू वाढदिवस साजरा करायला” म्हणत ते साजरे करणं थांबवलं जातं. “तुझा पहिला वाढदिवस काय झोकात साजरा केला होता आम्ही लोकांनी” हे त्याला पुढे आयुष्यभर ऐकून घ्यावं लागत. तर सांगायचा मुद्दा असा की आपण काही फार मोठा तिर मारला आहे हे माझ्या गावीही नव्हतं. मी आपला सुट्टी लागली आहे आता भरपूर खेळायला मिळणार ह्या बालिश आनंदात होतो.

पुण्यात आल्यानंतर “शंकरराव जेजुरीकर” म्हणून बाबांचे एक स्नेही आजोबा नेहमी आमच्या घरी उतरत. आडनाव जेजुरीकर असलं तरी ते सातारा जिल्ह्यातील वाई येथे राहत. बाबा त्यांना जेजुरीकर अण्णा म्हणून संबोधत. आमच्या सगळया खानदानात त्यांना फार वरच स्थान होतं. आमच्या खानदानाला एकंदर प्रगतीपथावर आणण्यात त्यांच्या मार्गदर्शनाचा फार मोलाचा वाटा होता. त्यामुळे इतक्या मोठ्या खटल्यामध्ये त्यांचा शब्द प्रमाण होता. माझे चुलते आणि आत्यांच्या सोयरिकी त्यांनीच मध्यस्थी करून घडवून आणल्या होत्या. वैदिक विवाहाला पूर्णपणें फाटा देत पुरोगामी पद्धतीने त्यांनी त्यांची लग्न लावून दिली होती. ह्या लग्नाला ब्राम्हणाच्या ऐवजी त्यांनीच पौराहित्य केलं होतं. त्यामुळे त्यांची घरी बडदास्त ठेवली जाई. स्वभावाने कडक असले तरी अत्यंत साधं राहणीमान आणि उच्चं विचारसरणी असा त्यांचा एकंदर स्वभाव होता. स्वातंत्र्य

चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन क्रांतिसिंह नाना पाटलांच्या प्रतिसरकार मध्ये त्यांनी मोलाची कामगिरी पार पडली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी दीर्घकाळ तुरुंगवासही भोगला होता.

त्या वयातही त्यांचा अतिशय ताठ कणा, शिडशिडीत बांधा आणि करारी डोळे लक्ष वेधून घेत. स्वयंशिस्त आणि अनुशासन ह्यांचे ते भोक्ते होते. स्पष्टवक्तेपणा आणि सडेतोड मत ह्यामुळे त्यांना समाजात अतिशय मान होता. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाची कामगिरी बजावल्याबद्दल भारत सरकारकडून पंडित नेहरू, इंदिरा गांधी ह्याच्या हस्ते त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला होता. त्यांचा त्या दोघांबरोबर दीर्घकाळ पत्रव्यवहारही सुरु होता. बरेचदा नेहरू गांधी परिवाराकडून त्यांना आलेली वैयक्तिक पत्र ते वाचून दाखवत. स्वांतत्र्य सैनिकाचा दर्जा त्यांना केंव्हाच बहाल करण्यात आला होता. त्यांनी तो आपल्या शिक्क्यामध्ये समाविष्ट केला असला तरी स्वातंत्र्य सैनिकांना मिळणाऱ्या सवलतीना मात्र नम्रपणे नकार दिला. सवलती मिळवण्यासाठी आम्ही स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली नाही असं त्यांचं स्पष्ट मत होतं.

अण्णांचा जनसंपर्क दांडगा होता. आमच्या घरी मुक्काम असताना त्यांना बरेच लोक भेटायला येत. निरनिराळया विषयावर त्यांची चर्चा चाले. त्यांना चहा-पाणी देता देता बरेच विषय माझ्या कानावर पडत. परंतु त्यातले बरेच डोक्यावरून जात. अण्णांचे एक स्नेही उत्तम गायक होते. बरेचदा अण्णा त्यांना आग्रहाने गायनाचा आग्रह करीत. मोठ्या व्यक्तीचा मान ठेवायचा म्हणून मग तेही आढेवेढे न घेता कुठल्याही साथ संगतीविना गायला सुरुवात करीत. त्यांचा पिंड शास्त्रीय गायकीचा असल्याने त्यांच्या तयार गळयातून मोठं मोठ्या ताना बाहेर पडत. त्यांच्या गायनात प्रामुख्याने नाट्यपदांचा समावेश असे. कानावर नाट्यसंगीत ऐकण्याचा पहिला संस्कार “बडवे” बुवांकडून झाला तो असा. बरेचदा अण्णा मला बोटाला धरून त्यांच्या विविध स्नेह्यांकडे भेटीगाठी साठी बरोबर घेऊन जात. बोलाचालीत एखाद्या मोठ्या माणसाची ओळख करून द्यावी तशी “हे बबनरावांचे

थोरले चिरंजीव" अशी माझी ओळख यजमानांना मोठ्या आदराने करून देत. इतका आदर मला पहिल्यांदाच मिळत होता. त्यामुळे मनोमन मी सुखावलो नसतो तरच नवल.

जमिनीवर सतरंजी टाकून आणि लोडाला पाठ टेकवत महात्मा गांधींच्या शैलीत ते पत्र लिहायला बसत. पत्रव्यवहार हा त्यांचा अतिशय जिव्हाळयाचा विषय होता. कुठल्याही पत्राला तीन दिवसांच्या आत त्यांच्याकडून प्रत्युत्तर किंवा पोचपावती गेली नाही असं झालं नाही. मी त्यांच्या बाजूलाच बसलेला असे. पत्र लिहिता लिहिता ते माझ्या अभ्यासाची चौकशी करीत. मला काय काय येतं.. कुठल्या गोष्टींमध्ये मला रस आहे ह्याची आस्थेने चौकशी करत. लहान मुलांशी संवाद साधण्याची त्यांची एक विशिष्ट शैली होती. त्यांने लहान मुलं त्यांच्याकडे लगेच आकृष्ट होत. मीही त्याला अपवाद नव्हतो. जेवण झाल्यावर आम्हा मुलांना ते स्वातंत्र्य लढ्याच्या सुरस कथा अगदी सोप्या पद्धतीनं वर्णन करून सांगत. आम्ही त्या ध्यान देऊन ऐकत असू. भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, सुभाषचंद्र बोस ह्यांच्या कथा ऐकल्या की उर अभिमानाने भरून यायचा.

मग ते हळूच प्रश्न विचारत "भविष्यात तुम्ही कोण बनणार? " मग आम्ही एक एक क्रांतिकारक वाटून घेत असू. मला चंद्रशेखर आजाद विशेष करून आवडायचे. त्यांची पिळदार शरीरयष्टी आणि झूपकेदार मिशांवर मी फिदा होतो. त्यांच्या रॉबिनहूड स्टाईल धाडी आणि वेळोवेळी इंग्रजांना चकमा देण्याचं विशेष कौशल्य ह्याचं मला विशेष आकर्षण होतं. इंग्रजांना जेरीस आणून हा मातृभूमीचा लाल एकदाही इंग्रजांच्या हाती लागला नाही ह्याचं आम्हाला कोण कौतुक. त्यामुळे "भविष्यात कोण होणार? " ह्या प्रश्नाचं मी "चंद्रशेखर आजाद" असं त्यांची पोज घेत उत्तर न दिलं तरच नवल. तितक्यात आणखी एक बेणं उठलं अन म्हणालं "मी पण आझाद होणार". हे पात्र म्हणजे पक्क कॉपी पेस्ट होतं. मी जे म्हणेल तेच नेहमी ह्याला देखील हवं असायचं. आमच्या दोघांची तिथेच जुंपली. अण्णा आम्हा दोघांना वेगळं करत म्हणाले "अरे भांडू नका. आपल्या देशाला बऱ्याच आझादांची गरज

आहे. तुम्ही दोघेही आझाद व्हा म्हणजे झालं? जा आता बाहेर जाऊन खेळा.. मला थोडं काम करू द्या"..

आम्ही सगळे बाहेर आलो. इतक्यात मानेल तो आझाद कसला? बाहेर गेल्यावर मी त्याला कुस्तीतले दोन चार डाव वापरत जमिनीवर लोळवला अन बुकल बुकल बुकलला. माझ्यात पुरता आझाद संचारला होता. ह्या आदळ आपटीमुळे त्याची ढोपरं फुटली. इंग्रजांना चांगला चोप दिल्याचा आनंद माझ्या चेहे्ऱ्यावरुन ओसंडत होता. गनीम गपगार निपचित जमिनीवर गारद झाला होता. काहीवेळाने त्याने जोरदार भोकाड पसरलं. त्याची आई लगेच धावत आली. तिला त्याचा कळवळा आला. "मेलं शाळेत एवढा पहिला नंबर आलाय. पण काडीची अक्कल आलेली नाही. तिथंही अशीच दांडगाई करून बाईला फितवलं असशील" माऊलीचा आक्रोश गगनाला भिडत होता. अण्णा घरी असल्यामुळे तात्पुरतं का होईना माझ्यावरचं गंडांतर टळलं होतं. पुढचे काही दिवस उघड्या अंगाने आणि नसलेल्या मिशांना पीळ देत "पंगा नही लेनेका" अशा अविर्भावात मी ह्या वानरसेने समोरून दंड थोपटत मोकाट फिरत होतो.



वाईला परतल्यानंतर नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे काही दिवसातच जेजुरीकर अण्णांचं पत्र घरी येऊन थडकलं. बाकीची ख्यालखुशाली कळवून विचारून झाल्यानंतर त्या पत्रात अण्णांनी माझा उल्लेख करत आपुलकीने चौकशी केली होती. आणि बाबांना सहज प्रश्न केला. “पुढच्या आठवड्यात पुण्याला येतोय, तसेही सुट्टीचेच दिवस आहेत तेंव्हा तुझी काही हरकत नसेल तर तुझ्या थोरल्या चिरंजीवाला वाईला काही दिवसांसाठी घेऊन जाईन म्हणतो. त्याचीही रजामंदी आहे कि नाही ते तपासावे. “ मला तर काय संधीच हवी असायची माझा नाही म्हणण्याचा प्रश्नच नव्हता. मी आता आण्णा पुण्याला केंव्हा येतायेत ह्याची वाट पाहू लागलो.

कळविल्याप्रमाणे पुढच्या आठवड्यात अण्णा घरी येऊन पोहोचले. एक दोन दिवसात आपली कामे उरकून मला विचारते झाले.. “काय मग येणार ना माझ्या बरोबर वाईला.. तुझ्या वडिलांची काही हरकत नाही मी विचारलंय त्याला “ मी त्यांना माझी भरलेली बॅग दाखवली. त्यांना काय समजायचं ते समजलं. अण्णांचा हात पकडून मी स्वारगेट स्टेशन गाठलं आणि एस. टी. च्या लाल डब्याने दोन अडीच तासात वाई गाठलं. वाईचं चिमुकलं एस. टी. स्टॅन्ड वाईला साजेसं आटोपशीर होतं. फलाटाच्या भिंतीवर निरनिराळया गावाच्या पाट्या. स्पीकर वरून होणारी गाडी सुटण्याची घोषणा वैगेरे प्रकार मी जत्रेत हरवून गेलेल्या पोरासारखे अनुभवत होतो.

माझं विशेष लक्ष वेधून घेतलं ते “गाय छाप तंबाखू” च्या जाहिरातीने. माझ्या चौकस स्वभावानुसार आतापर्यंत मी अण्णांना भंडावून सोडायला सुरुवात केली होती. तेही एखाद्या कसलेल्या शिक्षकाप्रमाणे न चिडता माझं शंका निरसन करीत होते. ही जाहिरात महाराष्ट्रातल्या जवळ जवळ प्रत्येक स्टॅण्डवर लावलेली आहे. अशी माहिती मला मिळाली. आणखी एक गोष्ट माझं आकर्षणाचं केंद्र ठरली ती म्हणजे तिथलं एस. टी. कँटीन कारण आता मला प्रचंड भूक लागली होती. अण्णा वाईतील सुपरिचित व्यक्तिमत्व असल्याने कँटीनवाल्याला फारसं सांगावं लागलं नाही. त्यांने आमची येथेच्छ सरबराई करत आमची क्षुधा शमवली.

अण्णांचं घर म्हणजे प्रशस्त प्रकरण होतं. एका ओळीत भरपूर खोल्या. समोर प्रशस्त अंगण त्याच्या पलीकडेच गाईंचा गोठा.. अण्णांना एक स्वतंत्र खोली होती. त्यात त्यांनी माझं सामान उतरवलं. होतच किती म्हणा. पण आता अण्णांचा सहवास मला सदासर्वकाळ लाभणार होता. अण्णांचं एकत्र कुटुंब होतं तरी देखील सर्वांनी त्याच ठिकाणी स्वतंत्र बस्तान थाटलं होतं. चहा पाणी झालं. मला पाहून तिथं कुणी फारसं उत्साहित झालेलं वाटलं नाही. अण्णांकडे नेहमी कुणी ना कुणी येऊन राहत असावं. त्यामुळे त्यांच्यासाठी ते नेहमीचंच होतं. जरी सगळं हाताशी देण्यात येत होतं तरी मला वातावरणात काहीसा रुक्षपणा जाणवला. घरावरती

तुळशी पत्र ठेवून स्वातंत्र्य लढ्यात उडी मारल्यामुळे त्यांचं घराकडे दुर्लक्ष झालं असावं. हव्यात कशाला इतरांच्या उचापत्या असा एकंदर सूर मला कुटुंबियांच्या वागण्यातून जाणवला.

बाहेरच्या जगात इतका मन मरातब आणि सन्मान मिळत असताना घरात मात्र त्यांना यथातथाच वागणूक मिळत होती असं माझ्या लक्षात आलं. घरकी मुर्गी दाल बराबर अशी काहीशी अवस्था होती. परंतु स्वावलंबी असल्यामुळे त्यांना त्याचा फारसा फरक पडत नसावा. त्यांची स्नेही मंडळी आणि इतर सामाजिक कार्यकर्ते त्यांच्या घरी आल्यावर मात्र त्यांची थोडीफार पंचाईत होत असावी. आजही त्यांना तोंडावर काही बोलण्याची कुणाची हिंमत नव्हती त्यामुळे तोही प्रसंग ते आपल्या अधिकारवाणीने इतरांकडून अनिच्छेने का होईना कामं करवून घेत निभावून नेत असावेत. अर्थात मला ह्या सगळयाने फारसा फरक पडत नव्हता मला ह्याही पेक्षा जास्त तिरस्काराची सवय होती. माझ्यासाठी बऱ्याच गोष्टी नवीन होत्या त्या मला आकर्षित करत होत्या. अण्णा मला काय हवं नको त्याची काळजी घेत होते. मग मला अजून काय हवं होतं?

शंभराहून अधिक प्राचीन देवळं असणारं, कृष्णेच्या काठावर वसलेलं वाई म्हणजे दक्षिण काशी. त्याचा अगदी महाभारत काळापासूनचा इतिहास ज्ञात आहे. कृष्णेवर बांधलेल्या विविध घाटांमुळेही वाई प्रसिद्ध होतं आणि आहे. आजूबाजूचा निसर्गरम्य परिसर, सगळीकडे झाडीच झाडी.. कृष्णेचा प्रवाह, पक्षांचा किलबिलाट सारं सारं मन मोहून घेणारं.. अण्णा आता मला जिकडे तिकडे हाताला धरून बरोबर घेऊन जाऊ लागले. कित्येक मोठ्या लोकांची ओळख करून देत होते. आज त्यातले कित्येक विस्मृतीच्या आड गेलेत.

रस्त्यातून चालताना अधून मधून अण्णा वाईचा इतिहास आणि निरनिराळ्या ऐतिहासिक स्थळांची ओळख करून देत होते. ह्या शहराने भारताला दोन ब्राम्हण महाराण्या दिल्या. झाशीची राणी लक्ष्मीबाई ही वाईच्या तांबे

घराण्यातून आली आहे हे कित्येकांना ठाऊक नसेल. नानासाहेब पेशव्यांची पत्नी गोपिकाबाई ही देखील वाईच्याच रास्ते परिवारातली. असं हे पेशवेकालीन तालेवार शहर. अली आदिलशाहच्या भर दरबारात शिवाजीच्या मुसक्या बांधून त्याला जिंदा या मुर्दा हजर करण्याचा विडा उचलण्याची आगळीक करणाऱ्या धिप्पाड अफझलखानाने अजस्त्र सेनेसह आपला पहिला मुक्काम वाईमध्येच टाकला होता.

हे सगळा इतिहास अण्णा सुरसपणे माझ्यासमोर मूर्तिमंत उभा करीत होते. आणि मी बावचळल्यासारखा तो परिसर नजरेखालून घालत होतो. गणपती घाटावरील महागणपती आणि परिसरातील इतर पांडवकालीन मंदिरं मी रोज संध्याकाळी अण्णांसोबत पायाखालून घालत होतो. ह्या नियमात एकदाही खंड पडला नाही. काशी विश्वेश्वराचं मंदिर म्हणजे स्थापत्य कलेचा अत्युकृष्ट नमुना होता. एकाच दगडात घडवलेली महागणपतीची अतिभव्य मूर्ती पाहून त्या वयात छाती दडपल्यासारखी होत असे. त्यामानाने मांजरी फार्मचा बोलका बाप्पा फारच चिमुकला होता.


एकदा बाप्पाचं दर्शन झालं की अण्णा मला कृष्णेच्या काठावर पाण्यात पाय सोडून बसवत. कृष्णेचा तो नितळ प्रवाह.. त्यात अधून मधून दिसणारे मासे.. आजूबाजूचा स्वच्छ परिसर.. कातीव दगडांनी बांधलेला आखीव रेखीव घाट, मंदिरात होणारा घंटानाद.. पायाला गुदगुल्या करणारं पाणी.. पायऱ्यांना धडकून त्याचा होणारा चुळुक चुळुक आवाज.. सारं काही ब्रम्हानंदी टाळी लावणारं. कितीतरी वेळ आम्ही दोघे एकमेकांशी काहीच न बोलता शांतपणे आजूबाजूच्या हालचाली टिपत घाटावर बसून राहत असू. अधून मधून अण्णांचे स्नेही त्यांना हात करत किंवा इकडच्या तिकडच्या गप्पा मारत त्यांची ही समाधी भंग करीत. माझं त्याकडे फारसं लक्ष नसे. मी पाण्यात होणाऱ्या हालचाली टिपण्यात पुरता मश्गुल झालेला असायचा.

वाई शहराला ह्या पौराणिक, ऐतिहासिक वारश्याबरोबर सांस्कृतिक आणि वैचारिक वारसा देखील लाभला होता. ही दक्षिण काशी म्हणजे संस्कृत प्रगाढ पंडितांचं वास्तव्यस्थान. संस्कृत प्राज्ञ पाठशाळा, शेकडो वर्ष पुरानी गोवर्धन संस्थेची गोशाळा, मांढरदेवी संस्थान अशा कितीतरी प्राचीन कला विज्ञानाची प्रसिद्ध ठिकाण वाईमध्ये आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी मराठी विश्वकोश लिहिला तो देखील इथेच. गणपती घाटावरील प्रांगणात अनेकवेळा ह्या प्रज्ञावंताची भाषणं होतं. बरेचदा पुण्या मुंबई नागपूरवरून नामवंत वक्त्यांना वसंत व्याख्यान मालेच्या निमित्ताने आमंत्रित केलं जाई. त्यावेळी ह्या घाटावरील प्रांगणात टाकलेल्या लाकडी खुर्च्यांवर आम्ही लोक स्थानापन्न होतं असू. लगोलग इतर सगळया खुर्च्या व्यापल्या जात. नाईलाजास्तव बाकी मंडळी मग घाटाच्या पायऱ्यांचा आधार घेत.

व्यासपीठावरील नावाजलेली मंडळी अर्थशास्त्र, अर्थव्यवस्था, राष्ट्रीय, आतंर राष्ट्रीय राजकारण, सामाजिक, वैचारिक चळवळी ते थेट कला, नाटक, चित्रपट इत्यादी विविधांगी विषयावर अभ्यासपूर्ण भाषणं करीत. त्याचं विषयाचं आकलन, विषय सोपा करून सांगण्याची हातोटी, भाषेवरील प्रभुत्व सारं काही वाखाणण्या जोगं होतं. प्रा. शिवाजीराव भोसले अन पु. लं. देशपांडे ह्याचं भाषण मी पहिल्यांदा ऐकलं ते इथे. मला ह्या सर्वांचा फारसा अर्थ लागत नसला तरी त्यांची प्रमाण आणि शुद्ध मराठी ऐकून आपण फारच गावंढळ बोलत असल्याची जाणीव पहिल्यांदाच झाली. आपण ह्यांच्यात शोभतो का असाही थोडासा न्यूनगंड मनी रुजू लागला.

परंतु जे काही होतं ते अविस्मरणीय अन अदभूत होतं. मला अंतर्बाह्य बदलवून टाकण्याची क्षमता त्यात होती. मलाही ते सारं ओरपून आत्मसात करायचं होतं. खेळ, खाऊ, मारामाऱ्या ह्यापलीकडे कितीतरी विस्तीर्ण पठार असल्याची

जाणीव मला होऊ लागली होती. बहुदा अण्णा त्याला जाणून-बुजून खतपाणी घालत होते.. त्यांच्या प्रयत्नांना यश देखील येत होतं.. त्यांनी लावलेल्या बीजाला अंकुर फुटून तो आता जमिनीवर मोकळा श्वास घेऊ पाहत होता.




प्रत्येक सुखस्वप्नाचा शेवट ठरलेला असतो. सकाळच्या सूर्यकिरणांनी जाग आली किंवा मग कुणीतरी हलवून उठवलं की हे सुखद स्वप्न भंग होतं. “आणि शेवटी ते सुखाने नांदू लागले” हा शेवट केवळ परीकथांमध्येच शक्य आहे. स्वप्ननगरीतून वास्तव जगात आल्याची जाणीव झाली की मग स्वप्नभंग झाल्याचा विषाद बाळगायचा की सुखस्वप्नं दिसल्याबद्दल त्याचे आभार मानत नव्या उमेदीने दिवसा उजेडी ते स्वप्न प्रत्यक्षात आणायचं हे प्रत्येकाच्या स्वभाव विशेषावर अवलंबून असतं. वाईचं सुखस्वप्नं देखील असंच एक दिवस संपुष्टात आलं.

बघता बघता वीस दिवस कसे सरले ते कळालंच नाही. बाबा मला न्यायला वाईला येऊन पोहोचले. माझा पाय तिथून निघता निघत नव्हता पण नाईलाज होता. अण्णांनी न विसरता खुशालीचं पत्र पाठवायला बजावलं. मी मान खाली घालून बाबांबरोबर परतीच्या प्रवासाला निघालो. अण्णा आम्हाला एस. टी. पर्यंत पोहोचवायला आले होते. ह्याआधीच्या काही क्लेशकारक वियोगानंतर "हर मुलाकात का अंजाम जुदाई क्यूँ है? " हा प्रश्न मला राहून राहून पडत होता. आजही त्याचं समाधानकारक उत्तर मला मिळालेलं नाही.

पुण्याला परत आल्यावर दोन दिवसांनी बाबांनी मला अण्णांना खुशालीचं पत्र पाठवण्याची आठवण करून दिली. नेहमी बाबा पत्रव्यवहार करीत. परंतु ह्यावेळी अण्णांनी माझ्या स्वहस्ताक्षरात पत्र पाठवण्यासाठी निक्षून सांगितल्यामुळे त्यांचा नाईलाज होता. ही गहन जबाबदारी माझ्या नाजूक खांद्यावर येऊन पडली होती. हा प्रकार माझ्यासाठी नवीन होता. ह्याच्या आधी मी कधीच कुणाला पत्र पाठवलेलं नव्हतं. "मामाचं पत्र हरवलं" ह्या खेळाव्यतिरिक्त माझा ह्या पत्रप्रपंचाशी काडीचाही संबंध आलेला नव्हता. आता ह्या प्रकल्पासाठी कुणाची मदत घ्यावी हा माझ्यासाठी यक्षप्रश्न होता. मला अचानक मोठ्या बाईंची आठवण झाली. तसंही मला वाईचा इतिवृतांत कुणालातरी ऐकवायचा होता. त्यासाठी मला कुणीतरी हवच होतं. माझ्या उचापती थंड डोक्याने ऐकून घेऊन मला शाबासकी देणारी व्यक्तीच ह्या कारनामा कथनासाठी योग्य होती.

मी बाबांकडे मोठ्या बाईकडे जाण्याचा हट्ट धरला. त्यांनी ही फारसे आढेवेढे न घेता मला एक दिवस मोठ्या बाईंकडे नेऊन सोडवलं. बाईंनी मला घरगड्याकरवी परत घरी नेऊन सोडण्याची जबाबदारी घेतली. त्यामुळे तोही प्रश्न निकालात निघाला. पुढचे दोन तास माझं वाई पुराण सुरु होतं. मोठ्या बाईदेखील एखाद्या विनम्र भाविकां प्रमाणे हे कथासार ग्रहण करत होत्या. मधूनच "अर्रे व्वा !", "किती छान !", "असं झालं होय? " असा समर्पक प्रतिसाद देत होत्या. अधून मधून

मला विषयावर अधिक माहिती देत “तू हे पाहिलंस का? तिकडे गेलास का? “ अशी विचारणा देखील करीत होत्या. मला अजूनच स्फुरण चढत होतं. त्यामुळे हे प्रवास वर्णन आणखी तासभर लांबलं.

सरते शेवटी मी कठीण विषयाला हात घातला. अण्णांनी मला खुशालीचं पत्र स्वहस्ताक्षरात पाठवायला सांगितलं आहे त्यामुळे तुमची मदत हवी आहे अशी वाच्यता केली. मोठ्या बाई म्हणाल्या “त्यात काय मोठंसं? लिही की मग” आता मला पत्र लिहिता येत नाही हे त्यांना कसं सांगावं हे मला कळेना. त्यांना माझी अडचण लक्षात आली. त्यांनी मेजाच्या ड्रॉवर मधून एक पंधरा पैश्याचं पोस्टकार्ड काढलं. पेन्सिल आणि पोस्टकार्ड माझ्या हातात देत म्हणाल्या.. “हं ! लिही.. तीर्थरूप अण्णा यांस भुपेशचा साष्टांग दंडवत. “ जोडाक्षरांच्या नावाने माझी बोंबच होती. इतका कठीण मजकूर लिहिण्यास माझी लेखणी काही झंजेना. शेवटी बाईंनी प्रत्येक अक्षराची पोटफोड करीत आणि हरेक शब्दाचा अर्थ सांगत मला मदत करायला सुरुवात केली. “अण्णा मला तुमची खूप आठवण येते.. “ ह्या वाक्यावर त्या खडतर पत्राचा समारोप करण्यात आला. माझ्या हस्ताक्षराचा एकंदर बाज पाहून पोस्टमनला कळावा म्हणून बाईंनी पत्ता त्यांच्या हस्ताक्षरात लिहिला हे वेगळं सांगायला नको.

असं ते अमूल्य पत्र घेऊन आमची गुरु-शिष्याची जोडी छोटेखानी पोस्ट ऑफिस मध्ये पोहोचली. हे पोस्ट-ऑफिस सैन्याची बराक शोभावी अशा एका कौलारू इतरातीमध्ये होतं. तारायंत्राची टक टक.. टाईपरायटरचा रटाळवाणा खडखडाट.. शिक्के मारल्याचा आवाज.. गोंद चिटकलेलं जुनं पुरानं लाकडी फर्नीचर ह्यांनी आमचं स्वागत केलं. पोस्ट ऑफिस मध्ये जाण्याचा माझा तो पहिलाच प्रसंग. मोठ्या बाईंची कॉमेंटरी नेहमीप्रमाणे सुरु होती. आणि मी तो परिसर न्याहाळता न्याहाळता ती लक्षपूर्वक ऐकत होतो. सरते शेवटी एका मोठ्या लाल डब्याला असलेल्या बारिकश्या चीरेतून बाईंनी मला ते पत्र पोस्ट पेटीत टाकायला सांगितलं.

माझा हात पोहोचत नव्हता तरी मी दोन तीन वेळा उडी मारून शेवटी ते पत्र आतमध्ये टाकण्यात यशस्वी झालो.

परतीच्या वाटेवर ते पत्र पोस्टपेटीतुन कोण काढणार? . ते बाईला कसं पोहोचणार? तिथल्या पोस्टमनला अण्णांचा पत्ता ठाऊक आहे का? असे नानाविध प्रश्न विचारत बाईंसमोर माझी टकळी सुरु केली. त्याही शांतपणे प्रत्येक प्रश्न टोलवून लावत होत्या. शेवटी अण्णांचं पत्र बाईला खरोखर पोहोचणार ह्याची खात्री झाल्यावर मी घरी परतलो आणि विसरूनही गेलो. अण्णांनी त्याच्या नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे तीन दिवसांमध्ये माझ्या ओबडधोबड पत्राला प्रत्युत्तर पाठवलं. आठवडाभराने पोस्टमन चाळीत माझं नाव पुकारत आला. सगळयांना आश्चर्य वाटलं. माझ्या नावाने आलेलं ते पाहिलं पत्र. अण्णांनी आवर्जून मला उद्देशून माझं नाव पत्त्यावर टाकत पत्र रवाना केलं होतं. माझी छाती काय फुलून आली म्हणता..

माझ्या नावाने चाळीत पत्र येतं म्हणजे काय? . अचानक मी सेलेब्रिटी झालो होतो. जो तो येता जाता मला चिडवीत होता.. “काय भुपेशराव ! तुमच्या नावाचं पत्र आलंय म्हणे? “ मीही अगदी तोऱ्यात “होच मुळी !” असा प्रतिसाद देत होतो. अण्णांचा स्वातंत्र्यसैनिक असा शिक्का असलेलं ते प्रांजळ पत्र मी कितीतरी दिवस उराशी बाळगून झोपत होतो. अण्णांशी बालवयात सुरु झालेला हा पत्रव्यवहार पुढे तहहयात अखंड सुरु होता.. अगदी अण्णा कालवश होईपर्यंत. आजही कुठल्या विषन्न मनोवस्थेत मला त्या पत्राच्या गठ्ठयाचा आधार मिळतो. कितीही बाका प्रसंग असला तरी त्यातलं एखादं पत्र वाचल्यावर त्यावर तोडगा सापडला नाही किंवा माझं मनोधैर्य उंचावलं नाही असं कधीच झालेलं नाही.




सरते शेवटी उन्हाळयाच्या सुट्टीचा बहर ओसरला आणि शाळा पुन्हा एकदा सुरु झाली. पुन्हा एकदा नवी पुस्तकं.. दप्तर.. आणि सुट्टीत पाटी फोडल्यामुळे नवी कोरी पाटी अश्या शैक्षणिक हत्यारांसहीत अस्मादिक नव्या वर्गात हजेरी लावू लागले. त्यात पहिलीत पहिला नंबर काढल्याने शाळेत माझा रुतबा वाढलेला होता त्यामुळे कॉलर इस्त्री न करता देखील कायम ताठ असायची. बाकी सर्व काही पूर्वी सारखंच होतं. तीच दंगामस्ती, तोच आरडाओरडा आणि तीच पाडापाडी. आता मोठ्या बाईंकडे जाणाऱ्या तक्रारी कमी झाल्या होत्या. नव्या बाई देखील काही अगदीच वाईट नव्हत्या. परंतु त्यांचं आपण बरं की आपलं काम बरं असा खाक्या होता. एकंदर सगळं ऑल वेल होतं.

एक दिवस शाळेचा खडूस शिपाई वर्गात येऊन सूचना वाचून गेला. सूचना होती एक चित्रपट पाहण्याबद्दल. पहिली ते चौथीचे सगळे विद्यार्थी एकत्र 'बाल शिवाजी' हा चित्रपट पाहायला पुण्यात जाणार होते. हा चित्रपट पाहणं सर्वांना सक्तीचं करण्यात आलं होतं. त्यासाठी पालकांकडून रुपये पाच जमा करण्याविषयीची ती नोटीस होती. तोवर मी एकही चित्रपट पहिला नव्हता. त्यामुळे चित्रपट म्हणजे नक्की काय ते मलाही ठाऊक नव्हतं. परंतु शिवाजी महाराजांच्या गोष्टी तोवर हजारदा ऐकल्या होत्या. बाबांनी रीतसर पाच रुपये मुदतीच्या आत भरून टाकले. त्यामुळे मी ह्या कार्यक्रमाला जाणं निश्चित झालं. करमुक्त असल्यामुळे चित्रपटाचं तिकीट साधारण दीड रुपये.. अल्पोपहार दीड रुपये अन दोन रुपये प्रवास खर्च अशी साधारण पाच रुपयाची विभागणी होती.

चित्रपटाचा प्रयोग सकाळी अकरा वाजता पुण्यातील प्रभात टॉकीज मध्ये आयोजित केला होता. त्यामुळे आम्ही सकाळी नऊ वाजताच शाळेतून पुण्यामध्ये एस. टी. बस ने निघालो. चित्रपटा दरम्यान वितरित केला जाणारा अल्पोपहार देखील शाळेतूनच बनवून घेण्यात आला होता. त्याची पाकिटं बस मध्ये चढवण्यात आली. चौथीच्या पोरांना शिवाजी महाराजांचा इतिहास अभ्यासक्रमाला असल्याने त्यांना विशेष प्राधान्य होतं. तिसरी चौथीची पोरं आमच्या पेक्षा मोठी असल्याने ते आम्हाला सिनियर होते आणि आम्ही त्यांच्या दृष्टीने अगदीच लिंबू टिंबू.. साऱ्या प्रवासात त्यांच्या आवाज आणि आरडा-ओरड्यापुढे आमचा आवाज अगदीच फिका होता. तरीही आम्ही भलतेच कॉपी पेस्ट मास्टर होतो. त्यांच्या आवाजात आवाज मिसळून आम्हीही त्या आनंद सोहोळयात सामील झालो.

आम्ही साधारण दोन बसेस केल्या होत्या. मजल दरमजल करीत आम्ही साधारण एका तासाभराने प्रभात टॉकीज वर पोहोचलो. सगळीच मंडळी पहिल्यांदाच पुण्यात आल्यामुळे बावरल्यासारखी झाली होती. त्यांना आवरता आवरता शिक्षकांची त्रेधा तिरपीट उडत होती. एका पुरुष शिक्षकाने पुढे होत सगळयांची तिकिटं काढली. सगळयांना रांगेत उभं करीत तिकीट आणि

अल्पोपाहाराचं प्रत्येकी एक पाकीट हाती सोपविण्यात आलं. काही वेळानी पुन्हा रांग लावत एकेकाला सभागृहात सोडण्यात आलं. सभागृह काळामिट्ट अंधार डोळ्यात बोटं घातलं तरी दिसणार नाही अशी परिस्थिती होती. त्यामुळे बऱ्याच पोरांनी गळे काढले तर काहीजण धडपडले. शेवटी काहीवेळ लाईट लावण्यात आला आणि सगळी मंडळी जागेवर स्थानापन्न झाली. समोर एक भव्य लाल रंगाचा पडदा बंद अवस्थेत होता. त्याच्या पडलेल्या घड्या आणि खाली लावलेली दिमाखदार झालर खूपच सुंदर दिसत होती. वरती लक्ष्मी किबे थिएटर अशी मोठं मोठाली अक्षरं कोरण्यात आली होती. आम्हाला नक्की काय दिसणार ह्याची कल्पनाच नव्हती. पुन्हा अंधार करण्यात आला आणि आम्ही चित्रपट सुरु होण्याची वाट पाहू लागलो.

काही वेळातच तो अजस्त्र पडदा बाजूला होऊन एक कपडेवजा पांढरी भिंत समोर दिसू लागली अन त्याच्यावर चित्र झळकलं. थिएटर मध्ये एकच जल्लोष झाला. मी डोळे विस्फरलेल्या नजरेने त्या भव्य चलतचित्राकडे पाहू लागलो. माझ्यासाठी तो अदभूत चमत्कार होता. सुरुवातीला डोळे संपूर्ण पडदाभर इकडून तिकडे भिरभिरत होते. इतका मोठा पडदा त्या इवल्याश्या डोळयात मावत नव्हता. सुरुवातीला जुळवून घ्यायला कठीण जात होतं. हळू हळू नजर स्थिरावली अन काही वेळातच चित्रपट सुरु झाला. पुढचा प्रत्येक क्षण डोळयात साठवून ठेवण्यासारखा होता. बालशिवाजीचं आगमन होताच थिएटर एकमुखानं गरजलं.. “जय भवानी ! जय शिवाजी ! “ ह्या घोषणा पुढील पाच मिनिटं सुरु होत्या. तोवर अक्षरशः पडद्यावरील चित्र थांबवण्यात आलं आणि घोषणा बंद झाल्या नंतरच पुन्हा रीळ फिरू लागलं.

प्रचंड भारावणारं वातावरण निर्माण झालं. बाल शिवाजीची स्वराज्याची प्रतिज्ञा.. मावळयांना बरोबर घेऊन केलेल्या चढाया. माँसाहेब आणि दादोजी कोंडदेव ह्यांनी शिवबाला दिलेलं प्रशिक्षण आणि स्वराज्याचं बाळकडू.. सारे प्रसंग तो इतिहास जिवंत करीत होते आणि आम्ही तो मंत्रमुग्ध होऊन पाहत होतो. मी

चित्रपटगृहात पाहिलेला हा पहिला चित्रपट. तोसुद्धा इतका जोशपूर्ण असल्याने अगदी अविस्मरणीय ठरला. काही वेळाने अल्पोपहाराची पाकिटं फोडण्याचा आवाज सुरु झाला. बाळ शिवाजीच्या आयुष्यातील सर्व ठळक प्रसंग साकारत शेवटी हा चित्रपट संपला.

आम्ही भारावलेल्या अवस्थेत थिएटर बाहेर पडत बस मध्ये जाऊन बसलो. तिथेही शिवाजीच्या पराक्रमाचीच चर्चा सुरु होती. सारी मंडळी शिवमय झाली होती. मला तर चित्रपट ह्या माध्यमानं प्रचंड व्यापून विस्कटून टाकलं होतं. असं काही ह्या जगात असतं ह्यावरच माझा विश्वास बसत नव्हता. शिवाजी बद्दल तर काही बोलायलाच नको तो तर माझ्यात संपूर्णपणे संचारला होता. पुढचे कित्येक दिवस चाळीतल्या माझ्या वयाच्या एका मुलीचा फ्रॉक घालून, डोक्याला धोतराचा मंदिल चढवत अन कमरेला उपरण्याचा शेला बांधून त्यात लाकडी फुटपट्टी तलवार म्हणून लटकावत हा बालशिवाजी साऱ्या चाळीतून “जय भवानी ! जय शिवाजी” चा नारा देत आपल्या मावळयांसोबत गनिमी काव्याने कित्येक मोहिमा फत्ते करत विजयी मुद्रेने फिरत होता.




“बाल शिवाजी” चित्रपट पाहून मला झालेला आनंद आता लपून राहिला नव्हता. मला हे माध्यम आवडलेलं आहे हे बाबांच्याही लक्षात आलं. असं असलं तरी

मी त्यासाठी हट्ट करणार नव्हतो कारण वर्षांपूर्वी झालेल्या वारंवार मारहाणीमुळे पालकांशी जो दुरावा निर्माण झाला होता तो अजूनही दूर झाला नव्हता. त्यामुळे मी बाहेर माझ्या विश्वात जास्त रममाण होत माझा आनंद शोधत होतो. रोजच्या धबडग्यामध्ये बाबाही इतर जगणं विसरून गेले होते. पण मला सिनेमा आवडतोय म्हटल्यावर त्यांना एक विचार सुचला. संपूर्ण कुटुंबाला सिनेमा पाहायला नेल्यावर सगळयांचा रोजचा ताण हलका होऊन माझ्याशी देखील जवळीक साधता येईल असा त्यांचा होरा होता. तसा विचार काही अगदीच वाईट नव्हता.

हडपसरचं “वैभव चित्र मंदिर” हे आम्हा लोकांसाठी सर्वात जवळचं थिएटर. एका शुक्रवारी बाबा आम्हा सगळयांना हडपसरला घेऊन गेले. आम्हाला भाजीमंडईत सोडून वर्कशॉपवर काहीतरी काम उरकून येतो म्हणाले. मी पहिल्यांदाच शहराच्या उपनगरांमध्ये पाऊल ठेवत होतो. हडपसरचा गाडीतळ. भाजीमंडई.. भाजीवाल्यांचा पुकारा.. जवळच टांगा स्टॅन्ड. तिथे टांगेवाल्यांचा घोड्यांना चाललेला खरारा.. आजूबाजूला प्रचंड गर्दी.. माणसांची धक्का बुक्की हे सारं माझ्यासाठी नवीन होतं. त्यामुळे मी त्या गर्दीत हरवून गेलो होतो. काय बघू आणि कुठे बघू असं झालेलं. मी त्या गर्दीत हरवू पाहत होतो. आईने मला एका बखोटीला धरून ठेवलं होतं. थिएटरवरही वेगळी परिस्थिती नव्हती. फर्स्ट डे फर्स्ट शो असल्याने पिक्चर हाऊसफुल होतं. इतक्यात बाबा परतले. तिकिटं ब्लॅक करणारी टारगट पोरं “पाच का दस, दस का बीस” असं करीत आमच्या आजूबाजूला घुटमळत होती. आता इतक्या दूर आलो म्हटल्यावर पिक्चर पाहणं तर क्रमप्राप्तच होतं. बाबांनी शेवटी एका ब्लॅकवाल्याकडून तिकिटं विकत घेतली. समोर तिकीट खिडकी असताना बाबांनी ह्या माणसाकडून तिकिटं का घेतली हे काही मला कळालं नाही.

गुलजारचा “अंगूर” हा मी घरच्यांसोबत पाहिलेला पहिला चित्रपट. त्यात संजीव कुमार आणि देवेन वर्मा ह्या दोघांची दुहेरी भूमिका होती. मौसमी चॅटर्जी, दीप्ती नवल अन अरुणा इराणी सोबतीला होत्या. गुलजार ह्या आख्यायिकेची मला झालेली ती पहिली पुसटशी ओळख. तदनंतर त्याच्या प्रेमात

आकंठ बुडालो ते कायमचाच. मला पिक्चर पूर्णपणे कळाला नसला तरी त्यामध्ये मी गुंतून गेलो होतो. थेटरात वारंवार हास्याचे फवारे फुटत होते. देवेन वर्मा आणि अरुणा इराणींच्या भांग पिलेल्या प्रसंगाला तर प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. पिक्चर संपल्यावर बाबांनी मला अभिप्राय विचारला, “आवडला का? “ माझं उत्तर होकारार्थी होतं. मला पिक्चरपेक्षा आजूबाजूचा परिसर आवडला होता. घरातून बाहेर शहरात आल्याचा आनंद जास्त होता. एका उडुपी रेस्टॉरंट मध्ये जेवण करून आम्ही लोक नवाबी थाटात टांग्याने घरी आलो. त्यावेळी हॉटेलिंग हे असंच अगदी मोजकं होतं. ते चैन ह्या कॅटेगरी मध्ये गणलं जात असे. इतरवेळी घरून शिदोरी बांधून घेतली जायची.

ह्या घटनेनंतर दर दीड दोन महिन्याला एखादा सिनेमा असं समीकरण होऊन गेलं. दुसरा सिनेमा नशिबी आला तो म्हणजे “ये वादा रहा” पूनम धिल्लन, टीना मुनीम अन ऋषी पकूरचा.. टिपिकल हिंदी प्रेमकथा असल्याने त्या वयात माझ्यासाठी ती अत्यंत बोअरिंग गोष्ट होती. जिथे आई-बाबा मश्गुल होऊन चित्रपटात रमले होते तिथे आम्हा भावंडांची खुर्चीमध्ये चुळबुळ सुरु होती. शेवटी आम्ही दोघे हळूच सिनेमाहॉलच्या बाहेर आलो. आई-बाबांना पत्ताच लागला नाही. पोर्चमध्ये थोडावेळ इकडून तिकडे केल्यावर पुढे काय करावं हे कळेना.. चुकून खिशात हात घातला तर खिशात गोट्या खुळखुळल्या मग काय विचारता? द्वयीने तिथेच गोट्यांचा डाव मांडला. एकदा बोटाने गोटी मारली की त्या गुळगुळीत फारशींवरून टुणकन ती दुसऱ्या टोकाला पोहोचायची. मग आम्ही लोक जवळ जवळ स्केटींग करत तिच्यापर्यंत पोहोचत असू. सोबतीला आरडा-ओरडा होताच. सिनेमाहॉलचा तिकीट चेकर आमच्याकडे अधून मधून त्रासलेल्या नजरेने पाहत होता.

इतक्यात मध्यांतर झालं. आईबाबा आजूबाजूला पाहतात तो काय? आम्ही दोघे गायब. लगेच शोधाशोध सुरु झाली. बाहेर येऊन पाहतात तो आमचा

गोट्यांचा कार्यक्रम यथासांग सुरु होता. सिनेमाच्या दुसऱ्या हाफ मध्ये मात्र भाऊ आईच्या पदराला अन मी बाबांच्या मफलरीला बांधले गेलो. आता उरलेला सिनेमा अनिच्छेने पाहणं भाग होतं. पूनम धिल्लनला झालेला अपघात व त्यानंतर तिचा प्लास्टरमध्ये लपेटून विद्रुप केलेला चेहरा पाहून मी भयंकर भेदरलो. पुढचा सिनेमा मग डोळे झाकूनच पहिला. पुढचा आठवडाभर तिचा तो भेसूर चेहरा डोळ्यासमोरून जात नव्हता त्यामुळे ती स्वप्नात वैगेरे आली तर काय करायचं हा विचार करूनच मी बाबांना बिलगून झोपत होतो.

एकदा "राहुल" ला आम्ही "द आफ्रिकन सफारी" हा इंग्रजी सिनेमा पाहायला गेलो. आमची हिंदीच कुबड्या घेऊन चालत होती. तिथे इंग्रजीच्या नावाने आनंदी आनंदच होता. पण माहितीपटवजा ह्या सिनेमाला भाषेची मुळीच गरज नव्हती. त्यातली चित्रच इतकी बोलकी होती. आज "डिस्कव्हरी अन वाइल्ड चॅनेल्स" मुळे जंगल अन प्राण्याच्या चित्रीकरणाचं इतकं अप्रूप राहिलं नसलं तरी त्यावेळचा माईल स्टोन ठरावा इतका अप्रतिम छायाचित्रण असलेला हा सिनेमा होता. आफ्रिकेच्या "मसाई मारा" जंगलात प्रामुख्याने चित्रित केला गेलेला हा चित्रपट म्हणजे डोळे विस्फारणारा अन बुद्धीला चालना देणारा अनुभव होता. एकही क्षण पडद्यावरून नजर हटत नव्हती. हिंदी पिक्चरचं तंत्रज्ञान ह्यापुढे अगदीच टूच्चं होतं. मसाई आदिवासींची जीवनशैली, गाईच्या गळयाला भोक पडून तिचं उष्ण रक्त पिणारी ही जमात पाहून अंगावर काटा आला. सिंहाच्या शिकारीचा थरारक पाठलाग.. पाच पन्नास फुटाचा पायथॉन पाहून अंगावर रोमांच उठले नसते तरच नवल. मी पाहिलेल्या काही सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक अशी या चित्रपटाची गणना करावी लागेल.

हा सिलसिला असाच पुढे सुरु राहिला.. दरम्यानच्या काळात बरेच मराठी आणि हिंदी चित्रपट पाहण्यात आले. त्यात मनोज कुमारचा "क्रांती", राज बब्बरचा "प्रेमगीत", सई परांजपेंचा "चश्मेबद्दूर", हृषीदांचा "नरम गरम", अमिताभ अन रेखाचा "सिलसिला" अशी अनेक रत्न होती. त्यातले काही ठळक

प्रसंग आजही जसेच्या तसे आठवतात. “क्रांती” मधलं “जिंदगी की ना तुटे लडी”, प्रेमगीत मधलं “ओठोंसे छू लो तुम”, 'नरम गरम' मधला 'चपडगंजू, घोंचू, चना गुड” शत्रुघ्न सिंन्हा, “एक बात सुनी है चाचाजी” म्हणणारी टीना मुनीम.. चश्मेबद्दूर मधली “मिस चमको” दीप्ती नवल, सफाचट दाढी केलेला फारूक शेख, राकेश बेदी-रवी वास्वानीची अतरंगी जोडी, मजाकिया सईद जाफरी, पाहुणे कलाकार म्हणून उपटलेले अन भलताच भाव खाऊन गेलेले अमिताभ अन रेखा असं बरंच काही स्वच्छपणे आठवतं. सिलसिला मधलं “देखा एक ख्वाब ते ये सिलसिले हुए” हे गाणं त्यातली ट्युलिप गार्डन तिची मैलोन्मैल पसरलेली रंगसंगती म्हणजे डोळयांना पर्वणी होती. त्यात बागडणारा उंचापुरा कोवळा अमिताभ अन चिरतरुण रेखा कोण विसरू शकेल? ह्याचा ताजेपणा इतकी वर्ष टिकला होता की पुढे जेंव्हा हॉलंड मध्ये राहण्याची वेळ आली तेंव्हा तिथे पाऊल ठेवताच पहिलं काय पाहिलं असेल तर ते “क्यूकेनहॉफ” चं “ट्युलिप गार्डन”.

मराठी चित्रपट शक्यतो “वैभव” अन “प्रभात” ला पहिले. “लक्ष्मीची पाऊले”, “चटक चांदणी”, “गोंधळात गोंधळ” अन “उंबरठा” ह्या काही उल्लेखनीय सिनेमा शिवाय कुठला लक्षात राहिला असेल तर अशोक सराफ चा “एक डाव भुताचा”.. नाजूक साजूक तुपातला पापभिरू वेंधळा मास्तुरे दिलीप प्रभावळकर, धसमुसळी रंजना अन त्याच्यावरती वरकडी करणारा सोंगाड्या अशोक सराफ म्हणजे डेडली कॉम्बिनेशन होतं, बरीचशी फँटसी असल्या कारणाने आम्हा मुलांना तो पसंत पडणार हे ओघानं आलंच. “प्रभात टॉकीज” मध्ये हा सिनेमा पाहताना खंडूजी फर्जद ह्या एका मावळयाचं भूत बनलेल्या अशोक सराफच्या करामती पाहून माझी तर हसून हसून मुरकुंडी वळली. एरवी भुताचं नाव ऐकून टरकणारा मी आज मात्र ह्या भुताने पछाडला गेलो होतो. “थिर्रर्र” करणारं हे भूत हवंहवंसं वाटणारं होतं. सिनेमाच्या शेवटी बॅकग्राऊंडला “सज्जनांचा कैवारी तू, दुर्जनांचा वैरी, तूच

मायबाप बंधू तूच प्राणसखा” हे गाणं वाजवत खंडुजीला बुडत्या सूर्याच्या साक्षीने मोक्षाच्या वाटेवर जाताना पाहून नकळत डोळयात टचकन पाणी तरळलं. त्याला असं मास्तरांना सोडून जाताना पाहून मला संभादादाची तीव्रतेने आठवण झाली. त्याला जाऊन आता वर्ष- दीड वर्ष होत आलं होतं पण त्याला माझी एकदाही आठवण झाली नव्हती. निर्दयी कुठचा?



लहानपणापासून काही संकल्पना अन धारणा आपल्या डोक्यात फिट्ट बसवल्या जातात. त्यांचा पगडा इतका जबरदस्त असतो की आयुष्यभर त्या मानगुटीवरून उतरता उतरत नाही. उदा. पाप पुण्याच्या संकल्पना, धर्माची शिकवण, काही मोठ्या व्यक्तींचं पराकोटीचं देवासमान केलेलं उद्दात्तीकरण वैगेरे वैगेरे. इतकं की त्यांच्याकडून चुका होऊच शकत नाही. ह्या असामी म्हणजे सदगुणांची खाण अन दुर्गुणांचा अभाव. ह्याला श्रद्धा अन निष्ठा असं संबोधलं जातं. जिथे प्रश्न-प्रतिप्रश्न करण्याची मुभा नसते. मग वास्तव अन आभास ह्यात फारकत

निर्माण होऊन श्रद्धा अन तार्किकता यांचा सामना सुरु होतो. अडचणींच्या प्रश्नांनी श्रद्धेला ठेच पोहोचून इतकी शतकानुशतकं पाळलेल्या विधिनियम अन भावनांचे तकलादू बुरुज ढासळू शकतात.

त्यासाठी मग ज्यातलं कळत नाही तिथे सक्तीने गप्प राहण्याचा सल्ला दिला जातो. लहान मुलाचे बोबडे बोल ऐकण्यासाठी सुरुवातीला सारे अधीर असतात. एकदा का ते बेणं सुस्पष्ट शब्दात अजाणतेपणी अडचणीचे प्रश्न विचारू लागलं की, “हे कार्ट बोलत नव्हतं तेच चांगलं होतं” अशी इतरांची भावना होऊन जाते. प्रश्नाला उत्तर नसलं की मग ही मंडळी “हे समजण्याइतका तू मोठा झालेला नाहीस. आम्ही चार पावसाळे जास्त पाहिलेले आहेत. “ हे छापील उत्तर डकवून मोकळे होतात. एखाद्याच्या शहाणपणाचं कुणी किती पावसाळे पहिले ह्या परिमाणात मोजण्याचं एकक अजूनही माझ्या ध्यानात आलेलं नाही. खरतर पहिल्या पावसाळयात भिजल्यानंतर पुन्हा कधीही ही मंडळी छत्रीविना बाहेर पडलेली दिसत नाहीत. कदाचित ह्यालाच ते शहाणपण म्हणत असावेत. ह्या वारंवार दडपशाहीचा नकळत मुलावर व्हायचा तोच परिणाम होतो. प्रश्न विचारून आकलनशक्ती विस्तारित करण्याची त्याची ही उपजत कला हळू हळू विलयास जाते. इतरांचे निष्कर्ष प्रमाण मनात सत्य शोधण्याची जिज्ञासा देखील लोप पावते.

आई म्हणजे प्रेमळ जगन्माता. . आजी म्हणजे अनुभवाची खाण.. प्रेमाची पाखर.. बाप म्हणजे खविस.. पोरगा म्हणजे अवलादी.. सून म्हणजे सोशिक, मुलगी म्हणजे आदर्श असे काही ठराविक ठोकताळे असतात. ह्या सगळया नात्यांवर ठराविक शिक्के मारले अन काहींना मखरामध्ये बसवलं की आपण मोकळे. त्यात वावगं असं काही नाही. परंतु इथेच आपली फसगत होते. शेवटी ह्या सगळया नितांत सुंदर संकल्पना असल्या तरी सरते शेवटी ही सगळी बोलून चालून माणसंच.. त्यांनाही माणसाचे सगळे गुणधर्म लागू होतात. मुलीच्या जातीने जपून राहायला हवं अन “सरते शेवटी तो मुलगा आहे त्याला सारं रान मोकळं आहे “

म्हणत लिंग भेद करणं जितकं वाईट. तितकंच आई-आजीच्या भूमिकेचं उद्दात्तीकरण करून त्यांना मखरात बसवणं देखील वाईटच.

ह्यामुळे आपण त्यांना एका प्रतिमेमध्ये जखडून टाकतो अन एका अर्थाने त्यांना जगणंच नाकारतो. त्यांच्याकडे केवळ आदर्श म्हणून न पाहता निव्वळ माणसं म्हणून पाहिलं की कोडी सोप्पी होतात. अण्णा नेहमी म्हणायचे माणसं ही सवलतीच्या दरात मिळणाऱ्या बंडल पॅक प्रमाणे आपल्या आयुष्यात येतात. आपल्याला ते हवं स्वीकारून नको ते नाकारण्याची मुभा नसते. त्यांना संपूर्णपणे गुणावगुणांसहित स्वीकारावं लागतं. मुख्य वस्तू मात्र आकर्षक हवी म्हणजे मूलतः व्यक्तीचा गाभा फणसासारखा चांगला असायला हवा मग त्याच्यावर असणारे दुर्गुणांचे काटे दुर्लक्षित करता येतात अन त्या व्यक्तीचा राग न करता तिच्यावर प्रेमही करता येतं. कुठलाही माणूस सदासर्वकाळ चांगला किंवा वाईट असू शकत नाही. ज्या त्या परिस्थिती, पूर्वानुभव अन बुद्धीच्या आकलनानुसार त्याचं वर्तन असतं

जर का सगळयाच आया अन आज्या ह्या आदर्शाच्या व्याख्येत बसत असतील तर मग समाजात वावरणाऱ्या खलनायिका कुठून उत्पन्न होत असतील? कुणाची तरी आई असणारी बाई जेव्हा आपल्या सुनेला उभी जाळते तेव्हा तिच्यातलं आईपण कुठे जातं? किंवा स्वतःची लाकडं मसनात गेलेली असताना इतरांना स्मशानात पाठवण्याची मनीषा ठेवणाऱ्या आजीचं शहाणपण कुठे जातं? स्वतःच्या मुलाला दिलेला डबा शाळेत इतरांशी वाटून न खाता बाजूला जात एकट्याने खाण्याचा सल्ला देणाऱ्या आईला मी आई मानत नाही. म्हणून माझ्या मते आई आजी ह्या नितांत सुंदर संकल्पना आहेत. स्वतःच्या मुलावर जीव ओवाळून टाकणाऱ्या असंख्य माता या जगात असतील. परंतु दुसऱ्याच्या मुलाची आई होता येणं हे खरं आईपण. सिंधुताई सारख्या एखाद्या माईलाच हे आभाळाएवढं आईपण गवसतं.

माझ्या शाळेतील प्रगतीच्या खबरा वेळोवेळी हस्ते परहस्ते आजीपर्यंत पोहोचत होत्या. आता तिला धीर धरवत नव्हता. तिला खरतर बाबांनी घेतलेला निर्णय खोटा पडायचा होता. तिच्याकडे मुलगा कसा सुरक्षित अन चांगला वाढला असता परंतु इकडे पुण्याला आल्यामुळे त्याची कशी हेळसांड झाली आहे हे तिला सिद्ध करायचं होतं. ह्यामुळे तिला सुनेवर आणखी दोन चार गुण जास्त मिळवता येऊन तिला खलनायिका सिद्ध करणं सोपं जाणार होतं. परंतु इकडे भलतंच घडत होतं. मीही आतापर्यंत आजीचा धोसरा सोडला होता.

आजीचा मला गावी आणण्याचा प्रयत्न सुरूच होता. तिने आपल्या इतर मुलांकडे तिच्या मोठ्या मुलाने अन सुनेने तिच्या लाडक्या नातवाला तिच्यापासून कसा तोडला आहे? तिला माझ्याविना कशी झोप येत नाही. अन्नाचा एकही कण तिच्या घश्याखाली कसा उतरत नाही? ह्या अश्या एक ना अनेक सुरस कहाण्या ऐकवायला सुरुवात केली. त्याचा परिणाम हळू हळू दिसू लागला होता. त्याकाळी मुलाला आजीने वाढवणं ह्यात काही फारसं वावगं नव्हतं. त्यामुळे इतरांना देखील आजीचं मत पटून मला आजीकडे गावी न पाठवण्याचा बाबांचा निर्णय म्हणजे अक्रस्थाळेपणा वाटत होता. पालकांच्या भावनांना फारशी किंमत नव्हती. ह्या युवराजाला हस्तगत करण्यासाठी लागणारा सर्व फौजफाटा आजीकडे हळू हळू जमा होत होता.. आता फक्त मुहूर्त शोधण्याचा उशीर होता.

या दिवट्या कल्लाकाराने पुढे काय अत्रंगी कल्ला केला ते वाचण्यासाठी पुढचा भाग वाचायलाच हवा. त्यासाठी लिहा...


भूपेश कुंभार

mob.no – 7030919910, 8668436022

bhupesh.kumbhar@gmail.com

किंवा

esahity@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.